नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १२ * * अकोला * शनिवार, दिनांक १२ जुलै २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## बोअरवेल-ट्रक खोल खड्ड्यात कोसळला, ३ ठार

■ वृत्तसंस्था, कवर्धा (छत्तीसगड), दि. ११ :
छत्तीसगडमधील कवर्धा जिल्ह्यात एक बोअरवेल ट्रक ६० फूट खोल खड्ड्यात कोसळला. या अपघातात ३ जणांचा मृत्यू झाला आहे. ४ जण गंभीर जखमी झाले आहेत. गाडीत एकूण ९ जण प्रवास करत होते.

ग्रामपंचायत अगरपाणीच्या चाटा गावाजवळील वळणावर गाडीचा तोल गेल्याने हा अपघात झाला. ही घटना कुकदूर पोलिस स्टेशन परिसरातील आहे. स्थानिक लोकांनी बोअरवेलची गाडी खड्ड्यात पडताना पाहिली. त्यांनी पोलिस स्टेशनला माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून ट्रकचा ढिगारा काढला तेव्हा त्यांना त्याखाली ६ लोक गाडलेले आढळले. गंभीर जखमींना आरोग्य केंद्रात नेण्यात आले.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# बिहारी टक्के टोणपे

पुढील दोन-तीन महिन्यानंतर बिहार राज्यांमध्ये विधानसभा निवडणूक होणार आहेत. त्या निवडणुकीच्या आधी मतदारांची फेर तपासणी करून नव्याने यादी तयार करण्याचे काम निवडणूक आयोगाने हाती घेतलेले आहे. प्रत्यक्ष निवडणुकीच्या पूर्वी ज्यांनी अनेक वेळा मतदान केले त्या मतदारांनाही निवडणूक आयोग सध्याच्या घडीला प्रचंड मोठ्या प्रमाणात छळत आहे. मतदारांची फेर तपासणी करताना इतक्या गोष्टी मागण्यात येत आहेत की, त्यापैकी बरीच कागदपत्रे सामान्य माणसाजवळ उपलब्ध असूच शकत नाहीत. त्यातल्या त्यात बिहार मधली गरिबी आणि शिक्षणाचा अभाव यामुळे अनेक मतदारांची पंचाईतच होत आहे. काल सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणी मध्ये नागरिकत्वाच्या पुराव्यासाठी आयोगाने परवानगी दिलेली अकरा प्रकारची कागदपत्रे परिपूर्ण नसतील. तर आधार कार्ड, जुने मतदार ओळखपत्र आणि रेशन कार्डचाही विचार पुराव्यासाठी केला पाहिजे. असे सांगून सर्वोच्च न्यायालयाने फेर तपासणीच्या मोहिमेला स्थगिती करण्यासाठी नकार दिला आहे. या दरम्यान निवडणूक आयोगाकडून फेर तपासणीची मोहीम अत्यंत काटेकर पद्धतीने राबवली जात आहे. त्याबद्दलही सर्वोच्च न्यायालयाने आक्षेपच घेतलेला आहे. तो आक्षेप असा आहे की तुम्ही बिहारच्या आणि निवडणुकीच्या तोंडावर ही तपासणी करत आहात हे बरोबर नाही. करायचेच असेल तर हे काम आपण संपूर्ण देशात का करत नाही, असाही सवालही सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला विचारला. मतदारांची फेर तपासणी करणे हा निवडणूक आयोगाला घटनेने दिलेला घटनादत्त अधिकार आहे. त्यामुळेच आयोगाला आणि त्यांच्या निर्णयाला स्थगिती देण्यात येणार नाही. पण केवळ बिहारमध्ये इतक्या घाईघाईने हे प्रक्रिया राबवण्याची गरज होती का, असे न्यायालयाने विचारले तेव्हा मात्र निवडणूक आयोग हाताची घडी आणि तोंडावर बोट ठेवून निरूत्तर झाला. लाखो मतदार या सगळ्या गोष्टींमुळे मतदानापासून वंचित राहतील अशी स्थिती आहे. ज्याप्रमाणे आयोगाला घटनादत्त अधिकार आहेत त्याचप्रमाणे मतदारांनाही घटनादत्त अधिकार आहेत. त्यामुळेच कोणाचेही नागरिकत्व ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नाही., असे सांगून निवडणूक आयोगाचे कान सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत उत्तम रीतीने तपासले आहेत. बिहारमध्ये जी मंडळी किंवा मतदार वर्षानुवर्ष मतदान करत आहेत. परंतु त्यांना ऑनलाइन पद्धतीचे उत्तर देता येत नाही किंवा अति किचकट पद्धतीची जी कागदपत्रे हवी आहेत. ती देता येत नसतील तर त्या मतदाराला मत देता येणार नाही, हे अत्यंत अन्यायकारक आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केलेले आहे. सध्याच्या घडीला वेगवेगळ्या पक्षांच्या दहा याचिका सर्वोच्च न्यायालयाच्या समोर आहेत. ज्यामध्ये न्यायालयाला फक्त तीन बाबींची उत्तरे हवी आहेत. त्यामध्ये एक तर या निवडणूक आयोगाला फेर तपासणीचा अधिकार आहे काय आणि जर समजा असेल. तर दुसरी म्हणजे फेरतपासणी ज्या पद्धतने होत आहे, ती प्रक्रिया योग्य आहे काय. त्यानंतर तिसरी, त्याहून महत्त्वाची बाब म्हणजे त्यासाठी ही आत्ताची वेळ योग्य आहे काय. हे तीन प्रश्न न्यायालयाने विचारलेले आहेत. निवडणूक आयोग स्वतंत्र संवैधानिक आस्थापना आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे संवैधानिक अधिकार निवडणूक आयोगाला असले, तरीही आयोगाला मनमानीचा अधिकार नाही. कारण जे मतदार आहेत त्यांना हुसकावण्यासाठी जी प्रक्रिया राबवली जात आहे. त्यामुळे बिहार सारख्या राज्यात बरेचसे मतदार यामुळे वंचित राहू शकतात. म्हणून सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत सडेतोड प्रश्न विचारून सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये नागरिकत्व तपासण्याचा अधिकार केवळ गृह खात्याला आहे असे कायदा म्हणतो. त्यावर निवडणूक आयोगाच्या वकिलांनी मल्लिनाथी करत गोलमाल उत्तरे दिली. परंतु न्यायालयाने स्पष्टपणे प्रश्न विचारून मतदानापासून कोणालाही वंचित करण्यात येणार नाही, असे सूचित केलेले आहे. आता ऐनवेळी निवडणुकीच्या तोंडावर घाईगडबडीने मतदारांची तपासणी करणे योग्य आहे किंवा नाही हे न्यायालयाने स्पष्ट केले नसले. तरी त्यांना काय म्हणायचे आहे, ते निवडणूक आयोगाला आता बरोबर समजलेले आहे. आता निवडणूक आयोग सर्वोच्च न्यायालयाला गुंडाळून ठेवतो की, यावर गंभीरपणे विचार करतो. हाच एक मात्र गंभीर प्रश्न आहे. आता तरी निवडणूक आयोगाला न्यायालयाचा खंबीरपणा गंभीरपणे कळेल का आणि कळला तरी वळेल का?

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## देवाच्या नावाने भ्रष्टाचार करणाऱ्यांना
# त्यांची जागा दाखवणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
शनि शिंगणापूर येथील शनि मंदिराच्या विश्वस्थांनी केलेल्या घोटाळ्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सभागृहात निवेदन केले.

या घोटाळ्याप्रकरणी संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करून देवाच्या नावाने भ्रष्टाचार करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवली जाईल, असे ते म्हणाले.

३३६७ धार्मिक स्थळांवरील भोंगे हटवण्यात आले आहेत. या ठिकाणी पुन्हा भोंगे लागल्यास, ज्या पोलिस स्टेशनच्या हद्दीत हे होईल, तेथील 'इंचार्ज'ला यासाठी जबाबदार धरले जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

● सभागृहात मुख्यमंत्र्यांचा स्पष्ट इशारा ●



शुक्रवारी विधानसभेत सत्ताधारी पक्षाच्या एका आमदाराने सकाळी १० च्या भोंग्याची (संजय राऊत) तक्रार केली. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मिश्किल उत्तर दिले.
आज विधानसभेत भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी लाऊड स्पिकर, भोंग्याच्या आवाजासंदर्भात लक्षवेधी मांडली. तक्रारीची वाट न पाहता स्वतःहून कारवाई करावी, असे ते म्हणाले. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या विषयातील अडचण अशी आहे की, आपल्याकडे ध्वनी प्रदूषणाबद्दल कायदा आहे. पण विचाराच्या प्रदूषणाबद्दल आपल्याकडे अजून कायदा व्हायचा आहे.

## जनसुरक्षा विधेयक भाजपच्या सुरक्षेसाठी

उद्धव ठाकरेंचा टोला, विधेयकात दुरूस्तीची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :



जनसुरक्षा विधेयकाला उद्धव ठाकरे यांनी विरोध दर्शवला आहे. या कायद्यामागे राजकीय हेतू असल्याचा आरोप केला आहे. हे विधेयक जनतेच्या नव्हे, तर भाजपच्या सुरक्षेसाठी आहे. त्यामुळे या विधेयकाचे नाव 'जनसुरक्षा विधेयक' ऐवजी 'भाजप सुरक्षा विधेयक' ठेवा असा टोला, उद्धव ठाकरे यांनी भाजपला लगावला. जनसुरक्षा विधेयकात काही बदल करण्याची मागणी उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

जनसुरक्षा विधेयक गुरुवारी विधानसभेत आवाजी मतदानाने बहुमताने मंजूर झाले. आज या विधेयकवार विधान परिषदेत चर्चा झाली. या चर्चेवेळी विरोधकांनी जनसुरक्षा विधेयकाला विरोध केला आहे. या विधेयकाला असहमती देणारे पत्र महाविकास आघाडीने सभापती यांना सादर केले आहे. तर उद्धव ठाकरे यांनी विधान भवन परिसरात पत्रकारांशी बोलताना जनसुरक्षा विधेयकाला आमचा विरोध असल्याचे मत व्यक्त केले.

जनसुरक्षा विधेयकाला आमचा विरोध आहे. राजकीय हेतून विधेयक आणू नका, या विधेयकामध्ये राजकीय दुरुपयोगाचा वास येत आहे. सत्ताधाऱ्यांच्या कथनी आणि करणीमध्ये फरक दिसत आहे, या विधेयकात नक्षलवाद असा कुठेही उल्लेख नाही. नक्षलवाद संपत आलाय, मग कायदा कोणासाठी? असा सवालही उद्धव ठाकरेंनी केला.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, बेकायदा कृत्य याची स्पष्ट व्याख्या विधेयकामध्ये नाही. विरोधकांना त्रास देण्यासाठी कायदा आणत आहात का? या विधेयकाचे नाव जनसुरक्षा विधेयक असे असले, तरी हे विधेयक भाजपच्या सुरक्षेसाठी आणले आहे. त्यामुळे जनसुरक्षाऐवजी भाजप सुरक्षा विधेयक असे नाव करा, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली. शेंडा बुडका नसलेले आणि मिसला टाडा या प्रमाणेच हे विधेयक असल्याचेही ते म्हणाले.

## जनसुरक्षा कायदा लोंबकळणार?

महाविकास आघाडीचा विधान परिषदेत विरोध

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
विरोधी पक्षांच्या महाविकास आघाडीने विधानपरिषदेत महायुती सरकारच्या बहुचर्चित महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायद्याला कडाडून विरोध केला आहे.

प्रस्तुत कायदा राजकीय दडपशाहीचे साधन म्हणून वापरला जाण्याची दाट शक्यता आहे, असे विरोधकांनी म्हटले आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे या कायद्यावरून विधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात चांगलेच राजकारण होण्याची शक्यता आहे.

विधानसभेने गुरूवारी महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयकावर आपली मोहोर उमटवली. त्यानंतर हे विधेयक आता विधानपरिषदेत सादर केले जाणार आहे. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या सदस्यांनी या विधेयकाला विरोध केला आहे. त्यांनी आपला विरोध सभापती प्रा. राम शिंदे यांना एका पत्राद्वारे कळवला आहे.

विधानमंडळाच्या स्वरूपातील संवैधानिक धोका, असा उल्लेख करीत विरोधकांनी पत्रात नमूद केले आहे की, १० जुलै, २०२५ रोजी सादर करण्यात आलेले महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक, २०२४ हे सार्वजनिक सुरक्षिततेचे उपाय नाही तर ते राजकीय दडपशाहीसाठी एक कायदेशीर ब्लूप्रिंट आहे. ते युएपीए, एनएसए आणि अफ्सा मधील सर्वात वाईट वैशिष्ट्ये राष्ट्रीय सुरक्षेच्या संदर्भाशिवाय एकत्र करते आणि त्यांना नागरी प्रतिकार, लोकशाही अभिव्यक्ती आणि विरोधी संघटनांना लागू करते.

या असहमती पत्रात उपस्थित केलेला महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, युएपीए १९६७ (२००८, २०१९ मध्ये सुधारित), भारतीय न्याय संहिता आणि मोक्का १९९९ हे कायदे राज्यात आधीच अस्तित्वात असताना आणि राज्याला व पोलिसांना अनियंत्रित आणि कठोर अधिकार देत असताना, आणखी एका कायद्याची गरज आहे का?

यापूर्वी पाच बैठका होऊनही, समितीच्या अहवालात विरोधी सदस्यांनी, विशेषतः महाविकास आघाडी चे प्रतिनिधित्व करणाऱ्यांनी व्यक्त केलेल्या महत्त्वाच्या चिंतांचा स्वीकार किंवा समावेश करण्यात आलेला नाही. समितीच्या कामकाजादरम्यान यावर चर्चा झाली असली तरी, विधेयकाच्या अंतिम आवृत्तीत त्यापैकी काहीही सुधारणा न करता सरकारने केवळ नाममात्र दुरुस्त्या केल्या आहेत ज्यामुळे कायद्याच्या दडपशाहीच्या चौकटीत कोणताही बदल होत नाही.

टीका सादर केलेल्या शेकडो व्यक्ती आणि संघटनांपैकीएकालाही वैयक्तिक सुनावणी दिली नाही, यासह अनेक मुद्दे विरोधकांनी या पत्रात नमूद केले असून, विधान परिषदेत हे विधेयक लोंबकळण्याची शक्यता आहे.

## बाबासाहेबांच्या जमिनीवर भूमाफियांचा कब्जा

आ. अस्लम शेख यांनी सभागृहात उपस्थित केला मुद्दा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वारसांच्या नावे असलेली मौजे तळवली, तालुका-कल्याण येथील जमीन भूमाफियांनी बळकावली व तिथे 'तनिष्का रेसिडेन्सी' नावाने ७ मजली इमारत उभी केली.

आज याच मुद्द्यावरुन विधानसभेत आक्रमक होत अशा भूमाफियांना तडीपार करण्याची व त्यांच्यावर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्याची मागणी आमदार अस्लम शेख यांनी विधानसभेत केली. यावेळी त्यांनी महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली.

आमदार अस्लम शेख यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नांना उत्तर देताना मंत्री बावनकुळे यांनी हा सर्व प्रकार उघडकीस आणल्याबद्दल शेख यांचे अभिनंदन केले आणि कारवाईचे आश्वासन दिले.

## उबाठा, मनसेला झटका
## पदाधिकारी शिंदेसेनेत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
पुण्यातील उबाठा आणि मनसेला मोठा धक्का देत त्यांच्या अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यासह खासदार नरेश म्हस्के, माजी महापौर मिनाक्षी शिंदे, शिवसेना सचिव राम रेपाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. वैभव वाघ, उमेश गालिंदे, मनसेचे सतिश शिंदे, अभिमन्यू मैद, सुधीर ढमाले, निलेश जाधव, संदेश पावसकर, अथर्व पिसाळ, विजय गालफाडे, अनिल बटाणे, महेश चव्हाण यांच्यासह अनेकांनी शिंदेसेनेत प्रवेश घेतला.

## नदीत बुडून दोन चिमुकल्यांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
अचलपूर/अमरावती, दि. ११ :
अचलपूर तालुक्यातील बुरड घाट परिसरात एक हृदयद्रावक घटना घडली आहे. बिच्छन नदीतील खोल पाण्यात बुडून दोन चिमुकल्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. शुक्रवारी दुपारी ही घटना घडली असून संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.



भावेश चौरसिया



दीपक ब्राम्हने

भावेश रवींद्र चौरसिया (वय १०), दीपक सिंह मोतीसिंह ब्राम्हने (वय ८), दोघेही रा. बुरड घाट, अचलपूर) असे चिमुकल्यांची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बुरड घाट येथील पाच मुले नदीत आंघोळीकरिता गेली होती. त्यावेळी एका गुरे चारणाऱ्याने तिघा मुलांना वाचवले; मात्र भावेश व दीपक खेळता खेळता बिछन नदीच्या खोल डोहाजवळ गेले आणि पाण्याची खोली लक्षात न आल्याने दोघेही पाण्यात बुडाले.

थोड्या वेळाने आजूबाजूच्या लोकांना याची माहिती मिळताच त्यांनी तत्काळ नदीत उतरून मुलांना बाहेर काढले आणि तातडीने अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती दोघांनाही मृत घोषित केले. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून नातेवाईकांचे आक्रोशाने हृदय हेलावून जात आहे.

## आय डोन्ट केअर...

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :
आमदार निवासातील कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी सत्ताधारी शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्यावर मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे.

दुसरीकडे, गायकवाड यांनी चांगल्या कामासाठी कितीही गुन्हे दाखल झाले तरी आपल्याला त्याची परवा नाही, आय डोन्ट केअर, अशा शब्दात यावर प्रतिक्रिया दिली.

गायकवाड यांनी गत मंगळवारी रात्री आमदार निवासातील कॅन्टीनच्या कर्मचाऱ्याला मारहाण केली होती. या घटनेचे राजकीय वतुर्ळात तीव्र पडसाद उमटले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी बोलताना गायकवाड यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे संकेत दिले होते, त्यानुसार, आज शुक्रवारी मरिन ड्राईव्ह पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा नोंदविला.

### नक्षलवादात घट असताना
## नवा कायदा कशासाठी?

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ११ :
देशाचे गृह मंत्री अमित शहा यांनी ७२ % नक्षलवाद संपुष्टात आल्याचे सांगून २०२६ मध्येच, देश नक्षलवाद मुक्त होईल असे सांगितले. तर मग जन सुरक्षा कायद्याची गरज का? असा प्रश्न काँग्रेसने उपस्थित केला आहे.



सरकारची उत्तरे देण्यात दमछाक होते आहे म्हणूनच जनसुरक्षा नव्हे तर सत्ता सुरक्षा कायदा बहुमताच्या जोरावर मंजुर करण्यात आल्याची टिका काँग्रेस प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी केली. विरोधकांना नक्षलवादी ठरवण्याची या सरकारची फॅशन झाली आहे. याविषयी मविआ नेत्यांनीही टिका केली आहे. सत्तेतील महायुतीच्या नेत्यांना स्वकर्तबगारीची वानवा असल्याने, विरोधकांच्या प्रश्नांनाच सामोरे जाऊ नये असे वाटते व त्या अपराधीक, असुरक्षित भावनेतूनच जनसुरक्षा कायद्याचा घाट घातला हे स्पष्ट होत असल्याचे तिवारी यांनी सांगितले.

### माजी पोलिस आयुक्त परमबीर सिंग यांना
## सीबीआयकडून क्लीन चिट

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
माजी मुंबई पोलिस आयुक्त परमबीर सिंग यांना सीबीआयने क्लीन चिट दिली आहे.



त्यांच्या विरोधात दाखल असलेल्या ५ कोटींच्या खंडणीप्रकरणात तसेच आरोपांमध्ये सीबीआयला कोणतेही तथ्य सापडले नसल्याचे सांगण्यात येते.

## ५० पैकी १ खोका दिसला..

शिरसाट यांच्या व्हिडिओवर आदित्य ठाकरेंचा टोला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :
महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये पैशांनी भरलेली एक बॅग दिसत असून स्वतः संजय शिरसाट बेडवर बसून सिगारेट ओढत फोनवर बोलताना दिसून येत आहेत. यावरून विरोधकांनी त्यांच्यावर चांगलीच टीकेची झोड उठवली आहे. एवढे पैसे आले कुठून? असा सवाल शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.



विधानभवनाच्या परिसरात पत्रकारांशी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, आजकाल बरेच संजय चर्चेत येत आहेत. काल परवा संजय गायकवाड चर्चेत आले होते. त्यांनी मारहाण केली होती. आज संजय शिरसाट चर्चेत आले आहेत. जे बनियान-चड्डीवर बसले आहेत आणि तिथे बाजूला आम्ही ज्या खोक्यांच्या बद्दल बोलत होतो आधीपासून, ५० खोके एकदम ओके, त्यातला एक खोका तिथे दिसत आहे. पहिली गोष्ट तर ही आहे की एवढे सगळे पैसे आले कुठून? कोणी दिले? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.

पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, जी आयकर विभागाची नोटीस त्यांना आली, त्यावर काय कारवाई केली जाणार? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशावर कारवाई होणार की नाही? एवढा व्हिडिओ समोर आला आणि त्यांना माहीत नाही म्हणतात, ते कोणत्या नशेत होते? याचा देखील तपास झाला पाहिजे.

## पहिल्या डावात इंग्लंड ३८७ धावांवर तंबूत

■ वृत्तसंस्था, लंडन, दि. ११ :
लॉर्ड्स कसोटीच्या पहिल्या डावात भारताने इंग्लंडला ३८७ धावांवर गुंडाळले.

लॉर्डस् कसोटी




बुमराहचे ५ बळी
रूटचे शतक

शुक्रवारी, सामन्याच्या दुसऱ्या दिवशी, इंग्लंडने २५१/४ च्या धावसंख्येवरून खेळण्यास सुरुवात केली. लंच ब्रेकपूर्वी संघाने २७१ धावांवर ७ विकेट गमावल्या होत्या. त्यानंतर, जेमी स्मिथ (५१) आणि ब्रायडन कार्स (५६) यांनी आठव्या विकेटसाठी ८४ धावांची भागीदारी करत संघाची धावसंख्या ३५० च्या पुढे नेली.

लॉर्ड्सवर ९९ धावांवरून डाव सुरू करणाऱ्या जो रूटने १०४ धावा केल्या. त्याला जसप्रीत बुमराहने बोल्ड केले. बुमराहने या डावात ५ विकेट्स घेतल्या. त्याने या मालिकेत दुसऱ्यांदा आणि कारकिर्दीत १५ व्यांदा एका डावात ५ विकेट्स घेतल्या आहेत.

भारतीय संघाने पहिल्या डावात विकेट न गमावता १३ धावा केल्या आहेत. यशस्वी जैस्वाल आणि केएल राहुल नाबाद आहेत. पहिला षटक टाकणाऱ्या ख्रिस वोक्सच्या चेंडूवर जैस्वालने ३ चौकार मारले.

**रूटच्या फलंदाजीशी संबंधित ३ तथ्ये**

रूटने कसोटी क्रिकेटमधील त्याचे ३७ वे शतक झळकावले आहे. सर्वाधिक शतके झळकावण्याच्या बाबतीत त्याने स्टीव्ह स्मिथला मागे टाकले आहे.

रूटने भारताविरुद्ध ३ हजार कसोटी धावा पूर्ण केल्या आहेत.

रूटने इंग्लंडमध्ये ७ हजार कसोटी धावा पूर्ण केल्या आहेत. त्याने दिवसाच्या शेवटच्या षटकात ही कामगिरी केली.

## छत्रपती शिवरायांचे १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत

रायगड, राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्गसह जिंजी किल्ल्याचा समावेश





■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद अशी बातमी समोर आली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा युनोस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे.

यात महाराष्ट्रातील ११ किल्ले रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी तसेच तामिळनाडूतील एक जिंजी या किल्ल्यांचा समावेश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत सोशल मीडियावर पोस्ट करून माहिती दिली आहे.



# विधिमंडळ अधिवेशन

## शिक्षकांच्या निवृत्ती वेतन योजनेत सुधारणेविषयी निर्णय लवकरच : उदय सामंत



**मुंबई :** राज्यभरातील शिक्षकांच्या निवृत्ती वेतन योजनेत सुधारणा करण्यासंदर्भात राज्य शासन लवकरच सकारात्मक निर्णय घेईल, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत दिली. सदस्य सुधाकर अडबाले यांनी शिक्षकांच्या निवृत्तीवेतन योजनेबाबत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री डॉ. सामंत बोलत होते. यावेळी चर्चेमध्ये सदस्य ॲड. निरंजन डावखरे यांनी सहभाग घेतला. सामंत म्हणाले की, राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांना अंशदान निवृत्ती वेतन योजना राज्य शासनाने १ नोव्हेंबर २००५ पासून लागू केली. त्यानंतर २०१५ पासून ही योजना केंद्र शासनाच्या नवीन निवृत्ती वेतन योजनेमध्ये वर्ग करण्यात आली आहे. शिक्षकांना अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्याची बाब सध्या अर्थ विभागाच्या विचाराधीन आहे. त्यावर लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाईल, तसेच महानगरपालिका व नगरपालिकांतील शिक्षकांनाही शालेय शिक्षण विभागातील शिक्षकांप्रमाणेच लाभ मिळावेत यासंदर्भात उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली शालेय शिक्षण मंत्र्यांसोबत लवकरच बैठक आयोजित करण्यात येईल, असेही मंत्री सामंत यांनी यावेळी सांगितले.

## नदीजोड प्रकल्पासाठी निधीची कमतरता भासणार नाही : गिरीश महाजन



**मुंबई :** पश्चिम विदर्भासाठी महत्त्वाचा असणारा नळगंगा - पैनगंगा नदीजोड प्रकल्प हा देशातील सर्वात मोठा प्रकल्प आहे. यासाठी आताच्या सर्वेक्षणानुसार ८९ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित असून या माध्यमातून १५ तालुक्यांमधील ३ लाख ७२ हजार हेक्टरहून अधिक जमीन सिंचनाखाली येईल. तीन टप्प्यात पूर्ण होणाऱ्या या प्रकल्पासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असे जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य अभिजित वंजारी यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. त्यानुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री परिणय फुके, प्रवीण दरेकर, संजय खोडके, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सहभाग घेतला.

## धरण क्षेत्रातील अतिक्रमणे काढण्यासाठी ड्रोनद्वारे सर्वेक्षण : राधाकृष्ण विखे पाटील



**मुंबई :** लघु सिंचन प्रकल्पांमध्ये साचलेला गाळ काढण्यासाठी मृद व जलसंधारण विभागामार्फत 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही योजना राबविण्यात येते. याचबरोबर धरण क्षेत्रातील अतिक्रमणे काढण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला असून याचे ड्रोनच्या माध्यमातून सर्वेक्षण करण्यात येत असल्याची माहिती जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधान परिषदेत दिली. सदस्य डॉ. मनीषा कायंदे यांनी तलावांच्या स्वच्छतेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाचे उत्तर देताना मंत्री विखे-पाटील बोलत होते. यावेळी झालेल्या चर्चेत सदस्य शशिकांत शिंदे यांनी सहभाग घेतला. मंत्री विखे पाटील म्हणाले, लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेंतर्गत शेतकऱ्यांना गाळ वाहून नेण्यासाठी १५ हजार रुपयांच्या मर्यादेत प्रति घनमीटर ३५.७५ रुपयांचा निधी जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत दिला जातो. गाळ काढण्यासाठी यांत्रिकी विभागाकडील यंत्रसामग्रीचा प्रभावी वापर करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## शिक्षकांच्या वेतनात होणाऱ्या विलंबावर सुसूत्रता आणणार : डॉ. पंकज भोयर



**मुंबई :** आदिवासी भागातील शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांना वेतन देण्यात होणाऱ्या विलंबावर राज्य शासन गांभीयार्ने विचार करत असून लवकरच यामध्ये सुसूत्रता आणण्यात येईल, अशी माहिती गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, सहकार, खनिकर्म, शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विधान परिषदेत दिली. सदस्य किरण सरनाईक आणि भाई जगताप यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना डॉ. भोयर म्हणाले की, आदिवासी भागातील शिक्षकांना वेतन वेळेवर न मिळण्याचे कारण म्हणजे आदिवासी विभागाकडून निधी प्राप्त झाल्यावरच त्या भागातील शाळांचे वेतन देण्यात येते. निधीच्या कमतरतेमुळे शिक्षकांना वेळेवर पगार मिळत नाही.

## एमएचटीसीईटी परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी यंत्रणा सज्ज : चंद्रकात पाटील



**मुंबई :** महाराष्ट्र राज्य उच्च व तांत्रिक सामायिक प्रवेश परीक्षा (एमएचटीसीईटी) सुरळीत पार पडावी, यासाठी राज्यातील पॉलिटेक्निक इंजिनिअरिंग महाविद्यालयांना संगणक आणि फर्निचर पुरविण्यात आले आहे. त्यामुळे आता एमएचटीसीईटीच्या परीक्षा पॉलिटेक्निक इंजिनियरिंग महाविद्यालयामध्ये घेतल्या जात आहेत, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानपरिषदेत सांगितले. राज्यात झालेल्या एमएचटीसीईटीच्या परीक्षेत झालेल्या चुकांसंदर्भात सदस्य अभिजीत वंजारी यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाचे उत्तर देताना मंत्री चंद्रकांत पाटील बोलत होते. पाटील म्हणाले की, यावर्षीची एमएचटीसीईटी परीक्षा २८ सत्रांमध्ये झाली. यातील एकाच केंद्रावरिल इंग्रजी भाषेतील प्रश्नपत्रिकेत २१ प्रकारच्या त्रुटी होत्या. त्यामुळे शासनाने लगेच ५ मे २०२५ परीक्षा घेतली आहे. तथापि, या परीक्षेत झालेल्या त्रुटीसंदर्भात जबाबदार तीन सदस्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.

## बदलत्या सकारात्मक विचारधारेचा युवा धोरणात समावेश परिवर्तन घडवेल

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**

विकसित भारत २०४७ च्या दृष्टीने सुधारित युवा धोरणाची आखणी करावी. नव्या आव्हानांना सामोरे जाणाऱ्या युवकांच्या बदलत्या विचारसरणीचा समावेश युवा धोरणात केल्यास परिवर्तन शक्य आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

विधानभवन येथे राज्याच्या सुधारित युवा धोरणासाठी गठित समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा व युवक कल्याण मंत्री तथा समितीचे अध्यक्ष दत्तात्रय भरणे, आमदार अमोल मिटकरी, श्रीकांत भारतीय, संतोष दानवे, राजेश पवार, आशुतोष काळे, प्रवीण दटके, देवेंद्र कोठे, सुहास कांदे, डॉ. बाबासाहेब देशमुख, प्रकाश सुर्वे, वरुण सरदेसाई, रोहित पाटील, युवा बिरादरीचे संस्थापक पद्मश्री क्रांती शाह, आयुक्त शीतल तेली तसेच राज्य व राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार विजेते उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, युवकांचे विचार, त्यांच्या अपेक्षा समजून घेत धोरण आखले गेले तर ते समर्पक ठरेल. शहरी व ग्रामीण भागातील युवकांना समान संधी मिळावी यासाठी प्रशिक्षण, सुविधा आणि योजनांचा समावेश असलेले समतोल धोरण तयार करणे आवश्यक आहे. युवक कल्याण विभागाबरोबरच अन्य विभागांनीही हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे.

शाळा, महाविद्यालये, सोशल मीडिया आणि सेवा क्षेत्रातील प्रतिनिधींनाही धोरणात सहभागी करून त्यांच्या सूचना समाविष्ट करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी आज दिले. बैठकीत आमदार आणि निमंत्रित सदस्यांनीही सूचना मांडत समृद्ध धोरणासाठी योगदान दिले.

यावेळी क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन विविध उपक्रम राबवित आहे. शहरी, ग्रामीण आणि आदिवासी भागातील युवकांच्या गरजा ओळखून, देश-विदेशातील युवकांबाबतच्या धोरणांचा अभ्यास करून, प्रत्यक्ष संवादातून उपाययोजना आखल्या जातील. नवे सुधारित युवा धोरण यामध्ये शिक्षण, रोजगार, उद्योजकता, बौद्धिक व सामाजिक विकास, स्टार्टअप, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (अक) याबरोबरच जबाबदारीची जाणीव, राष्ट्रप्रेम, नेतृत्वगुण रुजवणे यावर भर दिला जाणार आहे. यासाठी राज्य व जिल्हास्तरावरील योजना, युवा प्रशिक्षण केंद्र, युवा पुरस्कार, वसतीगृहे, महोत्सव, व्यक्तिमत्व विकास उपक्रम, युवा निधी आणि युवा प्रतिष्ठा निर्देशांक आदी बाबींचा समावेश केला जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## बेस्ट बसचा अपघात ६ जण जखमी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**

मुंबईत बेस्ट बसच्या अपघाताची घटना समोर आली आहे. पश्चिम द्रुतगती मार्गावर गोरेगाव परिसरात, वनराई पोलिस स्टेशनच्या हद्दीत गुरुवारी सकाळी सव्वा सहाच्या सुमारास हा अपघात घडला. बोरिवलीहून अंधेरीच्या दिशेने निघालेली बेस्ट बस नियंत्रण सुटल्यामुळे एका ट्रकला मागून धडकली. बसचा वेग प्रचंड असल्यामुळे धडक जबरदस्त होती. या अपघातात बसमधील पाच ते सहा प्रवासी गंभीर जखमी झाले असून, त्यांना तात्काळ जोगेश्वरी येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातात बेस्ट बसच्या पुढील बाजूस आणि ट्रकच्या मागच्या भागाला मोठे नुकसान झाले. सुदैवाने सकाळची वेळ असल्याने बसमध्ये प्रवासी कमी होते आणि मोठा अनर्थ टळला.

# शेतजमीन, बांध रस्त्यांवरील वादांवर तोडगा काढण्यासाठी मोजणी मोहीम

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**

शेतकऱ्यांच्या शेतजमीन, बांध आणि रस्त्यांवरील वादांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी राज्यव्यापी शेतजमीन मोजणी मोहीम राबवणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सभागृहात दिली. परिषदेत आमदार शिवाजीराव गर्जे यांनी शेतकऱ्यांच्या शेतजमीन, बांध आणि रस्त्यांवरील वादांबाबत लक्षवेधी मांडली.

आमदार गर्जे यांनी म्हटले की, राज्यात शेतकऱ्यांमधील बांध आणि रस्त्यांवरील वादांमुळे कायमस्वरूपी दुश्मनी, कोर्टकचेरी आणि गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. सातबारा उताऱ्यावरील नोंदी आणि प्रत्यक्ष जमीन क्षेत्रातील तफावतीमुळे शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती खुंटत आहे. त्यांनी प्रत्येक शेतकऱ्याच्या जमिनीची मोजणी करून कायमस्वरूपी खुणा आणि हद्द निश्चित करण्यासाठी राज्यव्यापी मोहीम राबवण्याची मागणी केली आहे. बावनकुळे यांनी उत्तरात सांगितले की, १८९० ते १९३० दरम्यान झालेल्या मूळ सर्वेक्षणानंतर १९६० ते १९९३ पर्यंत एकत्रीकरणाचे काम झाले. तथापि, सातबारा नोंदींमधील त्रुटी आणि पोटहिस्सा दुरुस्तीच्या अभावामुळे वाद निर्माण झाले आहेत. आमदार शशिकांत शिंदे यांनी रस्त्यांवरील अतिक्रमण आणि नवीन रस्त्यांच्या मागणीबाबत विचारले. यावर बावनकुळेंनी पूर्वीचा रस्ता असेल तर नवीन रस्त्याची गरज नाही, असे स्पष्ट करत कडक आदेश जारी करण्याचे आणि डिजिटलायझेशनद्वारे रस्त्यांचे नकाशे अपडेट करण्याचे आश्वासन दिले. गावाच्या शीव आणि रस्त्यांवरील अतिक्रमणांचा मुद्दा उपस्थित केला. यावर बावनकुळे यांनी गावाच्या शीव उघडण्यासाठी जीआय सर्वेक्षण आणि अतिक्रमण केलेल्या जागांना स्वतंत्र सर्व्हे क्रमांक देण्याचे आश्वासन दिले.



**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची माहिती**

# रील करणे पडले महागात

## स्टंट करताना कार थेट दरीत कोसळली

■ **महासागर प्रतिनिधी, सातारा, दि. ११ :**

साताऱ्याच्या पाटण तालुक्यात एका धक्कादायक घटनेत, इंस्टाग्राम रीलसाठी धोकादायक स्टंट करत असताना चालकाची कार 300 फूट खोल दरीत कोसळली. ही घटना बुधवारी दुपारी 4 वाजता सदावाघापूर परिसरात घडली. चालकाचे नाव साहिल जाधव (20, रा. गोळेश्वर, कराड) असे आहे. तो अपघातात गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.



या घटनेचा एक व्हिडिओ समोर आला आहे. व्हिडिओमध्ये स्टंट करताना गाडीचे नियंत्रण सुटले आणि ती अचानक दरीत पडली. म्हावशी येथील स्थानिक गुराखी मंगेश जाधव आणि किंगमेकर अकादमीच्या विद्यार्थ्यांनी अपघातात गंभीर जखमी झालेल्या साहिल जाधवला वाचवले. ज्या ठिकाणी ही घटना घडली त्या भागाला 'टेबल पॉइंट' म्हणून ओळखले जाते, जे पर्यटकांमध्ये लोकप्रिय आहे, परंतु सुरक्षा रेलिंग नसल्यामुळे हे ठिकाण धोकादायक बनत आहे. अपघाताचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, स्थानिकांनी तातडीने सुरक्षा उपाययोजना आणि रेलिंग बसवण्याची मागणी केली आहे.

## २६ जुलै रोजी १३ डोंगरांमधून धावण्याची स्पर्धा

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ११ :**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सर्वात थरारक आणि साहसी कात्रज ते सिंहगड (के2एस) 'मान्सून ॲडव्हेंचर रेस' ही स्पर्धा येत्या २६ जुलै रोजी होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन गिरीप्रेमी संस्थेचे प्रमुख उमेश झिरपे, बांदल ग्रुपचे निलेश बांदल यांच्या हस्ते होणार आहे. यानिमित्ताने पुन्हा एकदा पुणेकरांना थरारक, साहसी अनुभव घेता येणार आहे, अशी माहिती स्पर्धेचे संयोजक व लाईफ फिट अरेनाचे संचालक महेंद्र लोकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी स्पर्धेच्या कोअर टीमचे सदस्य राजू लोकरे व विजय नांदगावकर उपस्थित होते.

महेंद्र लोकरे म्हणाले, कात्रज ते सिंहगड मॉन्सून ॲडव्हेंचररेस २.० ही अनोखी स्पर्धा कात्रज बोगद्याच्या टोकापासून सिंहगड किल्ल्याच्या पायथ्यापर्यंतच्या १३ डोंगरांमधून २१ किमीचा प्रवास करते. ही स्पर्धा केवळ धावण्यासाठी नाही, तर सहनशक्ती, इच्छाशक्ती आणि आत्मविश्वासाची खरी परीक्षा पाहणारी आहे. 'के2एस ट्रेलब्लेझर' ही स्पर्धात्मक २१ किलोमीटर व 'के2एस ॲडव्हेंचर रन' ही ७ किलोमीटर अशा दोन गटात ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्याची अंतिम तारीख १५ जुलै २०२५ अशी आहे.

स्पर्धात्मक गटासाठी असलेल्या 'के2एस ट्रेलब्लेझर'ची सुरुवात सकाळी ७ वाजता कात्रज जुन्या बोगद्यापासून होणार असून, सिंहगड किल्ला पायथ्यापर्यंत सात तासांत ही स्पर्धा पूर्ण करणे आवश्यक असणार आहे. 'के2एस ॲडव्हेंचर रन'ची सुरुवात सकाळी ८ वाजता होणार असून, यामध्ये चालण्यासह पळता किंवा ट्रेक करता येणार आहे.

सर्व वयोगटात आकर्षक व रोख बक्षिसे दिली जाणार असून, सहभागी होणाऱ्या प्रत्येकास टाइमिंग बिब, ड्राय फिट टी-शर्ट, फिनिशर मेडल, रेसनंतर नाश्ता, वैद्यकीय आपत्कालीन सेवा, माउंटन रेस्क्यू व स्वयंसेवक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. २१ किमी स्पर्धात्मक गटासाठी १८ ते ३५ वर्षे - पुरुष/महिला (ओपन श्रेणी), ३६ ते ४५ वर्षे - पुरुष/महिला, ४६ वर्षे व त्यापेक्षा अधिक - पुरुष/महिला (व्हेटरन कॅटेगरी) पात्र असणार आहेत.

# राज्यातील अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी बैठक घेणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**

राज्यातील रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करून यासंदर्भात लवकरच केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत संयुक्त बैठक घेण्यात येईल, असे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विधानसभेत सांगितले. विधानसभा सदस्य विजयसिंह पंडित यांनी बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या दुर्दैवी अपघातात प्रवाशांचा मृत्यू प्रकरणी लक्षवेधी सूचना मांडली होती. या लक्षवेधी सूचनेस उत्तर देताना मंत्री . भोसले बोलत होते.



मंत्री भोसले म्हणाले, रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी रोड सेल्फी असिस्ट आधुनिक तंत्रज्ञानाधारित प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे रस्त्यावरील विविध धोकादायक ठिकाणांची प्रत्यक्ष छायाचित्रांसह नोंद घेतली जाते. तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा रस्ता सुरक्षा समिती गठीत करण्यात आली असून यामध्ये तांत्रिक अधिकाऱ्यांचा समावेश आहे. बीड जिल्ह्यातील रस्ते अपघात आणि आवश्यक उपाययोजना संदर्भात उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक घेऊन आवश्यक उपाययोजना राबवण्यात येतील. तसेच महामार्गावरील अपघातप्रवण ठिकाणांवर तांत्रिक सुधारणा, संकेतचिन्हे, गती नियंत्रण यंत्रणा, वळणांवरील संरक्षक उपाययोजना सारख्या आवश्यक पायाभूत सुधारणा करण्यात येतील.

## पार्टीसाठी आल्यानंतर फार्महाऊसवर गोळीबार

**पिंपरी :** पार्टीसाठी फार्महाऊसमध्ये आलेल्या एकाने पिस्तुलातून दोनवेळा हवेत गोळीबार केल्याची घटना सुसगाव येथे उघडकीस आली. याप्रकरणी दिनेश बाबुलाल सिंह (वय ४०, रा. मामुर्डी, देहूरोड) याला पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत देवराम दिनेश वर्मा (वय २४, रा. सुसगाव) यांनी बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनेश याने पार्टीदरम्यान स्वतःकडील पिस्तुलमधून दोन वेळा हवेत गोळीबार केला. यामुळे नागरिकांची सुरक्षितता धोक्यात आली. तसेच सार्वजनिक शांतता भंग होऊन परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी गोळीबार करणाऱ्या दिनेश याला अटक केली आहे. बावधन पोलीस तपास करीत आहेत. पिस्तुल घेऊन आलेल्या एका तरुणास पोलिसांनी अटक केली. ही कारवाई गुरुवारी (१० जुलै) दुपारी सव्वाएक वाजताच्या सुमारास बैलगाडा घाट, भोसरी येथे केली.

## झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनाबाबत शासन सकारात्मक : माधुरी मिसाळ

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**

पनवेल महापालिकेच्या आसूड गाव परिसरातील झोपडपट्ट्या निष्कासित केलेल्या नागरिकांच्या पुनर्वसनाबाबत तातडीने धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल. तोपर्यंत प्रभावित नागरिकांना जीवनावश्यक सुविधा तत्काळ उपलब्ध करून देण्याचे निर्देश नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले आहेत. पनवेल महापालिकेच्या आसूड गाव परिसरातील झोपडपट्ट्या हटवल्यानंतर बेघर झालेल्या नागरिकांनी आपल्या मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदानात आमरण उपोषण सुरू केले होते. या आंदोलनाची दखल घेत राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आंदोलनस्थळी भेट देत आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारले. त्यावेळी त्यांनी आंदोलनकर्त्यांना आश्वस्त केले.



**जालना :** कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना लि.,अंकुशनगर, ता.अंबड या कारखान्यास वर्ष २०२३-२४ करीता आर्थिक व्यवस्थापन क्षेत्रातील उत्तम कामगिरीबद्दल महाराष्ट्र राज्यातून आर्थिक व्यवस्थापनाबद्दल प्रथम क्रमांकाचे पारितोषीक" राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघ, नवी दिल्ली यांच्याकडून मिळाल्यामुळे त्यांचे अभिनंदन करताना सीए गोविंदप्रसाद मुंदडा आणि अविनाश कव्हळे

# ॲपवर आधारित बसेस, कार, बाईक टॅक्सी यांनी नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई

## प्रताप सरनाईक यांचे निर्देश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**

राज्यातील बसेस, कार, बाईक टॅक्सी यांनी ॲपवर आधारित राज्यात व्यवसाय करताना कायदेशीर तत्वांचे पालन करणे आवश्यक आहे. खासगी वाहतूक व्यवसाय करणाऱ्या बसेस, कार, बाईक टॅक्सी यांनी नियमांचे उल्लघंन केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

विधानभवन येथे ॲपवर आधारित बसेस, कार, बाईक टॅक्सीच्या विविध विषयासंदभार्तील बैठकीत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक बोलत होते. यावेळी परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यासह परिवहन विभागाचे इतर अधिकारी उपस्थित होते.



परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, राज्य शासन नेहमीच या क्षेत्रात होणाऱ्या सकारात्मक बदलांसाठी नाविन्यपूर्ण उपक्रमांना पाठबळ देत आले आहे.

कोणत्याही ॲपवर आधारित बसेस, कार, बाईक टॅक्सी यांनी कायदेशीर बाबींचे पालन करूनच वाहतूक व्यवसाय केला पाहिजे. राज्य शासनाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर शासन कडक कारवाई करेल. ॲपवर आधारित बसेस, कार, बाईक टॅक्सी यांनी केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन होणे अत्यंत आवश्यक आहे. अर्थात, शासनाने बनविलेले नियम हे प्रवाशांच्या हिताचे असल्यामुळे त्यांच्या हिताचे संरक्षण होणे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन झाल्यास कडक कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## कांदळवनांच्या संरक्षणासाठी नियमन समितीची बैठक घेणार : पंकजा मुंडे

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**



कांदळवन हे समुद्रापासून संरक्षणासाठी नैसर्गिक संरक्षण भिंत असून कांदळवनांचे संरक्षण आणि संवर्धन करणे पर्यावरणाच्या समतोलासाठीही महत्वाचे आहे. यासंदर्भात किनारपट्टी नियमन समिती (सीआरझेड) गठीत करण्यात आली आहे.

या समितीची पहिली बैठक संबंधित यंत्रणा आणि जिल्हाधिकारी यांच्यासमवेत आयोजित करण्यात येईल, असे पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. कांदळवनांच्या संरक्षणाबाबत सदस्य शांताराम मोरे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्या नाना पटोले यांनीही सहभाग घेतला. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, कांदळवनांच्या संरक्षणाची जबाबदारी सामूहिक आहे. कुठेही अवैधरित्या भराव किंवा डेब्रिज टाकून अतिक्रमण करण्यात येत असल्यास त्यांच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल.

# जुगार खेळणाऱ्या आरोपीवर अकोट फाईल पोलीसांची कारवाई ;११ आरोपी ताब्यात

**अकोला :** पो.स्टे. ला गुप्त बातमी दाराकडुन माहीती मिळाली की, मलीक चौक अकोट फाईल भागात सार्वजनिक ठिकाणी बसुन काही ईसम ५२ ताश पत्याचा हातजितचा जुगारचा खेळ खेळत आहे. अशा खात्रीलायक बातमीची माहीती पो. नि. श्री. रहीम शेख यांना देवुन त्यांचे मार्गदर्शना खाली पोस्टॉफ एएसआय / १३८१ अनिस पठाण, पो हवा / २२२ योगेश काटकर, पोहवा / १५०० प्रशांत इंगळे, पो हवा / ५५२ संतोष चिंचोळकर, पोहवा / २११४ हर्षल



श्रीवास पो. कॉ. / २३५७ गिरीश तिडके, पोका / २१५५ ईमरान शाह, पोका / २१५२ अमिर शेख असे मलीक चौक अकोट फाईल अकोला येथे जावुन आरोपी नामे एकुण १,०१,४०० रूपयाचा मुददेमाल जप्त करून गुन्हे नोंद करून कार्यवाही करण्यात आली

# चांगले उत्पन्न असणाऱ्यांनी शासकीय अन्नधान्य योजनेतून बाहेर पडा

## जिल्हा पुरवठा विभागाचे 'गिव्ह इट अप' अभियान

■**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**

**सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे गरजूंना स्वस्त अन्नधान्याचे वितरण होते. अनेकदा उत्पन्न वाढलेल्या किंवा अधिक उत्पन्न असलेल्या व्यक्तीही त्याचा लाभ घेतात. अशा व्यक्तींनी या अन्नधान्य योजनेतून स्वत:हून बाहेर पडावे यासाठी जिल्हा पुरवठा विभागातर्फे 'गिव्ह इट अप' अभियान राबविण्यात येत आहे.**

योजनेत गरजवंत, गोरगरीब व बेरोजगार नागरिकांना स्वस्त दरात दरमहा अन्नधान्य व आवश्यक वस्तू उपलब्ध करून दिल्या जातात. गहू, तांदूळ, धान्य, साखर अशा वस्तूंचा लाभ रास्त भाव दुकानांमार्फत अंत्योदय अन्न व प्राधान्य कुटुंब योजनेच्या शिधापत्रिकाधारकांना देण्यात येतो. मात्र ज्यांचे उत्पन्न शासनाच्या निर्धारित निकषांपेक्षा अधिक आहे. अशा लाभार्थ्यांनी स्वखुशीने 'गिव्ह इट अप'उपक्रमात सहभागी होऊन शिधा योजनेतून बाहेर पडावे, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी रविंद्र यन्नावार यांनी केले आहे. शासनाने शिधापत्रिका लाभासाठी उत्पन्न मर्यादा निश्चित केल्या असून, अंत्योदय शिधापत्रिकेसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा १५ हजार रु., नागरी प्राधान्य कुटुंबासाठी ५९ हजार रुपये व ग्रामीण भागासाठी ४४ हजार रु. आहे. जिल्ह्यातील अनेक नागरिकांनी शिधापत्रिका काढताना कमी उत्पन्न दर्शवले असून, प्रत्यक्षात त्यांचे उत्पन्न अधिक आहे. अशामुळे गरजू लाभार्थ्यांना शिधा मिळण्यात अडचणी येत आहेत.

त्यामुळे अशा पात्र शिधापत्रिका धारकांनी स्वत:हून या धान्य योजनेतून बाहेर पडावे, असे आवाहन करण्यात आले आहे.जे लाभार्थी उत्पन्न मर्यादा वाढूनही धान्याचा लाभ घेत आहेत. त्यांचे नाव लाभार्थी यादी मधून वळिवण्यात येऊन अशी शिधापत्रिका रद्द करून फौजदारी कारवाई करण्यात येईल. या योजनेसंबंधित नागरिकांनी संबंधित तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा.

# बालगृहातील दोन मुलांच्या पालकांचा शोध सुरू

## बाल संरक्षण कक्षाचे माहितगारांना आवाहन



■**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**

जिल्हा बाल संरक्षण कक्षाकडून बालगृहात दाखल दोन बालकांच्या पालकांचा शोध घेण्यात येत आहे. पालक, नातेवाईक, माहितगारांनी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.सुर्योदय बालगृहात ज्ञानेश्वरी आणि रुद्र विकम खोटे ही बालके दि. २९ डिसेंबर २०१३ पासुन दाखल आहेत. या मुलांच्या पालक, नातेवाईक व माहितगारांनी सुर्योदय बालगृह चे अधिक्षक शिवराज पाटील ९०२८२३३०७७, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजू लाडूलकर ९४२४४६४५६६ यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांनी केले.

# आपले सरकार सेवा केंद्राने जादा दर आकारल्यास तक्रार करा

## जिल्हा प्रशासनाचे आवाहन

■**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**

आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना विविध दाखले, प्रमाणपत्रे प्रदान केल्या जातात. या सेवेचे दर नियमानुसार निश्चित आहेत. कुणीही केंद्रचालक किंवा दलाल अतिरिक्त दर आकारत असेल तर तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांच्याकडे तक्रार करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीने सर्वसामान्य नागरिकांना व विद्यार्थ्यांना विविध दाखले मिळतात. जातीचे प्रम णपत्र, उत्पनाचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, सर्वसाधारण प्रतिज्ञापत्र व रहिवाशी प्रमाणपत्र याकरिता संबंधित सेवा केंद्रावर आपला अर्ज कागदपत्रांसह ऑनलाइन पद्धतीने भरणे आवश्यक आहे. त्यानंतर कागदपत्रे डिजिटल स्वरूपात तहसील कार्यालयामध्ये पाठविण्यात येतात.तहसील कार्यालयामध्ये तपासणी करून उत्पन्नाचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र व सर्वसाधारण प्रतिज्ञापत्र व रहिवाशी प्रमाणपत्र तहसील कार्यालयामधून दिले जाते. तर जातीचे प्रमाणपत्र व नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयाकडून निर्गमित करण्यात येतात. सदर प्रमाणपत्रावर डिजिटल स्वाक्षरी झाल्यानंतर प्रमाणपत्र पुन्हा ऑनलाइन पद्धतीनेच आपले सरकार सेवा केंद्रावर पाठविण्यात येते. आपले सरकार सेवा केंद्रातून नागरिकांना वितरीत करण्यात येतात, त्यामुळे नागरिकांना नागरिकांना प्रत्यक्षात कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही. आपले सरकार सेवा केंद्रचालकांनी सुधारित दरफलक व तक्रारीबाबतचा क्यूआर केंद्राच्या दर्शनी भागावर प्रसिध्द करणे अनिवार्य आहे. कुणीही केंद्रचालक जादा दर आकारत असतीस त्यांच्यावर कडक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# दहीहंडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडून आरोग्य कर्मचाऱ्यांचा मानसिक छळ?

## त्रीसदस्य समितीकडून संघटनेची चौकशीची मागणी

■**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**

प्राथमिक आरोग्य केंद्र दहीहंडा येथे कार्यरत असलेल्या प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. शरयू मानकर यांच्याकडून आरोग्य कर्मचाऱ्यांना मानसिक छळ व अपमानास्पद वागणूक मि ळत असल्याबाबतचा धक्कादायक गंभीर बाब उघडकीस येऊन येथे कार्यरत असलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांनी आरोप केला आहे व याबाबतचे तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम मॅडम यांना ११ /७/ २०२५ रोजी व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर बळीराम गाढवे यांना तक्रार देण्यात आला आहे. तसेच प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. शरयु मानकर



यांची प्रशासकीय ८ मुद्द्यावर जिल्हा त्रीसदस्य समितीकडून चौकशी करण्यात यावी याबाबतचे निवेदन महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटना अकोला यांच्या वतीने देण्यात आले आहे.प्राथमिक आरोग्य केंद्र दहीहंडा येथील प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉक्टर शरयू मानकर यांच्यावर खालील मुद्द्यावर आधारित तक्रार दाखल करण्यात आली आहे. आवश्यक असलेल्या प्रशासकीय दस्तावेज वर सह्या न करणे पी. एल. पी. वर सह्या न करणे, आरोग्य कर्मचाऱ्यांना अपमानास्पद उद्धट व असभ्य भाषेचा वापर करणे, कर्मचाऱ्यांना गरज असल्यास त्याचा मंजूर न करणे, आरोग्य कर्मचाऱ्यांच्या रजा बिन पगारी करणे, प्राथमिक आरोग्य केंद्र दहीहंडा येथे आलेल्या प्रस्तुती स्वतः न करता इतर कडून करून घेणे, हेतू पुरस्कार जवळच्या कर्मचाऱ्याकरिता इतर कर्मचाऱ्यांची नियमबाह्य ड्युटी लावणे.

स्वतःच्या मनाने आरोग्य कर्मचाऱ्यांची मेडिकल्यू रजा करणे, त्यांच्यासह अनेक बाबतीत त्यांची तक्रार करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटना यांच्या वतीने दहीहंडा येथील प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. शरयू मानकर यांची ८ प्रशासकीय मुद्द्यावर जिल्हा त्रीसदस्य समि तीकडून चौकशी करण्यात यावी. याबाबतचे निवेदन देण्यात आले आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटनेच्या

# जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त १५ जुलैला विशेष 'प्लेसमेंट ड्राईव्ह'

■**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागांतर्गत जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त १५ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात सकाळी १० वा. विशेष प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे.जास्तीत जास्त नोकरी इच्छुक उमेदवारांनी ऑनलाइन अर्ज नोंदवून आपले शैक्षणिक कागदपत्रे, तसेच पासपोर्ट फोटोसह जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा कौशल्य विकास व रोजगार मार्गदर्शन केंद्रात उपस्थित राहून रोजगार संधीचा लाभ घ्यावा.

असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास अधिकारी प्रफुल्ल शेळके यांनी केले आहे. मेळाव्यात 'इनोट्रो मल्टीसर्विसेस'मध्ये रिक्त १० पदे भरण्यात येतील. शैक्षणिक पात्रता पदवीधर आणि संगणकाचे ज्ञान आवश्यक आहे. 'शोपन्झा सर्व्हिसेस' मधील २० रिक्त पदांसाठी शैक्षणिक पात्रता १० वी, १२ वी किंवा पदवीधर असणे आवश्यक आहे.

भारतीय जीवन विमा महामंडळाच्या २५ पदे केवळ महिलांसाठी आहेत. त्यासाठी शैक्षणिक पात्रता किमान १२ वी उत्तीर्ण आवश्यक आहे. 'उत्कर्ष स्मॉल फायनान्स' येथील ५५ रिक्त पदांसाठी किमान १२ वी, पदविका किंवा पदवीधर असणे आवश्यक आहे. रोजगार मेळाव्यात ऑनलाइन सहभाग नोंदविण्यासाठी www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

# थोडक्यात

## बालाजी विद्यामंदिर कॉन्व्हेंट येथे गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुपूजन उत्साहात साजरा



**अकोला** : वाढत्या पाश्चात्त्य संस्कृतीचे प्रमाण लक्षात घेता आपण भारतीय संस्कृतीला विसरत चाललो आहे परंतु भावी पिढीने संस्कृतीचे व संस्काराचे जतन केले पाहिजे त्यासाठी बालाजी विद्यामंदिर कॉन्व्हेंट शाळा सतत अभिनव उपक्रम राबवत नवनवीन कार्यक्रम आयोजित करत असते. प्रत्येकाच्या जीवनात आईलाच पहिला गुरु म्हटले आहे. त्यामुळेच आई माझा पहिला गुरु आई हि कल्पतरू असे म्हणतात. त्याचप्रमाणे शिक्षकांचे हे भविष्यासाठी खुप महत्व आहे आणि शिक्षकांचे विषयी प्रत्येक विद्यार्थ्याला आदर असावा हा निस्वार्थ दृष्टिकोन समोर ठेवून गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांनी आपल्या आईचे पूजन केले नंतर आपल्या वर्ग शिक्षकांचे पूजन करून प्रसादाचे वाटप केले. या अभिनव कार्यक्रमाच्या माध्यम ातून या बालवयातच विद्यार्थ्यांना आपल्या आई व आपल्या शिक्षकांच्या विषयी आदर करण्याची शिकवण मिळाली असल्याने आज जगात मोठ्यांना अपमानास्पद वागणूक देणे व आईवडिलांना म्हातारपणात घराबाहेर काढणे अश्या अनेक चालत आहेत व ह्या गोष्टींना भविष्यात आळा बसावा असाही प्रयत्न या कार्यक्रमातुन करण्यात आला.

# मिशन उडाण अंतर्गत आयोजित पोस्टर स्पर्धेमध्ये वसंतराव नाईक कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पातूर तालुक्यातून अव्वल

■**पातुर,दि ११ (प्रतिनिधी) :**

अकोला पोलीस दलाच्या वतीने मिशन उडान अंतर्गत पोलीस अधीक्षक अकोला मा. अर्चित चांडक साहेब यांच्या संकल्पनेतून जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त पोस्टर स्पर्धेचे शालेय व महाविद्यालयीन गटात नुकतेच आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेमध्ये अकोला जिल्ह्यामधून बहुसंख्य विद्यार्थ्यांनी आपला उत्स्फूर्त असा सहभाग नोंदविला होता . या स्पर्धेचा निकाल नुकताच लागला असून या स्पर्धेमध्ये वसंतराव नाईक विद्यालय व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय पातुर येथील वर्ग १२ वी विज्ञान मधील कु. आरती सुरेंद्र तायडे व कु.तृप्ती भैरवनाथ खराट या दोन विद्यार्थिनींच्या पोस्टर ची पातुर तालुक्यातून निवड करण्यात आली. या स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा नुकताच अकोला येथे संपन्न झाला असून यामध्ये कु. तृप्ती खरात व कु.आरती तायडे यांचा पोलीस अधीक्षक अकोला मा.श्री आर्चित चांडक साहेब यांच्याहस्ते प्रशस्तीपत्र व बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. विशेष म्हणजे या विद्यार्थिनींनी काढलेले पोस्टर पोलीस अधीक्षक कार्यालय अकोला येथे फ्रेम करून लावण्यात येणार आहेत ही अभिमानास्पद बाब आहे. विद्यार्थिनींच्या या घवघवीत यशाबद्दल त्यांचे संस्थेचे संस्थापक /सचिव मा. श्री रामसिंगजी जाधव साहेब यांनी कौतुक केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थिनींना पातुरचे ठाणेदार मा.हनमंत




डोपेवाड (पोलिस निरीक्षक),मा. श्री.अभिषेक नवघरे (पोलीस उपनिरीक्षक) महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.एस.एम सौंदळे तसेच कलाशिक्षक श्री.चंद्रकांत वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थिनींच्या या नेत्रदीपक यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरावरून कौतुक केले जात आहे.

# मानवाधिकार आयोगातर्फे लघुपट स्पर्धा जाहीर

**अकोला :** राष्ट्रीय मानवाधिकार आयोगातर्फे राष्ट्रीय लघुपट स्पर्धा २०२५ जाहीर करण्यात आली आहे. त्यात पहिल्या तीन क्रमांकांना अनुक्रमे दोन लाख, दीड लाख व एक लाख रू. अशी भरघोस बक्षीसे जाहीर करण्यात आले आहेत. त्याखेरीज ४ उल्लेखनीय कलाकृतींना ५० हजार रू. चे पारितोषिकही दिले जाणार आहे. रोख रकमेसह मानचिन्ह, प्रशस्तीपत्र दिले जाणार आहे.लघुपट कुठल्याही भारतीय भाषेत इंग्रजी सबटायटल्ससह किंवा इंग्रजी भाषेत असावा. लघुपटाची लांबी ३ मिनीटांहून कमी आणि १० मि नीटांहून जास्त असू नये.

# बाल विवाह टाळा ! कायद्याची अंमलबजावणी करा

**– डॉ. बळीराम गाढवे,जिल्हा आरोग्य अधिकारी अकोला.**

■**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**

२६ वा जागतिक लोकसंख्या दिन ११ जुलै २०२५ रोजी अकोला जिल्ह्यात विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला .अनिता मेश्राम मुख्य कार्यकारी अधिकारी व डॉ कमलेश भंडारी उपसंचालक आरोग्य सेवा यांचे मार्गदर्शनाखाली डॉ बळीराम गाढवे जिल्हा आरोग्य अधिकारी अकोला व डॉ तरंगतुषार वारे जिल्हा शल्य चिकित्सक यांनी नियोजन करून जिल्ह्यात जागतीक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे निमित्ताने शाळा, महाविद्यालये ,रुग्णालये तसेच गाव पातळीवर आरोग्य सेवा सत्राचे ठिकाणी, गट सभेच्या माध्यमातून विद्यार्थी ,शिक्षक ,ग्राम स्थांना एकत्रीत करून लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम, उदभवत असलेल्या समस्या,



लोकसंख्या नियंत्रणासाठी चे उपाययोजना, संतती प्रतिबंधासाठी चे साधन उपलब्धता त्याचे फायदे वापर शासकीय आरोग्य संस्थेत याबाबत असलेल्या योजना जसे की पुरूष नसबंदी शस्त्रक्रिया केल्यानंतर १४५० रु लाभार्थी ना मिळतात, शस्त्रक्रिये करीता वाहन व्यवस्था ईतर सर्व साधनांबाबत माहिति देण्यात आली

विद्यार्थी रॅली काढून घोषणा देऊन जनजागृती करण्यात आली.वृत्तपत्र लेख, मोबाईल सोशल मीडिया वापर करून जनजागृती करण्यात आली. याकरिता लोक प्रतिनिधी ना सहभागी करून त्यांचे माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले.

# अकोट वसुंधरा ज्ञानपीठात 'आई माझा गुरु मी तिचे लाडके लेकरू'

**कु.चंचल पितांबरवाले**

■**अकोट,दि ११ (प्रतिनिधी) :**

स्थानिक वसुंधरा इंग्लिश हायस्कूल मध्ये गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून 'आई माझा गुरु, मी तिचं लाडकं लेकरू' या अनोख्या उपक्रमाच्या माध्यमातून गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमा ची सुरुवात राजमाता जिजाऊ व विद्येची आराध्य देवता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून शिक्षिका माधुरी झटाले ,



पालक प्रतिनिधी म्हणून शितल नवले व भाग्यश्री हाडोळे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक शिवचरण नारे व शाळेच्या पर्यवेक्षिका छाया बनकर यांनी गुरुचे जीवनातील अनमोल स्थान यावर विचार व्यक्त केले.तसेच नेहा खारकर यांनी सुंदर कविता सादर केली. यानंतर नर्सरी ते के.जी.२ च्या विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांचे पूजन करून 'आई माझा गुरु, मी तिचं लाडकं लेकरू' हा उपक्रम साकारला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका पुष्पा खोडके तर आभार प्रदर्शन श्रुती गावंडे यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात संजय वाकडे ,स्मि ता देशमुख, स्मिता कुलट, रवींद्र भावणे ,संगीता पहुरकर ,शितल फोकमारे , अक्षय काळे, प्रशांत वाघ, राधिका बोंडे , श्रमिका झामरे, स्मिता नायसे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# "सफाई अपनाओ,बिमारी भगाओ अभियान"अंतर्गत मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

■**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**

शासनाच्या निर्देशानुसार तसेच मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये दि. १ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत अकोला महानगरपालिका क्षेत्रात 'सफाई अपनाओ बिमारी भगाओ' अभियान राबविण्यात येत असून त्या अनुषंगाने सफाई अपनाओ बीमारी भगाओ अभियान २०२५ चा उद्देश 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' या अभियानाच्या ब्रीदवाक्याला पुढे नेउन सदर अभियानात नागरीकांना पावसाळापूर्व आणि पावसाळयाच्या काळात स्वच्छता स्विकारण्यास प्रवृत्त करण्याच्या व्दिस्तरीय दृष्टीकोनावर भर देणे आहे. त्या अनुषंगाने आज



दि.११ जुलै २०२५ रोजी अकोला महानगरपालिका उत्तर झोन अंतर्गत नांयगांव येथील मनपा प्राथमिक उर्दू मुलांची शाळा क्रं.७ च्या विद्यार्थ्यांना तसेच दक्षिण झोन येथील हरिहर पेठ येथील मनपा उर्दु शाळा क्रं. ११ च्या विद्यार्थ्यांना तसेच हरिहर पेठ गणेश घाट परिसरात वास्तव्य करणा-या नागरिकांना स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता या विषयवर मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली. यामध्ये नागरिकांनी आपल्या घरात आणि प्रतिष्ठानात निघणारा ओला व सुका कचरा परिसरात इतरत्र न टाकता वेग-वेगळ्या डस्टबीनमध्ये गोळा करून सकाळी येणा-या कचरा घंटा मध्येच कचरा टाकणे, सद्या पावसाळ्याचे दिवस सुरू असून साथीजन्य आणि जलजन्य रोगापासून बचावासाठी वैयक्तिक स्वच्छतेसोबतच घराची व घरातील शौचालयाची आणि परिसराची स्वच्छतेकडे विशेष लक्ष घालून घर व परिसर स्वच्छ ठेवणे तसेच शासनाने बंदी घातलेल्या एकल वापर प्लास्टीक ने बनलेल्या वस्तुंचा वापर पुर्णपणे बंद करणे, कापडी व कागजी पिशव्यांचा वापर करणे आदिंबाबत मार्गदशन करण्यात आले.

# भारतीय सेनादलातर्फे सागर येथे रिलेशन भरती

■**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**

भारतीय सेनादला तर्फे युनिट हेडक्वार्टर मध्यप्रदेशातील सागर येथील महार रेजिमेंट सेंटर येथे दि. २१ जुलै ते २६ जुलै या कालावधीत युएचक्यू कोट्यातून रिलेशन आणि स्पोर्टसब भरती रॅली राबविण्यात येत आहे.भरतीत माजी सैनिक, दिवंगत सैनिक, सेवारत सैनिक यांचा मुलगा, तसेच सेवारत सैनिकाचा भाऊ यांना सहभागी होता येईल. अग्निवीर जनरल ड्युटी, अग्निवीर ट्रेडसमेन (८वी व १०वी) व अग्निवीर एसकेटी/ लिपिक (क्लार्क) ही पदे भरली जातील. सहभागासाठी उमेदवाराकडे रिलेशन सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे. भरतीमध्ये पायोनियर क्रॉप्ससाठी ६० जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. भरती प्रक्रियेतील प्रवेशासाठी तारीख मिळण्यासाठी उमेदवारांनी मो. क्र ८८७११८०३०५ किंवा ९६३०१४१२८९ या क्रमांकावर एसएमएसद्वारे नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात संपर्क करावा किंवा ९६३०१४१२८९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# आश्वासनांचा जुमला की शिक्षकांची फसवणूक?



प्रा. डॉ. प्रशांत विघे
राज्यशास्त्र विषयाचे लेखक
भारतीय महाविद्यालय,
अमरावती.
९३२६८७७७४९

शासन निर्णयांनी शिक्षण वाचत नाही, अंमलबजावणीनेच न्याय मिळतो. हेच वाक्य महाराष्ट्रातील विना अनुदानित, अंशतः अनुदानित, तसेच संघर्षशील शिक्षणसंस्थांच्या आजच्या स्थितीला सर्वाधिक योग्य ठरते. दि. १४ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाने अनेक शिक्षक, व्यवस्थापन मंडळे आणि ग्रामीण शाळांना दिलासा मिळेल अशी आशा निर्माण झाली होती. परंतु हा निर्णय प्रत्यक्षात केवळ एक घोषणानामा ठरून, १० महिन्यांनंतरही अंमलबजावणीच्या कोणत्याही ठोस पावलांचा अभाव दिसत आहे. या पार्श्वभूमीवर, ८ आणि ९ जुलै २०२५ रोजी राज्यभरातील हजारो प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा 'बंद' ठेवण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय म्हणजे केवळ निषेध नाही, तर व्यवस्थेच्या ढोंगी आश्वासनांवरचा नैतिक प्रहार आहे.

---------------

महाराष्ट्र राज्यातील विधान सभा निवडणुका - २०२४ पुढे ठेऊन वाटेल त्याला आश्वसनाची खरात शासनाने वाटण्याची निर्णय घेण्यात घेतला, कोणताही गट नाराज होणार नाही याची खबरदारी घेतली.

त्याचाच एक भाग म्हणजे राज्यातील कायम विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या व कायम शब्द वगळलेल्या (इंग्रजी माध्यम व्यतिरिक्त) राज्यातील अनुदानासाठी पात्र ठरलेल्या व वेतन अनुदानाचे टप्पा घेत असलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना (१) अनुदानाचा वाढीव टप्पा मंजूर करणे (२) त्रुटीत असलेल्या व विहित कालावधीत त्रुटीपूर्तता केलेल्या शाळांना वैकल्पिक अनुदानाचा वाढीव टप्पा मंजूर करणे (३) अघोषित शाळा/तुकड्यांना अनुदानासाठी पात्र करणे (४) डोंगराळ भागातील शाळांना एक विशेष बाब म्हणून अनुदानास पात्र करणे व (५) सैनिकी शाळांच्या अतिरिक्त तुकड्यांना अनुदानाचा वाढीव टप्पा मंजूर करणेबाबत जाहीर करण्यात आला.

या निर्णयांचे औचित्य आणि गरज निर्विवाद होती. ग्रामीण भागातील, सामाजिक दृष्ट्या दुर्बल समूहांसाठी कार्यरत असलेल्या संस्थांना यातून थेट आधार मिळणार होता. शिक्षकांना नियमित वेतन, संस्थांना अस्तित्व टिकवण्यासाठी आधार, आणि विद्यार्थ्यांना शिक्षणाची सततता ही त्रिसूत्री संकल्पना या निर्णयामागे होती.

या निर्णयाने महाराष्ट्र राज्यातील अनुदानाचा २० टक्के, ४० टक्के व ६० टक्के टप्पा घेत असलेल्या व वाढीव २० टक्के अनुदानासाठी पात्र असलेल्या खाजगी अंशतः अनुदानित प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/तुकड्या/ वर्ग / अतिरिक्त शाखा व त्यावरील ४९,५० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अनुदानाच्या विविध टप्प्यावर (म्हणजेच २० टक्के, ४० टक्के ६० टक्के) वेतन अनुदान घेत आहेत. त्यानुसार, या ४९,५६२ शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २ टक्के अनुदानाचा पुढील टप्पा मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली.

### १० महिने निघून गेले... अंमलबजावणी कुठे?

या निर्णयाला आज दहा महिने पूर्ण होत आहेत. पण नियमावली नाही, आदेश नाहीत, निधी मंजुरी नाही,अंदाजपत्रकात तरतूद नाही, पुरवणी अंदाज पत्रकात तरतूद नाही आणि सर्वांत मोठं म्हणजे संवाद नाही. शिक्षण विभाग, वित्त विभाग आणि प्रशासन यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव ठळकपणे दिसतो.

या निर्णयाच्या अनुषंगाने ना शिक्षकांना पत्रव्यवहार झाले, ना जिल्हा परिषद शिक्षण अधिकाऱ्यांनी याबाबत कार्यवाहीचे आदेश दिले. परिणामतः, हा निर्णय आज फक्त एक कागदावर ठेवलेला प्रचाराचा पत्ता बनून राहिला आहे.

अनेक शिक्षक, संस्था, संघटना यांची अपेक्षा भंगली आहे. विशेषतः ₹कायम₹ या अटीविना दिलेली मंजुरी ही क्रांतिकारी भूमिका ठरू शकली असती, पण ती अंमलबजावणी अभावी निष्प्रभ ठरली. शेवटी या निर्णयाच्या अंमलबजावणी साठी शासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्यामुळे अखेर ८ व ९ जुलै २०२५ रोजी राज्यातील शेकडो विना अनुदानित शाळांनी शाळा बंद आंदोलन पुकारण्याचा निर्णय घेतला.

शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संस्था चालक यांनी एकत्र येऊन आम्ही सरकारविरोधात नाही, पण अन्यायाविरुद्ध आहोत ही फक्त एक दिवसीय आंदोलनात्मक कृती नव्हे, तर दीर्घकाळ फसव्या प्रशासनाच्या विरोधातील नैतिक बंड आहे.असा स्पष्ट संदेश दिला.

### शिक्षण संचालकांचे पत्र आणि जबाबदारीची ढकलाढकली

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक यांनी शाळा बंद न ठेवता ₹विद्यार्थ्यांचे भवितव्य लक्षात घेऊन शाळा सुरू ठेवाव्यात, असे पत्र काढले. प्रश्न असा आहे की, जेव्हा शिक्षक २०-२५ वर्षे विनावेतन सेवा देतात, तेव्हा विद्यार्थी लक्षात घेतले जात नाहीत का? शासनाच्या धोरणदिरंगाईचा बळी शिक्षक आणि विद्यार्थी दोघेही ठरत आहेत. शाळा बंद ठेवणे हे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम करणारे असले तरी, शिक्षकांच्या व्यथांचे आणि व्यवस्थेतील अन्यायाचे हे ठळक प्रतिबिंब आहे.

आम्ही विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी वर्षानुवर्षे काम करत राहिलो, पण आता आम्हालाच शासनाने दुर्लक्षित केले. अशावेळी आंदोलनाशिवाय पर्याय नाही, असे स्पष्टपणे शिक्षक सांगत आहेत.

### तिहेरी अन्याय

या निर्णयात विशेष बाब म्हणून ज्या शाळांना अनुदान मंजुरी देण्याचे म्हटले गेले होते, त्या बहुतेक संस्था डोंगराळ, आदिवासी, मागास भागातील आहेत. इथे शाळा टिकवणे म्हणजे सामाजिक बांधिलकीचे दुसरे नाव आहे.

अशा संस्थांना विशेष बाब म्हणून वाचवण्याचे आश्वासन दिले गेले पण प्रत्यक्षात त्यांच्याकडे कोणीही फिरकलेले नाही. हा केवळ प्रशासकीय टाळाटाळी नाही, तर सामाजिक न्यायाचा अपमान नाही आहे का ?

### केवळ मौनिबाबाची भूमिका

ज्या शासनाने सार्वजनिकरित्या मोठ्या गाजावाजा करून निर्णय घेतला, त्याच शासनाने १० महिने मौन बाळगणे हे विश्वासघातासारखे आहे. शिक्षकसंघटनांच्या अनेक निवेदने, पाठपुरावे, आंदोलने, साखळी उपोषणे यांनाही फक्त आश्वासनांचे उत्तर मिळाले.

तांत्रिक अडथळा, ह्यवित्त विभागाकडून संमती प्रलंबित, आदेश प्रक्रियेत यापलीकडे आजपर्यंत काहीही घडलेले नाही. शेवटी एकच म्हणता येईल की, सरकार महायुतीचं, मुख्यमंत्री महायुतीचा, अर्थमंत्री महायुतीचा, शिक्षण मंत्री महायुतीचा तर हे सर्व आहे. तर तांत्रिक बाबी पुढे करणार आणि हा निर्णय वित्त विभाग घेईल, हा निर्णय अमुक विभाग घेईल, अशा स्वरूपाची चाल-ढकल करणे म्हणजे एक प्रकारचं प्रश्नापासून पळ काढणे या पलीकडे काही नाही असे म्हणता येईल.

दुसरीकडे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंमलात आणायचे आहेत, शिक्षकांचा पगार द्यायचे नाही, शाळा सक्षम करण्याच्या दृष्टिकोनातून अनुदान द्यायचे नाही, व्यवसायिक कौशल्य विकसित करणारं डिजिटल लॅब तुम्ही तयार करणार नसाल तर नवीन धोरण अमलात कसे येईल याचा साधा विचार सरकार करणार आहे की नाही ? असा प्रश्न सर्वसामान्यांच्या मनामध्ये निर्माण झालेला आहे

एकंदरीत १४ ऑक्टोबर २०२४ चा निर्णय जर खरोखरच शिक्षक, संस्था, व विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी होता, तर त्याची अंमलबजावणी का झाली नाही? शासनाने पारदर्शकपणे याचे उत्तर द्यावे लागेल. आम्ही शाळा वाचवतोय, पण शासन आम्हाला गाळात लोटतंय, अशी भावना आज शेकडो शिक्षकांमध्ये आहे.

हा निर्णय जर केवळ निवडणूकपूर्व जुमला होता, तर तो लोकशाहीच्या शैक्षणिक विश्वासघाताचा दस्तऐवज ठरेल.पण अजूनही वेळ गेलेली नाही,शासनाने तातडीने यासाठी कार्यवाही केली नाही, तर शाळा बंद आंदोलन पुढे जाऊन एक राज्यव्यापी शैक्षणिक असंतोष उभा करू शकतो. महायुती सरकारने निर्णय नव्हे, कृती करायला हवी नाही तर आश्वासनांचा जुमला की शिक्षकांची फसवणूक यापलीकडे दुसरे काही म्हणता येणार नाही हे मात्र खरे !

# बिहारमध्ये काँग्रेसला लालूंची संगत नडली!

बिहारमध्ये लवकरच विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांत राष्ट्रीय जनता दल प्रणित महाआघाडी आणि भाजपा प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी यांच्यात सरळ सामना होणार आहे.महाआघाडीची जागा वाटपासंबंधीची बोलणी सुरु झाली आहेत. महाआघाडीत राजद, काँग्रेस, विकासशील इन्सान पार्टी, लोक जनशक्ती पार्टी (पशुपती पारसनाथ ) कम्युनिस्ट पार्टी ( मार्क्सवादी - लेनिनवादी ) सीपीआय,सीपीएम आणि झारखंड मुक्ती मोर्चा या पक्षांचा समावेश असणार आहे.

२०२० मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत राजदने १४० पेक्षा जास्त जागा लढवून ७५ जागांवर विजय मिळविला होता. काँग्रेसने ७० जागा लढवल्या मात्र त्यांना केवळ १९ जागाच जिंकता आल्या. कम्युनिष्ट पार्टी ( मा.ले.) ने १९ जागा लढवल्या आणि त्यापैकी १२ जागांवर विजय मिळविला. महाआघाडीत कम्युनिस्ट पार्टी ( मा.ले.) चा स्ट्राईक रेट सर्वात चांगला होता. विकासशील इन्सान पार्टी गेल्या खेपेस रालोआ बरोबर होती. त्यांनी गेल्या खेपेच्या निवडणुकीत चार जागा जिंकल्या होत्या.

महाआघाडी मधील जागा वाटपात राजद आणि काँग्रेस यांच्यामध्ये मोठी चुरस असणार आहे. महाआघाडीत काही नवीन पक्ष सामील झाल्याने या खेपेच्या विधानसभा निवडणुकीत राजद आणि काँग्रेस यांच्या वाट्याला गेल्या खेपेपेक्षा कमी जागा येऊ शकतील. अर्थात जागा वाटपात सर्वात जास्त फटका काँग्रेसला बसण्याची शक्यता आहे.



अभय गोखले

गेल्या खेपेस काँग्रेसला ७० जागा सोडण्यात आल्या होत्या, मात्र त्यापैकी केवळ १९ जागाच काँग्रेसला जिंकता आल्याने काँग्रेसला मोठ्या प्रमाणात टीका सहन करावी लागली होती. काँग्रेसला क्षमतेपेक्षा जास्त जागा सोडण्यात आल्याचा फटका महाआघाडीला विधानसभा निवडणुकीत बसला होता. काँग्रेसला कमी जागा सोडल्या असत्या तर, त्या जागा राजदला लढवता आल्या असत्या आणि राजदचा स्ट्राईक रेट पाहता राजदला त्या जागांवर यश मिळाले असते, असे बोलले जात होते. गेल्या खेपेस महाआघाडीचा विजय थोडक्यात हुकला होता, त्याला काँग्रेसच कारणीभूत असल्याची चर्चा होती.

या पार्श्वभूमीवर या खेपेच्या बिहार विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या वाट्याला गेल्या खेपेच्या तुलनेत कमी जागा येण्याची दाट शक्यता आहे. काँग्रेसच्या वाट्याला यावेळी ४० ते ४५ जागा येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.खरे पाहता काँग्रेसची बिहार मध्ये तेवढीच क्षमता आहे. काँग्रेसच्या या अवमूल्यनाला काँग्रेसच मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे. बिहारमध्ये १९८९ नंतर काँग्रेसची जी घसरगुंडी सुरु झाली ती अद्याप थांबलेली नाही.

जगन्नाथ मिश्रा हे काँग्रेसचे बिहार मधील शेवटचे मुख्यमंत्री ठरले. १९८९ नंतर गेल्या ३६ वर्षांत काँग्रेस एकट्याच्या बळावर बिहारमध्ये सत्तेच्या आसपासही फिरकलेली नाही. त्यासुमारास मंडल आयोगाच्या शिफारशी केंद्र सरकारने स्वीकारल्यानंतर, बिहार मधील राजकारण पुर्णपणे बदलून गेले.

जातीवरती आधारीत राजकारण सुरू झाले आणि त्याचा मोठा फटका काँग्रेसला बसला. काँग्रेसचा पारंपरिक मतदार, काँग्रेसची साथ सोडून प्रादेशिक पक्षांकडे वळला. लालू प्रसाद यादव, नितीशकुमार, रामविलास पासवान या नेत्यांनी आपले पक्ष स्थापन केले आणि ते ज्या जातीतून आले होते,त्या जातीचा त्यांनी भक्कम पाठिंबा मिळवला.

यादव समाज मोठ्या प्रमाणात लालूप्रसाद यादव यांच्या पाठीमागे उभा राहिला. कुर्मी समाज नितीशकुमार यांच्या पाठीमागे उभा राहिला. पासवान समाज, राम विलास पासवान यांच्या पाठीमागे उभा राहिला. मुस्लिम समाज लालूप्रसाद यादव यांच्या बरोबर गेला.

पुढारलेल्या जातींनी काँग्रेसची साथ सोडून, भाजपाला जवळ केले. अशाप्रकारे काँग्रेसचा हक्काचा मतदार, मोठ्या प्रमाणात काँग्रेसची साथ सोडून गेल्याने, काँग्रेसची बिहार मध्ये मोठीच पिछेहाट झाली. त्यात पुन्हा काँग्रेसने लालूप्रसाद यादव यांच्याशी जवळीक साधल्याने, काँग्रेसचे बिहार मध्ये अतोनात नुकसान झाले.

लालूप्रसाद यांच्या पक्षाशी आघाडी करुन निवडणुका लढताना काँग्रेसला सदैव दुय्यम स्थान पत्करावे लागले.लालूप्रसाद यादव, निवडणुकीत जेवढ्या जागा सोडतील तेवढ्या जागांवर समाधान मानण्याची पाळी काँग्रेसवर आली.गेली काही वर्षे बिहारमध्ये काँग्रेसने मोजक्याच जागा लढवल्याने, पक्षाला बिहारमध्ये दूरवर हातपाय पसरता आलेले नाहीत.

काँग्रेसची ही परिस्थिती फक्त बिहार पुरती मर्यादित नाही. असं म्हटलं जातं की, भाजपा, प्रादेशिक पक्षांच्या सहाय्याने, एखाद्या राज्यात सत्तेपर्यंत पोहोचते आणि नंतर हळूहळू त्या प्रादेशिक पक्षांना संपवून टाकते. मात्र काँग्रेसच्या बाबतीत नेमकी उलटी परिस्थिती आहे.

काही राज्यांत प्रादेशिक पक्षांनी काँग्रेसला कमकुवत केल्याची उदाहरणे आहेत. बिहारमध्ये राजदच्या संगतीमुळे काँग्रेसची पिछेहाट झाली. तामिळनाडूत भक्तवत्सलम हे काँग्रेसचे शेवटचे मुख्यमंत्री ठरले. १९६७ साली द्रमुकने काँग्रेसचा पराभव करुन सत्ता काबीज केली, त्यानंतर गेल्या ५८ वर्षांत, तामिळनाडूमध्ये, काँग्रेस, सत्तेच्या आसपासही फिरकलेली नाही.

गेली अनेक वर्षे तामिळनाडूमध्ये काँग्रेस, कधी द्रमुक बरोबर तर कधी अण्णा द्रमुक बरोबर युती करून निवडणुका लढवत आहे. अशा परिस्थितीत वरील प्रादेशिक पक्ष काँग्रेसला जेवढ्या जागा सोडतील तेवढ्या जागांवरच काँग्रेस लढत असल्याने, काँग्रेसने स्वतःच तामिळनाडूमध्ये आपल्या पक्ष विस्ताराचे दरवाजे बंद करून टाकले आहेत.

उत्तर प्रदेशमध्ये नारायणदत्त तिवारी हे काँग्रेसचे शेवटचे मुख्यमंत्री ठरले. १९८९ मध्ये समाजवादी पक्षाने काँग्रेसचा पराभव करुन उत्तरप्रदेशची सत्ता काबीज केली, त्यानंतर काँग्रेसची उत्तरप्रदेशात जी घसरगुंडी सुरू झाली ती अद्याप थांबलेली नाही. १९८९ नंतर उत्तरप्रदेशातील राजकारण हे प्रामुख्याने सपा, बसपा आणि भाजपा या पक्षांभोवती फिरत राहिलं आणि काँग्रेस, उत्तरप्रदेशात कुणाच्या खिजगणतीतही राहिली नाही.

बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला दुय्यम स्थानच स्विकारावे लागणार आहे. गेल्या खेपेस काँग्रेसला महाआघाडीत क्षमतेपेक्षा जास्त जागा सोडण्यात आल्या होत्या. परंतु काँग्रेसची कामगिरी अपेक्षेनुसार न झाल्याने, काँग्रेसकडे आता बार्गेनीग पॉवर शिल्लक राहिलेली नाही. अशा परिस्थितीत महाआघाडीचे नेते तेजस्वी यादव हे काँग्रेसला जेवढ्या जागा सोडतील तेवढ्या जागा काँग्रेसला स्विकाराव्याच लागतील, कारण काँग्रेसकडे दुसरा पर्यायच शिल्लक नाही.

■ ■ ■

# पालकांच्या अपेक्षांच्या ओझ्याखाली पाल्यांचा बळी?

डॉ. भारती अनिल हेडाऊ
यवतमाळ.

प्रत्येक मुलांमध्ये काहीतरी कौशल्य असतंच. भविष्यात आपण काय बनावे असे त्याचे स्वप्नही असते. परंतु दहावी आली की पालकांचे त्याच्यामागे अभ्यासासाठी ससेमीरा सुरू होतो. मग दहावीत एवढे प्रतिशत आले पाहिजे. असा कुठेतरी आग्रह पालकांकडून होत असतो.

निकाल लागत नाही तर बारावी सायन्स घेण्यासाठी त्यावर जोर जबरदस्ती केल्या जाते. कारण मित्र-मैत्रिणींचे मुले इंजीनियरिंग मेडिकल तत्सम क्षेत्रामध्ये गेलेले असतात. बारावीत असताना अभ्यासासाठी सतत त्याचे कान पिळवटून टाकतात.

स्वतःच्या अपेक्षा त्याच्यावर लादून समाजामध्ये मानाने जगायचं असते. मग आमचा मुलगा कसा हुशार आहे? कसा स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करतो? इंजीनियर होईल, डॉक्टर होईल असा विचार सगळ्यांशी चर्चिला जातो.

परंतु एकदा हे त्या मुलाला विचारल्या जात नाही की, तुझी काय बनायची इच्छा आहे. त्याला कला क्षेत्रात आवड आहे का, की विज्ञान आवडतं, की तो खेळांमध्ये प्राविण्य मिळवू इच्छितो. कुठलाही विचार आई-वडील करीत नाही.

माझा समाजामध्ये मान पान कायम राहावा. मला मिरवता यावे. म्हणून मुलांनी माझ्या अपेक्षेनुसार बनाव. त्याची अपेक्षा कुठेच लक्षात घेतली जात नाही. उलट असे सांगितले जाते की त्याला काय कळतं? भविष्य किती कठीण असतं?

परंतु माझ्या मते आपल्याला मुलांचा कल तो सातवी आठवीत असतानाच लक्षात येतो. त्याचे गणित चांगले की विज्ञान, कलेत हुशार की खेळात अग्रगण्य असू शकतो. याचा अभ्यास पालकांनी स्वतः करावा असे वाटले. आपल्या अपेक्षांचे ओझे मुलांवर लादू नये अशी अपेक्षा माझी सर्व पालकांकडून आहे.

क्षेत्र कुठलेही वाईट नाही. तो व्यवसाय असो की नोकरी. मुलांना त्यांच्या आवडीचे क्षेत्र निवडू द्यावे. जेणेकरून ते त्यांची प्रगती जास्तीत जास्त करू शकतील. आपण त्यांना नेहमी मार्गदर्शक आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे असे एक वाटले. शेवटी मुलांच्या आनंदातच आपलाही आनंद असतो यात कोणाचे दुमत नसेल.

■ ■ ■

# आठवतात ते पावसाचे दिवस

विनायक रेकलवार
मूल. जि. चंद्रपूर.
8975140998

नेमिची येतो मग पावसाळाह्य ही म्हण दरवर्षी आठवते. मनात तृषारांचे फवारे उडतात. केव्हा एकदाचा उन्हाळा संपतो असे वाटते. अंगाची लाही लाही करणरी ऊन नकोशी वाटते. गर्मी, उकाडा यामुळे जीव कासावीस होतो.

विचार केल्यास तीनही ऋतू आपआपल्या परीने बरोबर आहे. पर्यावरणाचे समतोल राखायचे असेल तर हे आवश्यक आहे. हाच तर ऋतूगंधाचा महिमा आहे. गंध घेवून येतो पावसाळा आणि वर्षा ऋतू हळूहळू बहरत जाते. पावसाळा सर्वांनाच हवाहवासा वाटतो.पहिला पाउस. सुटलेला मातीचा सुगंध, दरवळलेला वास आणि प्रसन्न वाटणारे वातावरण. अगदी मरगळलेले मन ताजे करून टाकते. पावसाळ्यात सुरू होते पावसाळी पर्यटन. धबधब्याचे विराट रूप अनेक जण आपल्या नजरेत कैद करून ठेवतात.हिरवेगार झालेली सृष्टी.त्या सृष्टीतील थंडगार वाऱ्याचा झरोका अगदी मनात साठवून ठेवासा वाटतो. धबधबा आणि धबधब्याचे पाणी मनात खळखळ निर्माण करीत असतात. खरच पावसाळा डोळ्यांचे पारणे फेडतो. अतिधार पावसामुळे निर्माण झालेले उंच सकल भागातून वाहणारे छोटे मोठे धबधबे टक लावून बघावेसे वाटतात. शेतकऱ्यांची लगबग,पेरणीची घाई, धानाची रोवणी, कापसाची लागवड,सर्वकाही पावसाळ्यात.

शेतकरी आनंदी तर जग आनंदी. त्याला आनंदी करणारा ऋतू म्हणजे पावसाळा. पाऊस पडला तर पीक नाहीतर नापीक. अशी मग शेतकऱ्यांची अवस्था होते. आमचा बळीराजा सुखी झाला पाहिजे. हे वरूण राजाला प्रार्थना करून सांगितले पाहिजे. माझा धान उत्पादक पट्टा. या पट्ट्यात धान रोवणी करताना सुरू होते झाडीपट्टीतील महिलांची गाणी. सुख दुःखाच्या दोन गोष्टी त्या गाण्यात त्या वर्णन करतात. त्यात त्यांचा दिवस कसा भूर्कन निघून जातो. हे त्यांना कळतच नाही.

शेतावर जाण्याची घाई, शिदोरी नेताना मालकीण बाईची घाई. सर्वच चित्र कसे डोळ्यांसमोर स्पष्ट उभे राहते. एखादया चित्रकाराने चित्र रेखाटावे असे दृष्य पावसाळ्यात सर्वत्र दिसते. शेतकऱ्यांची आस पावसावरच. आभाळाकडे टक लावून पाहत राहतो वाट पावसाची. जस वारकऱ्याला विठूरायाची ओढ असते. तशी शेतकऱ्याला पावसाची ओढ. चातकाप्रमाणे वाट पाहत राहतो आमचा शेतकरी.

पावसाला सुरूवात झाली की अख्खी वसुंधरा न्हाउन निघते. झाडे हिरवीगार होतात. पक्षी आनंदी गीत गातात. ओढे, नाले, नदी भराभरा वाहू लागतात.समुद्रला उधाण येते.श्रावणात तर पाऊस अधिकच बहरतो. अख्खी सृष्टी हिरवा शालु नेसून तयार होते. पावसाळा कधी हवाहवासा वाटतो, कधी नकोसा वाटतो. कधी वृष्टी होते तर कधी अतिवृष्टी होते.

त्यावेळी कुसुमाग्रजांची कविता आठवते. श्रावणात बालकवींच्या कविता आठवतात. पावसाळ्यात राजकारणांच्या गप्पा टप्पा, आरोप प्रत्यारोपही आठवतात. शहरातील तुबंलेले रस्तेही आठवतात. माळरानावरचा पाऊसही यावेळी आठवून जातो. सण समारंभाला सुरूवात करणारा पावसाळा नऊवारी साडी नेसून मिरवणाऱ्या सुवासिनीच्या मनात आनंदाचे भरते आणतो. असा हा पावसाळा एकदाचा संपला की परत सुरू होते, वेळी अवेळी पाऊस. आणि... आम्ही म्हणतो, अरे हा तर अवकाळी पाउस आहे.

सुगीचे दिवस येतात. पीकांनी ओथंबलेले दिवस. परत एकदा सृष्टी पिवळा शालू नेसून दर्शन देते. हाती पैसा आला की, सुखाच्या दोन गोष्टी चावडीत मिरवल्या जातात. दिवाळीचा सण येतो. नाही आनंदाला तोटा म्हणत, परत एकदा उन्हाळ्याची चाहूल. मग पुन्हा नेमिची येतो पावसाळा. शेतकरी वाट पाहतो त्या पावसाळ्यातील पावसाची....चातका प्रमाणे. आपल्या पीकासाठी, जगाच्या सुखासाठी. परत त्या आठवणी जाग्या होतात, रिमझिम पावसासोबत गरमागरम भजे खाण्याची आणि कुठेतरी फुटपाथवर गरमागरम भुट्टा खाण्याची.

## वाचक लिहितात

### अमेरिकेतील इस्कॉनच्या मंदिरावर हल्ला

संपूर्ण जगभरात इस्कॉनची मंदिरे आहेत. अमेरिकेत ती अधिक आहेत. स्पॅनिश फोर्क युटा येथील इस्कॉनच्या श्री श्री राधाकृष्ण मंदिरावर नुकताच गोळीबार करण्यात आला. साधारण २० ते ३० गोळ्या झाडण्यात आल्या. हा गोळीबार रात्रीच्या वेळी झाला तेव्हा मंदिरात २५ ते ३० भाविक होते. या गोळीबारात कुठलीही जीवित हानी झाली नसल्याचे इस्कॉन ने एक्स वर पोस्ट करत म्हटले आहे. परंतु यामुळे मंदिराच्या कमानी सह हजारो डॉलर्सची हानी मात्र झाली.

गेल्या काही वर्षात अमेरिकेत मंदिरांवर वारंवार हल्ले होत आहेत. मंदिराची तोडफोड करणे, मंदिरांच्या भिंतीवर आक्षेपार्ह घोषणा लिहिणे इतपतच हे मर्यादित होते. परंतु आता मात्र मंदिरांवर गोळीबार करण्यापर्यंत मजल गेली. बांगलादेश, पाकिस्तानात मंदिरावरील हल्ले नवीन नाहीत. परंतु श्रीमंत, विकसित देशातही असे विकृत मनोवृत्तीचे लोक असतात याचे आश्चर्य वाटते. विशेषता हिंदूंच्या मंदिरांविषयीच हे हल्ले असतात.

हिंदू धर्माचे श्रद्धास्थान, उपासना केंद्र म्हणून मंदिरांची निर्मिती झाली. त्याची आजतागायत सर्वच देशातल्या, अशा मानसिकतेच्या लोकांना चीड का आहे? भारतात पूर्वी सुद्धा औरंगजेब, गजनी, इंग्रज, पोर्तुगीज या सर्वांनीच मंदिरांची तोडफोड केली. हीच मानसिकता अजून अमेरिकेसारख्या प्रगत देशात सुद्धा जिवंत आहे. हेच यावरून दिसून येते. गोळीबाराच्या घटनेचा भारतीय दूतावासाने निषेध केला. आम्ही तुमच्या पाठीशी असल्याचे एक्स वर मुळमुळीत पोस्ट करून म्हंटले. पण एवढे पुरेसे आहे का?

खरं तर भारताने या घटनेवरून अमेरिकेवर मंदिराच्या सुरक्षेसाठी दबाव आणणे आवश्यक आहे. पुन्हा अशी घटना घडल्यास त्यास अमेरिका जबाबदार असेल. तरच हे हल्ले थांबतील. अन्यथा म्हातारी मेल्याचे दुःख नाही, पण काळ सोकावतो म्हणतात ते असे .

■ सौ. माधवी पत्की
नागपूर.

### अन्न व औषध प्रशासनाने आजवर झोपा काढल्या का?

मुंबईत सुरू असलेल्या विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशन काळात विविध विषयांवरून गदारोळ सुरू आहे. विदर्भातील संजय गायकवाड या आमदाराने निकृष्ट जेवण दिले म्हणून आकाशवाणी आमदार निवासातील कॅन्टीनच्या व्यवस्थापकाला मारहाण केली. यावरून वादंग झाल्यानंतरही हा आमदार आपल्याला पश्चाताप नसल्याचे, माझ्यावर कोणतीच कारवाई होणार नसल्याचे सांगतो. ते खरेही आहे . लोकप्रतिनिधींना सात खून माफ... असेच कायदे आणि नियम झाल्याचे दिसते.

या घटनेनंतर अन्न व औषध प्रशासन विभागाने कॅन्टीनमधील खाद्य पदार्थांचे नमूने घेतले आणि दुसऱ्या दिवशी कॅन्टीनचा परवाना रद्द केला. मग, आजवर या विभागाने झोपा काढल्या का? मुंबई महानगरासंह इतर अनेक शहर आणि गावात रस्त्याच्या कडेला खाद्य पदार्थ तयार केले जातात, घाण पाणी वापरले जाते, भेसळयुक्त मसाले आणि इतर पदार्थ टाकले जातात. परंतु, हा विभाग कधी धाड मारून कारवाई करीत असल्याचे दिसत नाही. दिवाळी सणापूर्वी काही हॉटेलवर धाड टाकून नकली खवा जप्त केल्याचे तेवढे दाखवले जाते. खरे तर या विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कारवाई व्हायला हवी.

■ सुनील राऊत, वाडी, नागपूर.

# श्रावण महिन्यात मांसाहार आणि मद्यापासून दूर का राहावे?



काही दिवसात आता श्रावण महिना सुरु होईल. श्रावण सुरु झाला की अनेक नियम पाळावे लागतात. त्यातील एक महत्त्वाचा नियम म्हणजे मांसाहार आणि दारू, सिगारेटपासून दूर राहणे.

श्रावण म्हणजे पावसाळा. हा असा ऋतू आहे ज्यामध्ये आर्द्रता वाढते. अशा हवामानात संसर्गाचा धोका खूप जास्त असतो. परिणामी, मांसामध्ये बॅक्टेरिया आणि विषाणू वेगाने वाढतात. ते लवकर कुजते आणि दूषित होण्याचा धोका असतो. त्यामुळे अन्नातून विषबाधा होण्याचा धोका वाढतो.

**प्रजनन महिना आणि अतिसार**

पावसाळा हा माशांच्या प्रजननाचा काळ असतो. पावसाळ्यात पाण्याचे प्रदूषण वाढते. पाण्यात बॅक्टेरियाची संख्या वाढते. परिणामी, माशांद्वारे मानवांमध्ये संसर्ग पसरण्याचा आणि उलट्या, जुलाब होण्याचा धोका असतो. मासे परजीवी आणि रोगांना बळी पडण्याची शक्यता जास्त असते, जे नंतर खाल्ल्यावर मानवांमध्ये पसरू शकतात.

**संसर्गाचा धोका**

पावसाळा हा संसर्गजन्य आजारांसाठी ओळखला जातो. पावसाळ्यात शरीराची प्रतिकारशक्ती कमी होते. संसर्गजन्य आजार प्राण्यांनाही होतात. या ऋतूत मांसाहारी पदार्थ खाल्ल्याने अनेक आजारांना आमंत्रण मिळू शकते. म्हणूनच, ते सोडून देण्याचा सल्ला दिला जातो.

**मांसाहारी पदार्थ पचनास जड**

पावसाळ्यात पचनशक्ती कमकुवत होते. मांसाहार तामसिक असून, सहज पचत नाही. परिणामी, शरीराला ते पचवण्यासाठी जास्त मेहनत करावी लागते. जेव्हा शरीरावर पचनासाठी अतिरिक्त दबाव येतो तेव्हा गॅस, अपचन, आम्लता आणि जडपणा जाणवू शकतो. **दारू सेवन टाळा**

उन्हाळ्यात जास्त पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो कारण घाम येतो. त्यानंतर सुरू होणारा पावसाळा शरीरातून आणखी जास्त पाणी पिण्याचे काम करतो. आर्द्रतेमुळे जास्त घाम येतो. परिणामी, शरीरात पूर्वीपेक्षा जास्त पाण्याची कमतरता जाणवते.

अशा परिस्थितीत, अल्कोहोल शरीरात उष्णता निर्माण करते आणि निर्जलीकरणाचे कारण बनते. त्यामुळे रक्तदाबात चढ-उतार देखील होतात. पावसाळ्यात दारू पिण्यापासून दूर राहिल्याने अपघातांचा धोका कमी होतो.

पावसामुळे अपघात वाढतात आणि दारूमुळे धोका वाढतो. राष्ट्रीय आरोग्य संस्थेच्या अहवालात म्हटले आहे की दारूमुळे रस्ते अपघातांचा धोका वाढतो.

ब्राझीलमधील रिओ डी जानेरो येथे केलेल्या संशोधनातून असे दिसून आले आहे की ४२.५ टक्के प्राणघातक रस्ते अपघात दारू पिणा?या लोकांमध्ये झाले आहेत. त्याची प्रकरणे कोणत्याही विशिष्ट वयोगटापुरती मर्यादित नाहीत.

**धार्मिक कारण :** यानंतरचे अजून एक कारण म्हणजे श्रावण महिना हा पवित्र मानला जातो आणि त्यात अनेक व्रत, उपवास केले जातात. भगवान शीवाची आराधना केली जाते म्हणून या महिन्यात मांसाहार आणि मद्यपान करणे टाळावे.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### भारत नंबर वन ..।

गर्वसे कहो लोकसंख्येत
जगात भारत नंबर वन
नाही लावला ब्रेक तर
गाडी होईल उलाल
हे जाणून आहेत सर्वजण।

हम दो, हमारे दो चं
व्हायलाच हवं पालन
धर्म कोणताही असो
नको त्यांना केन्सेशन !

दोन पेक्षा जास्त
ज्यांना असतील अपत्य
त्यांच्या ए टू झेड सवलती
शासनाने कराव्या बरखास्त!

नियम झुगारणाऱ्यावर
करा दंडात्मक कारवाई
टॅक्स लावा तिसऱ्यावर
तेंव्हा येईल गाडी रुळावर!

## ‘जमाई नं. १’ मध्ये शोकाकुल अवस्थेतील स्त्रीच्या भूमिकेत निशिगंधा वाड ; आता एक नवीन रहस्यकथेची सुरूवात!

**मुंबई, ११ जुलै :** झी टीव्हीवरील सर्वाधिक लोकप्रिय मालिका जमाई नं. १ आपल्या उत्कंठावर्धक कथानक आणि गुंतागुंतीच्या व्यक्तिरेखांमुळे प्रेक्षकांची मने जिंकत आहे. मात्र आगामी भागांमध्ये ही कथा आणखीनच रहस्यमय वळण घेणार आहे, कारण ज्येष्ठ अभिनेत्री निशिगंधा वाड या उमा या रहस्य आणि दुःखाने वेढलेल्या व्यक्तिरेखेसह मालिकेत प्रवेश करत आहेत.

व्यक्तिगत दुःखाने पछाडलेल्या स्त्रीची भूमिका साकारणारी उमा ही अनेक वर्षांपासून समाजापासून दूर राहत आहे एकाकी, शांत, आणि शोकात बुडालेली. एका अंधाऱ्या खोलीत एका बाहुलीला घट्ट धरून बसलेली, तिच्या भोवती एक अजब शांतता असते, जणू ती कोणाची तरी वाट पाहत आहे. पापिया सेनगुप्ता यांनी साकारलेली कांचन हिच्याशी उमाचा खोल संबंध आहे, पण तिच्या व्यक्तिरेखेभोवती एक गूढपणाचे वलय आहे. निशिगंधा वाड यांचा हा प्रवेश जमाई नं. १ च्या कथेमध्ये एक नवीन स्तर आणि भावनिक गुंतवणूक देणार आहे.

आपल्या भूमिकेबाबत बोलताना निशिगंधा वाड म्हणाल्या, 'जमाई नं. १' सारख्या लोकप्रिय आणि उत्कंठावर्धक मालिकेत सहभागी होणे खूपच रोमांचक आहे. माझ्या प्रवेशाने कथानकात एक मोठे वळण येणार आहे आणि ही जबाबदारी खूप मोठी आहे. माझी भूमिका अशा एका स्त्रीची आहे जी अनेक वर्षांपासून शांततेत आणि दुःखात जगत आहे तिच्या भावनांचा काळ स्तब्ध आहे. या पात्रात एक गूढपणाचा आणि खोल भावनांचा स्तर आहे, जो माझ्या मनाला लगेचच भावला. ही कथा जसजशी उलगडेल, तसतसे प्रेक्षक हळूहळू जाणतील की ती कोण आहे आणि इतकी वर्षे ती लपून का होती. प्रेक्षक या ट्रॅकला कसा प्रतिसाद देतात हे पाहण्यासाठी मी खूप उत्सुक आहे!

## सोनी सबवरील वागले की दुनिया मालिकेत राजेश सखी-विवानच्या नात्याची कसोटी घेणार

**मुंबई, ११ जुलै :** सोनी सबवरील वागले की दुनिया ही मालिका एका मध्यमवर्गीय कुटुंबाच्या माध्यमातून दैनंदिन जीवनाकडे बघते. अलीकडच्या भागांमध्ये, वागले कुटुंब भावनिक संकटांचा सामना करताना दिसत आहे. साईदर्शन सोसायटीच्या पुनर्विकासापासून ते राधिका (भारती आचरेकर)ची स्मृती अचानक जाण्यापर्यंत! या सगळ्या गदारोळात राजेश (सुमित राघवन) सखी (चिन्मयी साळवी)ला विवान (नमित शाह)पासून दूर करण्याचा प्रयत्न करतो, पण उलट ते दोघे अधिकाधिक जवळ येत असल्याचे त्याच्या लक्षात येते, त्यामुळे कुटुंबातला तणाव आणखीन वाढला आहे.

आगामी भागांमध्ये, विवानचा एक गंभीर अपघात झाल्यानंतर सखीच्या मनात भावनांचे वादळ उठले आहे. भावनेच्या उर्मीत ती त्याच्यासमक्ष आपले मन मोकळे करते. तिचे बोलणे त्याने ऐकले आहे की नाही हे कळत नाही. त्यांच्या जवळीकीमुळे राजेशची चिंता वाढत चालली आहे. तो हे प्रकरण आपल्या हाती घ्यायचे ठरवतो. वाढदिवसासाठीची योजना करण्याच्या निमित्ताने तो सखीचे लक्ष विवानवरून हटवू पाहतो आणि तिला काही मर्यादाही आखून देतो. पण प्रेम नेहमी आपला मार्ग शोधतेच. गोष्टी थोड्या स्थिरस्थावर होत आहेत असे वाटत असतानाच विवानने सखीप्रती केलेल्या एका रोमँटिक कृतीमुळे वागले कुटुंब हादरते. राजेशला हारल्यासारखे वाटते आणि त्या भरात तो त्यांना एक आव्हान देतो आणि सांगतो की, सखी आणि विवानने २१ दिवस एकमेकांशी संपर्क न साधता आपल्या नात्याची दृढता सिद्ध करावी.

सखी आणि विवान प्रेम आणि संयमाची ही कसोटी देण्याचे स्वीकारतील का? की दुरावण्याच्या आणि आपल्याला कोणीही स्वीकारत नसल्याच्या जाणिवेने त्यांच्यात दुरावा वाढेल?

वागले की दुनिया मालिकेत सखीची भूमिका करत असलेली चिन्मयी साळवी म्हणते, सखीच्या मनात भावना उफाळून आल्या आहेत आणि जीवनाला नवीन दिशा देणारे निर्णय घ्यावे लागणार आहेत. कारण तिचे प्रेम आणि कुटुंब एकमेकांच्या विरोधात आहेत. या प्रसंगी तिच्या मनातील द्वन्द्व आणि तिची ताकद सुंदर पद्धतीने टिपली आहे. आपले नाते आणि मन या दोघांना सांभाळण्यासाठी ती कुठपर्यंत जाऊ शकते, हे या भागात बघायला मिळेल. भावनांचा हा कल्लोळ अनेक तरुण मुलींना परिचित वाटेल.

## उफ्फ ये लव है मुश्किल मालिकेत एका धूर्त वकीलाची भूमिका करणार रजत दहिया

**मुंबई, ११ जुलै :** सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिका प्रेमाच्या गुंतागुंतीचा शोध घेते आणि पुरुष आणि स्त्रिया यांचा दृष्टिकोन बऱ्याचदा कसा वेगवेगळा असतो, यावर प्रकाश टाकते. या कहाणीच्या केंद्रस्थानी युग सिन्हा (शब्बीर अहलूवालिया) आहे, जो एक अत्यंत हुशार पण मनातले व्यक्त न करणारा सावध वकील आहे. पूर्वी प्रेमाने पोळलेला असल्याने आता तो त्यांच्यापासून दोन हात दूरच राहतो. त्याच्या उलट, कैरी शर्मा (आशी सिंह) एक उत्साही आणि प्रेमळ कायद्याची विद्यार्थिनी आहे आणि प्रेमावरील तिचा विश्वास हळूहळू युगने स्वतःभोवती उभारलेल्या भिंतींना देखील खिंडार पाडू लागला आहे. या कथानकात आणखी एक आकर्षण निर्माण करणारी विक्रम (विकी) (रजत दहिया) मल्होत्रा ही व्यक्तिरेखा देखील आहे. विक्रम एक कुशाग्र बुद्धीचा, मोहक व्यक्तिमत्त्वाचा पण खतरनाक वकील आहे आणि कोर्टातील लढा तो मानसिक खेळात रूपांतरित करण्यात पटाईत आहे. विकीच्या उपस्थितीमुळे वर्तमान स्थिती अस्थिर झाली आहे. विशेषतः तो कोर्टात थेट युगशी टक्कर घेतो, तेव्हा परिस्थिती स्फोटक होते.

# आदित्य बिर्ला सन लाईफ इन्शुरन्सने अमरावतीमध्ये विमा आणि आर्थिक साक्षरता मोहिमेचे आयोजन केले

**अमरावती, ११ जुलै :** विविध आर्थिक सेवा पुरवणारी, भारतातील आघाडीची कंपनी, आदित्य बिर्ला कॅपिटलची जीवन विमा उपकंपनी, आदित्य बिर्ला सन लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने अमरावतीमध्ये विमा आणि आर्थिक जागरूकता उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले होते. जीवन विम्याचे महत्त्व, संपूर्ण कुटुंबाचे आर्थिक भवितव्य सुरक्षित करण्यात त्याची भूमिका याविषयी जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्राथमिक उद्देश आहे.

इन्शुरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथॉरिटी ऑफ इंडियाने आखून दिलेल्या महाराष्ट्र राज्य विमा जागरूकता योजनेंतर्गत हा उपक्रम राबवण्यात येत आहे. यामध्ये आदित्य बिर्ला सन लाईफ इन्शुरन्सला महाराष्ट्र राज्यासाठी आघाडीची जीवन विमा कंपनी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. गेले अनेक आठवडे एबीएसएलआयने अमरावती जिल्ह्यातील विविध ग्राम पंचायतींमध्ये जागरूकता शिबिरे आयोजित केली आहेत. डावरगाव आणि नांदगाव इत्यादी गावांचा त्यामध्ये समावेश आहे. ही सर्व शिबिरे



उपस्थितांसाठी माहितीपूर्ण आणि समजायला अतिशय सोपी असावीत यासाठी एबीएसएलआयने खेळाच्या माध्यमातून शिक्षण देणारे एक साधन - साप-शिडीचा खेळ तयार केला आहे. हा खेळ गावकऱ्यांना विम्याच्या सर्व संकल्पना अगदी सोप्या पद्धतीने आणि खेळीमेळीने समजून घेण्यात मदत करतो.

दित्य बिर्ला सन लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडचे एमडी आणि सीईओ श्री कमलेश राव यांनी सांगितले, आदित्य बिर्ला सन लाईफ इन्शुरन्समध्ये आम्ही समाजातील तळागाळामध्ये विम्याचा प्रसार करण्यासाठी कटिबद्ध आहोत. आम्ही फक्त जागरूकता निर्माण करत नाही तर, आर्थिक जबाबदारी व दीर्घकालीन सुरक्षेच्या संस्कृतीला प्रोत्साहन देत आहोत. आम्ही असे मानतो की, प्रत्येक व्यक्तीला, ते कुठेही राहत असले तरी, त्यांच्या कुटुंबाचे भवितव्य सुरक्षित करू शकतील अशी माहिती व टूल्स मिळवण्याचा अधिकार आहे.

स्थानिक विद्यार्थी, शिक्षक आणि गावातील इतर अनेक लोक या शिबिरांमध्ये अतिशय उत्साहाने सहभागी झाले होते. वर्गांमध्ये माहिती देणारे तक्ते लावून सजावट करण्यात आली होती, एबीएसएलआयच्या प्रतिनिधींनी अतिशय सोप्या पद्धतीने विमा संकल्पना समजावून सांगितल्या. सहभागी झालेल्यांची जिज्ञासा व सक्रिय सहभागाने हे पुन्हा एकदा सिद्ध केले की, ' पर्यंत सर्वांसाठी विमा' या आयआरडीएआयचे व्हिजन पूर्ण करण्याप्रती एबीएसएलआय वचनबद्ध आहे.

## भारतीय सिनेसृष्टीत नवतारकांना योग्य व्यासपीठ मिळवून देण्यासाठी स्क्रीनचा पुढाकार !

**मुंबई, ११ जुलै :** इंडियन एक्सप्रेस ग्रुप आणि स्क्रीन या प्रकाशन संस्थेने स्क्रीन अकॅडमीची घोषणा केली आहे. व्यावसायिक प्रगतीसाठी या अकॅडमीची उभारणी होत नसल्याचे अकॅडमीच्यावतीने स्पष्ट करण्यात आले. नवोदित कलाकारांना योग्य व्यासपीठ देणे स्क्रीन अकॅडमीचे मुख्य उद्दिष्ट आहे. संस्था भारतीय चित्रपटसृष्टीतील करिअर घडवू इच्छिणा-या नवोदित कलाकारांना त्यांचे कौशल्य विकसित करण्यात मदत करेल, त्यांना मार्गदर्शन करेल.

लोढा फाऊंडेशनचे संस्थापक अभिषेक लोढा यांनी या अकॅडमीच्या उभारणीसाठी आर्थिक साहाय्य केले. स्क्रीन अकॅडमी नवोदित कलाकारांना चित्रपटाशी संबंधित मूलभूत शिक्षण देईल. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाईल. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी थेट अर्ज करता येणार नाही. त्यांना यापूर्वी सिनेमाचे प्रशिक्षण देणा-या संस्थांच्यावतीने शिष्यवृत्तीसाठी शिफारस करावी लागेल. अर्जप्रक्रियेचा तपशील www.screenacademy.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

लोढा फाऊंडेशनचे संस्थापक अभिषेक लोढा यांनी सांगितले, आपल्या देशातील कलाक्षेत्राचा विकास साधत आपण इतर देशांवर प्रभाव टाकण्याची क्षमता ठेवतो. या कामासाठी स्क्रीन अकॅडमीचे कार्य फार महत्त्वाचे आहे. यामुळे आपला देश सर्जनशील कलाक्षेत्रात जागतिक पातळीवर आघाडी घेऊ शकतो. लोढा फाऊंडेशन २०२७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी सर्वतोपरि पाठिंबा देत आहे. चित्रपट आणि सर्जनशी कला हे आपल्या देशाची प्रमुख ताकद आहे. या दोन्ही क्षेत्रांमध्ये भारताला जागतिक पातळीवर आघाडी मिळवून देण्यासाठी स्क्रीन अकॅडमी महत्त्वाची भूमिका बजावेल. या महत्त्वकांक्षी उपक्रमात स्क्रीन अकॅडमीसोबत भागीदारी करताना लोढा फाऊंडेशनला आनंद होत आहे.

## युनायटेड किंग्डम फ्रान्ससोबत युटेलसॅट मधील अपेक्षित भांडवली वाढीत सामील

**पॅरिस, ११ जुलै :** युटेलसॅट (आयएसआयएन: FR0010221234 - युरोनेक्स्ट पॅरिस / लंडन स्टॉक एक्स्चेंज: ईटीएल) ने जाहीर केले आहे की युटेलसॅटने दिनांक १९ जून २०२५ रोजी जाहीर केलेल्या अपेक्षित भांडवली वाढीत युनायटेड किंग्डम सहभाग घेणार आहे. आणखी एका प्रमुख संदर्भ हिस्सेधारकाच्या या अतिरिक्त सहभागामुळे एकूण उभारली जाणारी रक्कम €1.5 बिलियन पर्यंत वाढविणार आहे आणि म्हणून युटेलसॅटची दीर्घकालीन धोरणात्मक दृष्टीकोनाची अंमलबजावणी आणखी बळकट करणार आहे.

युनायटेड किंग्डमच्या विज्ञान, नवोपक्रम आणि तंत्रज्ञान सचिवांमार्फत महाराजांची सरकार एकूण €163.3 मिलियन गुंतवलेल्या रक्कमसाठी राखीव भांडवली वाढीला आणि राखीव भांडवल वाढीनंतर त्याच्या हिस्स्याच्या प्रमाणानुसार राइट्स इश्यूला अनुमती दर्शविण्यासाठी एपीई (एजेन्स देस पार्टिसिपेशन्स दे एल'एटाट), भारती स्पेस लिमिटेड, सीएमए सीजीएम आणि एफएसपी (एकत्रितपणे राखीव भांडवल वाढ गुंतवणूकदार) मार्फत फ्रेंच राज्यात सामील झाली आहे. राखीव भांडवल वाढीच्या गुंतवणूकदारांची बांधिलकी, इतर गोष्टींबरोबरच कॅलेंडर २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीच्या शेवटी घेतल्या जाणाऱ्या असाधारण हिस्सेदारांच्या बैठकीत हिस्सेदारांच्या मंजुरीच्या, पारंपारिक नियामक मंजुरींच्या, तसेच परस्पर स्वीकार्य शर्तींच्या अंतर्गत एका राखीव भांडवली वाढीनंतर मालकी संरचनेचे प्रतिबिंब दर्शविणाऱ्या एका सुधारित, सामंजस्य नसलेल्या भागधारकांच्या कराराच्या अंमलबजावणीच्या अधीन असणार आहे.

माननीय पीटर काइल, विज्ञान, नवोपक्रम आणि तंत्रज्ञानासाठी राज्य सचिव पुढे म्हणाले: आपल्या फोनवर हवामान भविष्यवाणी तपासण्यापासून आपल्या गाड्यांमध्ये जीपीएस कडून मार्गदर्शन मिळविण्यापर्यंत, उपग्रहांमुळे यूके अर्थव्यवस्थेला :३६४ बिलियनच्या औद्योगिक उपक्रमास आधार लावला जात आहे. परंतु त्यांची महत्त्वाची भूमिका आर्थिक वृद्धीपेक्षा जास्त कार्य करते.

सुनील भारती मित्तल, सह-अध्यक्ष युटेलसॅट समूह म्हणाले, मी खूश आहे कारण यूके ने भारती आणि फ्रेंच राज्यात सामील होऊन युटेलसॅट ग्रुपमध्ये आणखी गुंतवणूक करण्याचे जाहीर केले आहे आणि मी पंतप्रधान स्टारमर यांचे या बाबतीतील दूरदृष्टी आणि नेतृत्वाबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

जीन-फ्रँकोइस फॅलाशर, मुख्य कार्यकारी अधिकारी, युटेलसॅट म्हणाले: वनवेबचा मुख्य आधार असलेल्या महाराजांच्या सरकारकडून आणि त्यानंतर आमच्या लो अर्थ ऑर्बिट प्रवासाच्या सुरुवातीपासूनच युटेलसॅटचे स्थिरक हिस्सेदारांकडून मिळालेल्या या पाठिंब्यामुळे आम्ही खूप खुश आहोत. सध्याच्या वातावरणात आपल्या देशांनी एकत्र काम करणे आणि एकमेकांना समर्थन प्रदान करणे अत्यावश्यक आहे, हे एक प्रमुख सार्वभौम धोरणात्मक मालमत्ता बनलेल्या अंतराळाला सुद्धा लागू आहे. आम्ही यूके ला आमच्या घरगुती बाजारांपैकी एक म्हणून मानतो आणि तिच्या प्रती आम्ही बांधील आहोत आणि आमच्या सर्व सार्वभौम व व्यावसायिक भागधारकांच्या आवश्यकतांचे निराकरण करण्यासाठी वनवेबच्या विकासाला समर्थन देण्यास बांधील आहोत.

## सीमेन्स लिमिटेडला नागपूर मेट्रो फेज २ साठी प्रगत सिग्नलिंग आणि दूरसंचार तंत्रज्ञानासाठी सुमारे रु. ७७३ कोटींच्या ऑर्डर्स मिळाल्या

**नागपूर, ११ जुलै :** सीमेन्स लिमिटेडला महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महा-मेट्रो) कडून एकूण सुमारे रु. ७७३ कोटींच्या दोन स्वतंत्र ऑर्डर्स मिळाल्या आहेत. या ऑर्डर्स नागपूर मेट्रो रेल प्रकल्प फेज २ साठी (फेज १ च्या वाढीसह) कम्युनिकेशन-बेस्ड ट्रेन कंट्रोल सिग्नलिंग तंत्रज्ञानाच्या डिझाइन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंगसाठी आणि त्याच फेजसाठी प्रगत दूरसंचार तंत्रज्ञानासाठी आहेत. प्रकल्प अंमलबजावणीसाठी एकूण कालावधी सुमारे ४२ महिने आहे.

४३.८ किलोमीटर नेटवर्कवरील ३२ स्थानकांचा समावेश असलेला हा प्रकल्प, ट्रेनची वारंवारता वाढवण्यासाठी, प्रवाशांचा अनुभव सुधारण्यासाठी आणि सर्वोच्च सुरक्षा मानकांची खात्री करण्यासाठी सीमेन्सच्या मेट्रो रेल तंत्रज्ञानाचा वापर करतो. हे तंत्रज्ञान मेट्रो नेटवर्कमध्ये १००% वेळेचे पालन, ऊर्जा बचत आणि अनुकूलित हेडवे सक्षम करेल तसेच सर्वोच्च पातळीची सुरक्षा सुनिश्चित करेल.

सीमेन्स लिमिटेडचे मोबिलिटी बिझनेसचे प्रमुख राजीव जोइसर म्हणाले, आमच्यावरील सातत्यपूर्ण विश्वासाबद्दल आम्ही महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडचे आभारी आहोत. हा प्रकल्प नागपूरच्या शाश्वत शहरी विकासात महत्त्वपूर्ण योगदान देईल. भारताच्या शहरी भविष्यासाठी ऑटोमेशन, डिजिटलायझेशन आणि शाश्वतता एकत्रित करणारे एंड-टू-एंड मोबिलिटी तंत्रज्ञान वितरित करण्याची सीमेन्सची क्षमता हे पुढे दर्शवते.

## नैसर्गिक शेतीमुळे अधिक उत्पादन आणि धरती मातेचे संरक्षण सुनिश्चित होईल

**नवी दिल्ली, ११ जुलै :** जेव्हा ग्रामीण भारतात परिवर्तनाची गोष्ट केली जाते, तेव्हा केवळ योजना पुरेशा ठरत नाहीत. त्यामागे एक ठोस विचार, दिशा आणि दीर्घकालीन दृष्टिकोन असणे आवश्यक असते. हीच दूरदृष्टी आज भारताच्या सहकारी चळवळीत आणि कृषी सुधारांमध्ये स्पष्टपणे दिसून येते. देशाच्या सहकारी क्षेत्रात नवचैतन्य निर्माण झाले आहे. ग्रामीण भारताची अर्थव्यवस्था, शेती आणि स्वावलंबनाची गोष्ट निघाली की सहकार या शब्दाचा नैसर्गिकरीत्या उच्चार होतो.

अलीकडे अहमदाबादमध्ये झालेल्या सहकार संवाद या कार्यक्रमात, जो की आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त आयोजित केला गेला होता, सहकार क्षेत्राशी जोडलेल्या महिलांनी आणि मैदानात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी ज्या आत्मविश्वासाने आपल्या यशकथा मांडल्या, त्यावरून हे स्पष्ट होते की परिवर्तन केवळ कागदावर नाही, तर प्रत्यक्ष जमिनीवर घडत आहे.

या परिवर्तनाचे बीज तेव्हाच पेरले गेले होते, जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सहकार मंत्रालयाची स्थापना करून त्याला एक स्वतंत्र ओळख दिली आणि हे स्पष्ट केले की ग्रामीण भारताचा विकास गावाच्या सामूहिक ताकदीतूनच होणार आहे. हे बीज वटवृक्षात रूपांतरित करण्याचे श्रेय केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शहा यांना जाते ज्यांनी या चळवळीला राष्ट्रीय चर्चेचा भाग बनवले आहे.

अमित शाह जेव्हा नैसर्गिक शेतीबद्दल बोलतात, तेव्हा त्यामध्ये केवळ पर्यावरणाची काळजी नाही, तर भारताच्या सांस्कृतिक चेतनेचा स्पंदन जाणवतो. त्यांचं मत आहे की रासायनिक शेतीमुळे केवळ जमिनीनाच नाही, तर शेतकऱ्याच्या आत्मनिर्भरतेलाही नुकसान झालं आहे. या रासायनिक शेतीने थकलेल्या जमिनीला जेव्हा नैसर्गिक पद्धतीने नवी ऊर्जा मिळते, तेव्हा शेतकऱ्याला केवळ उत्पादनच नव्हे, तर आत्मगौरवही प्राप्त होतो. एकीकडे नैसर्गिक शेतीमुळे अधिक उत्पादन होईल आणि दुसरीकडे धरती मातेचे संरक्षणही सुनिश्चित होईल. त्यामुळे नैसर्गिक शेती हा केवळ एक पर्याय नसून भविष्यासाठी अनिवार्य गरज आहे.

या संवादातून हेही स्पष्ट झाले की आता सहकार हा केवळ डेअरी किंवा कर्जपुरवठ्यापुरती मर्यादित राहिलेला नाही. ही चळवळ आता गावोगाव पोहोचत आहे जिथे गोबर केवळ टाकाऊ पदार्थ नाही, तर समृद्धीचं साधन बनले आहे. पशुपालन आणि नैसर्गिक शेतीचा हा संगम ग्रामीण अर्थव्यवस्थेला आत्मनिर्भरतेच्या नव्या उंचीवर घेऊन जात आहे. महिलाही आता केवळ दूध उत्पादनातच नव्हे, तर जैविक खत, नैसर्गिक कीटकनाशक तयार करण्यासारख्या कामांमध्येही सहभागी होत आहेत.

## सॅमसंग सेमीकंडक्टर इंडिया रिसर्चकडून गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक कोलार गोल्ड फिल्ड्स येथे 'सॅमसंग स्किल डेव्हलपमेंट सेंटर' लाँच

**गुरूग्राम, ११ जुलै :** सॅमसंग सेमीकंडक्टर इंडिया रिसर्च (एसएसआयएआर) ने आज कर्नाटकमधील कोलार गोल्ड फिल्ड्स (केजीएफ) येथे गव्हर्नमेंट पॉलिटेक्निकमध्ये त्यांच्या पहिल्या 'सॅमसंग स्किल डेव्हलपमेंट सेंटर'चे उद्घाटन केले. कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) उपक्रमाचा भाग म्हणून एसएसआयआरने पाच अत्याधुनिक प्रयोगशाळांच्या विकासाला पाठिंबा दिला आहे, ज्यांचा आर्टिफिशियल इंटेलिजन्स/मशिन लर्निंग (एआय/एमएल), सायबरसुरक्षा, ऑटोमेशन, रोबोटिक्स आणि मुलभूत अभियांत्रिकी विषयांमध्ये प्रत्यक्ष शिक्षणाला चालना देण्याचा मनसुबा आहे.



हा उपक्रम देशाच्या दुर्गम भागांमधील तरूणांना परिवर्तन व भावी नाविन्यतेचे उत्प्रेरक बनण्यास सक्षम करण्याप्रती, तसेच सर्व पार्श्वभूमींमधील विद्यार्थ्यांमध्ये अभियांत्रिकी व नाविन्यतेप्रती आवड निर्माण करण्याप्रती सॅमसंगच्या कटिबद्धतेशी संलग्न आहे. या सहयोगाच्या माध्यमातून सॅमसंग तरूण विचारवंतांना सक्षम करत आहे, शिक्षणाचा दर्जा उंचावत आहे आणि देशभरात वैज्ञानिक जिज्ञासूवृत्ती व नाविन्यतेची संस्कृती घडवत आहे.

एसएसआयआरचे कार्यकारी उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक बालाजी सौरीराजन म्हणाले, ''हा उपक्रम ग्रामीण कर्नाटकामधील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. आम्ही कौशल्य विकासासंदर्भातील भारत सरकारच्या मिशनला पूर्णपणे पाठिंबा देतो आणि डिजिटल तफावत दूर करण्याप्रती कटिबद्ध आहोत. विद्यार्थ्यांना एआय, आयओटी आणि इतर उदयोन्मुख तंत्रज्ञानांमधील ज्ञानासह सक्षम करत आमचा अमर्यादित संधी निर्माण करण्याचा आणि जागतिक डिजिटल अर्थव्यवस्थेमध्ये भारताचे स्थान सुनिश्चित करण्याचा मनसुबा आहे.''

कर्नाटक राज्य हस्तकला विकास महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. रूपकला एम. शशिधर, महाविद्यालयीन आणि तांत्रिक शिक्षण विभागाच्या आयुक्त श्रीमती मंजुश्री एन., सरकारी पॉलिटेक्निक केजीएफच्या प्राचार्य श्रीमती गीतांजली एस. यांनी उपस्थिती दाखवून उद्घाटन समारोहाची शोभा वाढवली, तसेच याप्रसंगी ५०० हून अधिक विद्यार्थी, प्राध्यापक आणि सॅमसंग व कर्नाटक सरकारचे मान्यवर उपस्थित होते.


## आज का अंदाज

शनिवार १२ जुलै २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | मुंबई बाजार |
| --- | --- |
| ३ ६ ७ ० | |
| १५७ २४० २६९ २३५ | |
| ४९० ३६७ ४५८ ४७९ | |
| ५८० १४४ ३४० ३८९ | |
| ३२ ६२ ७१ ०१ | |
| ३८ ६८ ७५ ०५ | |
| ३४ ६४ ७९ ०९ | |

१२ जुलै : सर्व बाजारांसाठी

| | | | |
| --- | --- | --- | --- |
| १२ | २२ | ५३ | ८३ |
| १० | २० | ५४ | ८४ |
| १६ | २६ | ५७ | ८७ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## शरद केळकर आणि निहारिका चौक्सी यांच्या तुम से तुम तक साठी जावेद अली आणि पलक मुच्छल यांचे भावस्पर्शी शीर्षकगीत!

**मुंबई, ११ जुलै :** कथाकथनामध्ये झी टीव्ही ही नेहमीच अग्रगण्य राहिली असून सामाजिक नियमांना आव्हान देणारी आणि नात्यांची पुनर्व्याख्या करणारी अशी विचार करण्यासाठी उद्युक्त करणारी कथानके सांगण्यात ते नेहमीच अग्रेसर राहिले आहेत. आपली नवीन मालिका तुम से तुम तक च्या माध्यमातून ही वाहिनी पारंपरिक अपेक्षांच्या पलीकडे जाण्याचे धाडस करणारी एक ताजेपणा आणि भावनिकतेने भरलेली प्रेमकहाणी सादर करत आहे. या मालिकेतील प्रमुख कलाकारांची शरद केळकरची धीरगंभीर आणि आकर्षक आर्यवर्धन म्हणून आणि निहारिका चौक्सी यांची हसरी खेळकर आणि कोमल हृदय असलेली अनु म्हणून घोषणा झाल्यानंतर वाहिनीने आता मालिकेच्या आकर्षक शीर्षक गीत आणि म्युझिक व्हिडीओच्या लाँचसह प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढवली आहे.

शरद केळकर आणि निहारिका चौक्सी ही प्रमुख जोडी म्हणून घोषित केल्यानंतर शांत, समंजस आणि परिपक्व आर्यवर्धनच्या भूमिकेत शरद, तर उत्साही आणि मनमिळावू अनुच्या भूमिकेत निहारिका आता झी टीव्ही या मालिकेच्या शीर्षकगीत आणि म्युझिक व्हिडीओच्या प्रकाशनामुळे प्रेक्षकांची उत्सुकता अधिकच वाढवत आहे. तुम से तुम तक या मालिकेत हे गाणे एक वेगळीच भावनिक खोली निर्माण करते, ज्यातून अनु आणि आर्यवर्धनच्या प्रेमकथेची एक झलक प्रेक्षकांना मिळते. प्रसिद्ध गायक जावेद अली आणि पलक मुच्छल यांच्या हृदयस्पर्शी आवाजात सादर झालेले हे गीत आपल्या अर्थपूर्ण शब्दांनी आणि आत्म्याला भिडणाऱ्या संगीताने मालिकेचा गाभा सादर करतो. व्हिडीओमध्ये शरद आणि निहारिका यांच्यातली केमिस्ट्री त्यांच्या कथेबाबतच्या उत्सुकतेत आणखी भर टाकते.

## राशीभविष्य

**मेष :** आरोग्याच्या बाबतीत आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. तुमच्या राशीबद्दलच्या चंद्राच्या दृष्टीकोनातून तुम्ही थोडे भावनिक देखील होऊ शकता. आर्थिक बाबतीत आजचा दिवस सामान्य राहील.

**वृषभ :** तुम्हाला तुमच्या कामांमुळे चांगला फायदा मिळेल. नवीन उत्पन्नाचे मार्ग मिळाल्याने तुमचे मन आनंदी होईल. व्यवसायातही आज तुमची उत्तम कमाई होईल. आपल्या सामानाची काळजी घ्यावी.

**मिथुन :** आज कोणाच्याही प्रभावाखाली येऊन कोणताही आर्थिक निर्णय घेणे टाळा. मुलांना स्पर्धा आणि शिक्षणात उत्तम यश मिळेल, ज्यामुळे तुमचे मन आनंदी होईल. व्यवसायात पूर्ण सहकार्य मिळेल.

**कर्क :** आज तुमची कामे सहजपणे पूर्ण होतील. पण काही शत्रू तुमच्यावर वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न करतील, ज्यांच्यापासून तुम्हाला पळ काढावा लागेल. तुम्ही तुमच्या भावंडांसोबत आनंदाचे क्षण घालवाल.

**सिंह :** आज तुम्हाला कुटुंबासोबत मनोरंजक क्षण घालवण्याची संधी मिळेल. एखाद्या शुभ कार्यक्रमात सहभागी व्हाल. कामाच्या ठिकाणी आज तुमचे मन उत्साही राहील. विद्यार्थ्यांना खूप मेहनत घ्यावी लागेल.

**कन्या :** नोकरी आणि व्यवसायाच्या बाबतीत आजचा दिवस फायदेशीर राहील. तुम्हाला आज कामाच्या ठिकाणी लाभ आणि प्रगतीची संधी मिळेल. ज्यांना नोकरी हवी आहे, त्यांना आज यश मिळेल.

**तुळ :** आज तुम्ही तुमच्या बजेटवर काम करू शकाल. अनावश्यक खर्चांवर नियंत्रण ठेवू शकाल. जर तुम्ही कोणाला पैसे उधार दिले असतील तर ते तुम्ही परत मिळवू शकता. लोकांकडून लाभ आणि आदर मिळेल.

**वृश्चिक :** व्यापार आणि व्यवसायासाठी केलेला प्रवास सुखद आणि फायदेशीर ठरेल. आज तुम्ही कोणत्याही मालमत्तेत गुंतवणूक करण्याचा विचार करत असाल, तर हा दिवस उत्तम आहे. नशिबाची पूर्ण साथ मिळेल.


**धनु :** आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी नवीन कल्पना आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची संधी मिळेल. तुमच्या गोड बोलण्यामुळे व्यवसायात नवी ऊर्जा येईल. यामुळे कमाई वाढण्याची शक्यता आहे.

**मकर :** आज तुम्ही तुमच्या स्वभावात शांतता आणि संयम ठेवा. यामुळे तुम्हाला नक्कीच फायदा होईल. राजकारणात केलेल्या प्रयत्नांना यश मिळेल. तुमची सरकारी कामं पूर्ण होऊ शकतात.

**कुंभ :** दिवसाची महत्त्वाची कामं सकाळीच पूर्ण करा. मुलांकडून काही चिंता वाढवणारी बातमी मिळू शकते, ज्यामुळे तुम्ही थोडे त्रस्त व्हाल. शत्रूंपासून सावध राहा. तुम्ही प्रिय व्यक्तीसोबत फिरायला जाऊ शकता.

**मीन :** नोकरी आणि व्यवसायात नवीन करार झाल्यामुळे तुमचा मान वाढेल. काही अप्रिय लोकांशी भेट झाल्यामुळे थोडा त्रास होऊ शकतो. मुलांबद्दलची कोणतीही चिंता आज कमी होईल.

## शब्दकोडे क्रमांक २१६२



**आडवे शब्द :-**

१) मरेपर्यंत उपोषण
६) बिल्व
७) भावी काळ
१०) कृष्णोपदेश
११) नासाडी, नासधूस
१५) करणारा
१७) आपले राष्ट्रगीत
२०) प्राण
२२) महिलांचे एक कर्णभूषण, फळाचा तुकडा
२४) सरळ लांब वासा
२५) निकट
२७) बाण
२८) सर्वस्व
३०) फार बलाढ्य, जोरदार (नशीब)
३१) कावकाव करणारा पक्षी
३३) रात्र
३४) वर्षाव
३६) श्वशुर
३८) कहाणी
३९) बुटका
४१) चामखीळ
४३) मोठी नक्षीदार सतरंजी
४५) आंबा (हिं )
४६) वर्ष
४७) प्रख्यात होणे
४९) गडी माणसे
५०) सुंदर तरुणी
५१) बारीक केस
५२) केव्हा (हिं )
५३) चिंता, पर्वा
५४) संध्याकाळ
५५) जास्तीत जास्त
५६) झाडाचे टॉनिक
५७) कबूतर
५९) धागे, तंतू
६१) माणूसकी
६४) नंतर
६५) कारण
६६) घाई
६८) आश्चर्याची गोष्ट
७१) तेज, कांती
७३) राजसुख
७४) पूजेचे ताट
७६) जाडसर पीठ
७७) शिखराचे टोक
७८) मला
७९) आणि

**उभे शब्द :-**

२) योग करणारा
३) वारक-यांचा ध्वज
४) शंभर
५) धमनी
६) डाळीचे पीठ
८) आकाशयान
९) चिंता
१२) दृष्टीभेट
१३) गोव्याची राजधानी
१४) उजेड
१६) नाश पावणे, अधोगती होणे
१८) आकाश
१९) थडगे, समाधी
२१) वाढणे
२३) परकीय, उपरा
२४) युद्ध
२६) नवऱ्याच्या दुसऱ्यापत्नी बद्दलचा द्वेष
२९) मालक
३२) व्रत
३४) वरचा भाग
३५) इच्छा
३७) गवंडी
३८) फोक, छडी
३९) मोका, संधी
४०) फार उष्ण वा गार नसलेला
४२) प्रश्नोत्तरे
४४) मनाची शक्ती
४५) संगमरवरी दगड
४६) राखून ठेवलेले
४८) एक बारीक धान्य
५२) मिळवता, कमाई करणारा
५६) व्यापाऱ्यांची प्रत्येक खात्याची नोंद वही
५८) वर्तन
६०) समाचार
६१) वरचा मजला
६२) सिंह
६३) वडील
६५) च्या पुढे
६७) शोध, माग
६९) श्रीरामाच्या एका मुलाचे नाव
७०) पद्धत
७२) हिमालयातील एक केसाळ प्राणी
७५) दिवा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| न | व | ल | वि | शे | ष | | सा | मा | न | सु | मा | न | | नि |
| | र | ग | | व | ट | वृ | क्ष | | य | | ग | व | ग | वा |
| स | | ट | क | ट | क | | र | द | न | क | | ला | ज | रा |
| ट | क्र | | र्ज | | र्णी | | ता | स | | स | म | ई | | |
| र | ज | त | | ओ | हो | टी | | रा | म | दा | स | | मो | द |
| फ | ळ | | प | ळ | णे | | ना | | ग | र | | पा | | म |
| ट | | पा | र | ख | | ज | ना | व | र | | पी | क | दा | णी |
| र | सा | | स्प | | वा | व | | र | | कि | डा | | रो | |
| | ख | ब | र | बा | त | | र | क | बा | | दा | वे | दा | र |
| ना | र | ळ | | त | ड | क्र | फ | ड | कि | | य | | र | ज |
| र | | क | ल | मी | | य | | | थे | त | क | | | नी |
| द | म | ट | | दा | र | म | दा | र | | हा | | सा | म | ना |
| | ख | | पा | र | वा | | ह | | व | न | वा | स | | थ |
| प | ला | य | न | | ना | म | क | र | ण | | स | रा | व | |
| | शी | | क | था | | न | | द | वा | खा | ना | | सा | य |

# महावितरणने लॉटरी पद्धतीने केले विविध कामाचे वाटप

## ४२ बेरोजगार अभियंताना ९० लाखाचे दिले काम



**▪अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :** महावितरण मधील विद्युत कामे बेरोजगार विद्युत अभियंत्यांना विना स्पर्धा थेट लॉटरी पद्धतीने देण्याचे धोरणाला बांधिल राहत,अकोला जिल्हा कार्यालयाअंतर्गत जिल्हा नियोजनात मंजूर झालेली ८९.६४ लाख रूपयाची ४२ कामे बेरोजगार विद्युत अभियंत्यांना देवून त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. महावितरणच्या ' विद्युत भवन 'येथे निमंत्रित बेरोजगार अभियंत्यांच्या उपस्थितीत लॉटरी पद्धतीने या कामांचे वाटप करण्यात आले असून यात जिल्हा विकास नियोजनाच्या सर्वसाधारण प्रणाली सुधारणा (छउ्ङख) योजनेअंतर्गत करावयाचा कामाचा यात समावेश आहे .

महावितरणच्या अकोला जिल्ह्याच्या अधीक्षक अभियंता प्रतिक्षा शंभरकर यांच्या मार्गदर्शनात उपस्थितीत बेरोजगार अभियंतांना द्यावयाच्या काम ाच्या लॉटरीची (दि.१० जुलै)सोडत करण्यात आल्यानंतर ८५ लाखाची ४२ कामाचे वाटप करण्यात आले.यावेळी महावितरणचे व्यवस्थापक वित्त व लेखा राहुल चौधरी,उपकार्यकारी अभियंता मनोज खांडरे,उपकार्यकारी अभियंत्या मनिषा बुरांडे यांच्यासह लॉटरी पध्दतीत सहभागी झालेले १०५ अभियंते उपस्थित होते.

विद्युत अभियांत्रिकी शाखेतील पदवी किंवा पदविकाधारक बेरोजगार अभियंत्यांना महावितरणतर्फे १० लाख रुपयापर्यंतची कामे बिना स्पर्धा थेट लॉटरी पद्धतीने देण्याचे धोरण आहे . या धोरणानुसार वर्षभरात एका अभियंत्याला १० लाख रुपयाची ५ अशी एकून ५० लाख रूपयाची कामे देण्यात येतात, ही कामे विहीत मुदतीत यशस्वीरित्या पुर्ण केल्यास पुढिल वर्षी १५ लाख रुपयापर्यंतची पाच अशी एकून ७५ लाख रूपयाची कामे लॉटरी पद्धतीने दिल्या जाते.

# माळीपुरा परीसरातील ॲटोची तोडफोड करणाऱ्या गांव गुंडांना घेतले ताब्यात



**▪अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :** पोलीस स्टेशन रामदासपेठ, अकोला येथे दि.०८/०७/२०२५ रोजी फिर्यादी नामे रेवनकुमार रामभाउ गायकवाड वय ६० वर्ष व्यवसाय ॲटो चालक रा. माळीपुरा सोरटेश्वर मंदीर मागे अकोला यांनी फिर्यादी दिली की, दि. ०८/०७/२०२५ रोजी चे ०८/३० वा. चे सुमारास नेहमी प्रमाणे ते त्यांचा ॲटो क्र एम. एच. ३० एए ६६५२ हा त्यांच्या राहत्या घरा जवळ उभा केला होतो तसेच त्यांचा मोहल्यातील राहणारे नरेंद्र बाळाभाउ रनपीसे यांचा सुध्दा ॲटो ई रिक्षा हा सुध्दा तीथेच उभा केला होता दि. ०८/०७/२०२५ रोजी ०२/३० वा चें दरम्याण कोनीतरी अज्ञात इसमाने दोन्ही ॲटोचे समोरील काच फोडून अंदाजे ४००० / रू चे नुकसान केले. वरून फिर्यादी यांच्या जबानी रिपोर्ट वरून पो.स्टे. रामदासपेठ अकोला येथे अदखलपात्र गुन्हा क्र. ४९९/२५ कलम ३२४ (४) बि.एन.एस प्रमाणे अदखलपात्र गुन्हा नोंद केला.सदर अदखलपात्र गुन्हयामध्ये प्रतिबंधक पथक यांना मिळालेल्या गोपनीय बातमीदारचे माहीतीवरून तसेच सि.सि. टि.व्ही फुटेज अधारावर १) ओम सुरेश खरे वय २० वर्ष २) ललीत रमेश बनसोड वय १९ वर्ष दोन्ही रा. माळीपूरा अकोला यांचा शिताफीने शोध घेवुन त्यांना सदर प्रकरणा बाबत विचारपुस केली असता त्यांनी सदरचा प्रकार केल्याची कबुली दिली. वरून पोस्टे रामदासपेठ येथील अदखलपात्र गुन्हयात सहभाग असल्याने त्यांच्यावर प्रतिबंधक कार्यवाही करण्यात येत आहे.सदर घटनेमुळे माळीपुरा परीसरात दहशतीचे व भितीचे वातावरण निर्माण झाले होते सदर परीसर हा जातीय दुष्ट्या संवेदनशील असुन अशा घटणेतुन गैरसमज पसरून जातीय वातावरण. दुषीत होण्याची शकयता असते. अशा परीसरातील रामदासपेठ पोलीसांनी अत्यंत परीश्रम घेत २४ तासाच्या आत घटणेला जवाबदार असलेल्या व्यक्तीचा शोध घेतला व त्यांच्यावर प्रभावी प्रतिबंधक कार्यावाही केल्याने सदर परीसरातील नागरीकांमध्ये गैरसमज दुर होवुन पोलीसांचे सर्व स्थरावर कौतुक केले

# पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या हस्ते साने गुरुजी मंडळ,पातूर चा गौरव



**▪पातुर,दि ११ (प्रतिनिधी) :** अकोला पोलीस दलाच्या वतीने मिशन उडान अंतर्गत पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या संकल्पनेतून जागतिक अमली पदार्थ विरोधी दिना निमित्त अंमली पदार्थ मृत्यूचा मार्ग या विषयावर जिल्ह्यात पोस्टर स्पर्धेचे व जनजागृती मोहिम राबविण्यात आली होती तसेच शालेय व महाविद्यालयीन स्तरावर पोस्टर स्पर्धेमध्ये जिल्ह्या मधून बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेचा निकाल व बक्षीस वितरण दि.०९ जुलै २०२५ रोजी दुपारी ०४ वाजता पोलीस लॉन अकोला येथे आयोजित करण्यात आला होता.यावेळी २६ जून रोजी जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिना निमित्य अकोला पोलीस दल प्रस्तुत मिशन उडान व जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक सर यांच्या मार्गदर्शनाखाली अकोले करांमध्ये मध्ये प्रभावी पणे जनजागृती व्हावी यासाठी टॉवर चौक व रेल्वे स्टेशन येथे लोककला व पथनाट्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी पातूर येथील साने गुरुजी कला व सांस्कृतिक क्रीडा बहु. मंडळाने अंमली पदार्थ मृत्यूचा मार्ग या विषयावर विविध लोककलेतून व पथनाट्यातून आणि लोकगीतातून अम ली पदार्थ किती घातक आहे याची माहीती देऊन उडान मिशन मध्ये सहभागी होऊन व पोलिस विभागाला सहकार्य केले.त्याकरिता जिल्हा पोलीस अधीक्षक मा.अर्चित चांडक सर यांनी साने गुरुजी मंडळ,पातूर व मंडळाचे सर्व कलावंत शाहीर विशाल राखोंडे, लोककवी सागर राखोंडे, सुखदेव उपर्वट, प्रकाश इंगोले, गजानन आवटे, श्याम उगले, गणेश देवकर, प्रज्वल इंगळे, रवी कढोणे, पल्लवी मांडवगणे, शुभांगी उमाळे यांना प्रशस्तीपत्र देऊन कार्याचा गौरव केला.

# ९२ व्या अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिभावाने सांगता

## श्री विठ्ठल मंदिर जुने शहर येथे दहीहंडी गोपाळकाला व पालखीने वातावरण भक्तीमय







**▪अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :** स्थानिक जुने शहर स्थित ३२१ वर्ष पुरातन श्री विठ्ठल मंदिर येथे गत ९२ वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. आषाढ शुद्ध नवमी ते आषाढ शुद्ध पौर्णिमा या कालावधीत या सप्ताहाचे आयोजन करण्यात येते, सप्ताह भर अखंड नाम जप भजन हरिपाठ महिला भजनी मंडळाचे कार्यक्रम इत्यादी दिवसभर सुरू असतात. रोज रात्री ह भ प डॉ सौ नंदिनीताई कडूस्कर नागपूर यांचे सुश्राव्य कीर्तन झाले देवशयनी एकादशी अर्थात आषाढी एकादशीच्या दिवशी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात पहाटे पाच वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी षोडशोपचारे अभिषेक व महापूजा मंडळाचे सर्व सेवा अधिकारी श्री कृष्णा गोवर्धन शर्मा व सौ अर्चना शर्मा यांचे हस्ते संपन्न झाली. पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी सकाळी गोपाळकाला व दहीहंडी करण्यात आला त्याला परिसरातील आबालवृद्धानी गर्दी केली. दुपारी श्री विठ्ठल रुक्मिणीच्या उत्सव मूर्तीस महा अभिषेक करण्यात येऊन सायंकाळी श्री विठ्ठल रुख्मिणी च्या उत्सव मूर्तीची भव्य शोभयात्रा काढण्यात आली या शोभयात्रेमधील गोरेगाव माझोड बोरवाकडी गायगाव इत्यादी संप्रदायिक भजनी मंडळानी सहभाग घेतला या पूर्ण सप्ताहमध्ये श्री आशिष बलाखे गुरुजी ऋषिकेश पाठक व्यंकटेश गुरुजी यांनी दैनंदिन पूजा व पौरोहित्याची बाजू सम र्थपणे सांभाळली.हा संपूर्ण उत्सव धार्मिक परंपरेने व उत्साहात साजरा करण्यासाठी मंदिर विश्वस्त समि तीचे व मंडळाचे व्यवस्थापक रमेश अलकरी व जेष्ठ पदाधिकारी प्रवीण वाणी यांचे मार्गदर्शनाखाली सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# बार्शिटाकळी तालुका हा ओला दुष्काळ जाहिर करावा

## शेतकरी एल्गार समिती, बार्शिटाकळी तालुका तक्रार अर्ज



**▪बार्शिटाकळी,दि ११ (प्रतिनिधी) :** तालुक्यामध्ये दिनांक २७.०६.२०२५ ला सदृष्य ढगफुटी झाली त्यामुळे शेतीचे अतोनात नुकसान झालेले आहे. परंतु बार्शिटाकळी तालुक्याचे तहसिलदार त्यांनी फक्त चार ते पाच गावाचेच सर्वे करण्याचे आदेश दिले. परंतु या पावसामुळे बऱ्याच गावामध्ये अपरिमित पिकांचे नुकसान झालेले आहेत. त्यामुळे तालुक्यात ज्या ज्या गावामध्ये पाण्यामुळे नुकसान झाले आहेत.

त्या ठिकाणी शेतीच्या झालेल्या पिकांची पाहणी करून नुकसानीचे आदेश देवून पंचनामे करण्यात यावे. तसेच सतत मुसळधार पाऊस ३६ तास झाल्यास त्या ठिकाणी ओला दुष्काळ जाहिर करण्यात येतो. परंतु दि. २७.०६.२०२५ पासुन अनेकवेळा मुसळधार पाऊस बार्शिटाकळी तालुक्यात झालेला आहे व सुरूही आहे त्यामुळे शेतीचे नुकसान झालेलेच आहे. या महाराष्ट्रात नापिकीमुळे, कर्जबाजारीपणाम ुळे ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यांना आजपर्यंत शासनाने त्यांचे परिवारास योग्य मोबदला दिला नाही.

शेतीमधून पिक काढणे किती कठीण समस्या आहे हे शासनास माहित नाही काय ? जीवघेणे हिंस्र पशु लांडगे, कोल्हे, डुक्कर, या प्रमाणे अनेक प्राणी पिकाचे नुकसान करतात. या सर्व समस्यांना तोंड देवून शेतकऱ्याचे घरी पिक येते. त्याच प्रमाणे महागडे बियाणे, कृषी सेवा केंद्रातुन बोगस विकल्या जाणारे बियाणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते.

यावर्षी शासनाने पिक कर्ज माफी दिली नाही. त्यामुळे सुध्दा शेतकरी हवालदिल झालेले आहे. वरील सर्व बाबींचा विचार करून शासनाने त्वरीत नुकसान झालेल्या शेतीचा सर्वे करून बार्शिटाकळी तालुका ओला दुष्काळ जाहिर करावा व शासनाने शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे अशी मदत करावी जेणे करून शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होणार नाही. वरील सर्व बाबींची दखल घेवून मागण्या पूर्ण केल्या नाही तर शेतक-यांच्या होणाऱ्या आत्महत्येस मुख्यमंत्री व कृषीमंत्री जबाबदार राहतील.

वरील सर्व बाबींचे निवेदन मनोज जरांगे पाटील यांच्या बार्शिटाकळी तालुका मराठा कुणबी सेवक राजू पाटील शिंदे यांनी निवेदन वाचून शासनाने त्यांच्या मागण्या योग्य आहेत.

त्यामुळे त्यांनी व पुर्णाजी पाटील काकड मराठा कुणबी सेवक संतोष यांनी सुध्दा पाठींबा दिला आहे व राजु पाटील शिंदे, पुर्णाजी पाटील काकड, पाटील सोनटक्के, साहेबराव पाटील ठाकरे, प्रल्हाद पाटील, गणेश पाटील, जनार्धन पाटील, महादेव पाटील गावंडे, किरण पाटील ठाकरे, मनोहर पाटील दुकानदार, सुरेश पाटील वानखडे, संजय पाटील ठाकरे, पंकज गावंडे, विजय देशमुख, ओंकार पाटील काकड, सतिष पाटील ठाकरे, गजानन पाटील सोनटक्के, गजानन पाटील ढोरे, मंगेशभाऊ अंधारे, साहेबराव आंधळे, गजानन गिते व भारत चांभारे यांनी तहसिलदार साहेब यांना याबाबत आज दिनांक ०९.०७.२०२५ रोजी निवेदन दिले आहे.

# निष्काम कर्मयोगी संत गाडगेबाबा यांची संदेश यात्रा पालखी परत पोचली कर्ममूमित



**▪मुर्तिजापुर,दि ११ (प्रतिनिधी) :** श्री संत गाडगेबाबा यांची कर्मभूमी म्हणून ओळख असलेल्या मुर्तिजापुर येथे गौरक्षणात दि. २६ जुन गुरुवारी गाडगेबाबा यांच्या समाधी स्मारकातून निघालेली श्रीसंत गाडगेबाबा संदेश पालखी यात्रा श्रीतिर्थक्षेत्र पंढरपूर येथे दोन आषाढी यात्रेत मुक्कामी राहून तसेच श्रीसंत गाडगेबाबा जिवन संदेश व विचारांचा प्रचार आणि पसार करीत विविध यशस्वी उपक्रम राबवित संदेश पालखी यात्रा परत पोहचली. अकोला, वासिम, हिगोली, परभणी, बिड , सोलापुर अशा जिल्ह्यांतील काटेपुर्णा अकोला, वासिम, कम्प, परभणी, परळी वेजनाथ अंबेजोगाई, बार्शी ईत्यादी ठिकाण च्या मुक्कामात ईतर पालख्यातील पारंपारिक हरिपाठ , भजन , किर्तन भारुळं सादरी करणाबरोबरच श्रीसंत गाडगेबाबा यांचे संदेशांचा प्रसार व प्रचार करीत प्रबोधनात्मक वेगवेगळे उपक्रम राबविले.

महाराष्ट्र शासन

**सार्वजनिक बांधकाम विभाग,अकोला.**

**"ई" लिलावा सूचना क्र.**

**(वृत्तपत्र प्रसिद्धी करीता)**

**भांडार ई-निविदा सूचना क्रमांक ०१ सन २०२५ -२०२६**

महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग अकोला अंतर्गत असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला परिसरात खालील इमारती पाडण्याचे काम (१) वार्ड क्रं. ५.७ इमारत (सन १९८३), (२) वार्ड क्रं. २.३ इमारत (सन १९५७). (३) सिव्हील सर्जन इमारत (सन १९९३), (४) जुनी इमारत (सन १९२७) इत्यादी साहित्य ठोक रक्कमी विक्री करणे व घेतलेले साहित्य सर्व राडया रोडयासह घेऊन जाणे व सदरची जागा बांधकामास स्वच्छ करून देणे. सदर वस्तुंधा ई लिलाव पध्दतीने विक्री करणेकरीता इच्छुक लिलावदारांचे सहभागाकरीता सदर सूचना प्रसिद्ध करण्यात येत असून त्याबाबतया तपशील खालीलप्रमाण आहे.

१. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला परिसरात खालील इमारती पाडण्याचे काम (१) वार्ड क्रं. ५.७ इमारत (सन १९८३), ( २ )वार्ड क्रं. २.३ इमारत (सन १९५७). (३) सिव्हील सर्जन इमारत ( सन १९९३), (४)जुनी इमारत (सन १९२७) व घेतलेले साहित्य सर्व राडयारोड्यासह घेऊन जाणे व सदरची जागा बांधकामास स्वच्छ करून देणे सदर वस्तुंचा ई लिलाव पध्दतीने विक्री करणे व घेतलेले साहित्य सर्व राडयारांडयासह घेऊन जाणे व सदरची जागा बांधकामास स्वच्छ करून देणे संक्षिप्त तपशील htts://cauction.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

२. ई लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ इच्छित असलेल्या लिलावदारांना htts://eauction.gov.in या संकेतस्थळावर पात्रता मिळवणेसाठी आवश्यक दस्तऐवजाची पूर्तता तसेच त्याबाबत आवश्यक इसारा रक्कम इत्यादीची पूर्तता कार्यालयात करावी.

३. ई लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घेतलेल्यांनी लिलावधारकांनी आपली कागदपत्रे ऑनलाईन htts://eaction. gov.in या संकेतस्थळावर ीश्रिरव करावयाची आहेत. तसंच फॉर्म फी व इसारा रक्कमेचा डी. डी. सुध्दा स्कॅन करून uload करावयाचा आहे. व अपलोड केलेली सर्व कागदपत्रे प्रत्यक्षरित्या विभागीय कार्यालयात uload success या पाहाच पावतीसह सादर करावयाची आहेत. इच्छुक लिलावदारांची दस्तऐवज व अन्य बाबतची पडताळणी करुन झाल्यानंतरच त्यांना प्रत्यक्ष लाईव्ह ई लिलाव ई ऑक्शनमध्ये सहभागी होता येईल.

४. आमच्याकडील अपलोड असलेला टेंडर सेटवरील सर्व माहिती भरून शिक्का सहोसहांत वरील कागदपत्रांसह जमा करावयाचा आहे.

५. इच्छुक लिलावदारांचो दस्तऐवज व अन्य बाबतची पडताळणी करून त्यांना प्रत्यक्ष लाईव्ह ई लिलाव ई ऑक्शन मध्ये सहभागी होता येईल.

६. सदर कामासाठी सदर कामाचा अनुभव असणारे किंवा महाराष्ट्र शासनाच्या बांधकाम खात्याकडे वर्ग-५ अ नोंदणीकृत कंत्राटदा/ उद्यम प्रमाणपत्र / शॉप ॲक्ट धारकांकडून कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, अकोला हे ऑनलाईन निविदा मागवित आहेत.

७. सदर बाबत अधिक तपशिलाकरीता निम्न नमूद कार्यालयाकडे इच्छुक लिलावदारांना चौकशी करता येईल. कार्यकारी अभियंता सा.बां. बांधकाम विभाग, अकोला- ४४४००१.

८. इच्छुक लिलावदारांनी दि. १४.०७.२०१५ (वेळ १३.००) ते दि. २९.०७.२०१५ ( वेळ १७.०० वा. पर्यंत) या कालावधीत कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अकोला या कार्यालयात आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करावी.

९. सदरील ई लिलाव सूचनेबाबतचा अधिकीचा तपशील उपलब्ध आहे.

१०. इच्छुक खरददारांना जाहिर ई-लिलावाची प्रक्रिया करणेस रुपये १०००/- + १८० (GST १८%) असे एकूण ११८०/- फो भरणा करावी लागेल. (ना परतावा)

**कार्यकारी अभियंता**
सार्वजनिक बांधकाम विभाग
अकोला-४४४ ००१

क्र./विमाका/अम/जाही/३११

# ख्रिस्ती समाजाकडून आमदार पडळकरांचा तीव्र निषेध



**▪अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :** सांगलीत १५ जून रोजी हिंदू जन आक्रोश म ोर्चात आमदार गोपीचंद पडळकर यांनी ख्रिस्ती धर्मगुरूंना मारहाण करण्याचे व जिवे मारण्याचे खुले आवाहन करीत ११ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्रभर संतापाची लाट उसळली आहे. त्यांच्या या बेताल वक्तव्याचा निषेध करीत गुरुवार, दिनांक १० जुलै रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास अकोला जिल्ह्यातील समस्त ख्रिस्ती समाजाच्या वतीने जिल्हाधिकार्यांना निवेदन सादर करण्यात आले. यामध्ये पडळकर यांनी ख्रिस्ती धर्मियांच्या भावना दुखावल्यामुळे त्यांना अटक करून त्यांचा राजीनामा घेण्याची मागणी जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात

- **✻ पडळकरांना अटक करून राजीनाम्याची मागणी**
- **✻ जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर**

आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

ख्रिस्ती समाज शांततेचा पुरस्कार करणारा असून, संविधानाने दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकाराचे पालन करणारा आहे. मात्र आमदार पडळकर यांच्या द्वेषमूलक वक्तव्यामुळे ख्रिस्ती धर्मगुरुंच्या जीविताला आणि प्रार्थनास्थळांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण झाला आहे, अशी चिंता ख्रिस्ती शिष्टमंडळाने प्रसार माध्यमांसोबत बोलताना व्यक्त केली. निवेदनात पुढे म्हटले आहे की, भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र असून, संविधानाच्या कलम १४, १५, २५, २६ नुसार प्रत्येक नागरिकाला समानता व धर्मस्वातंत्र्याचे हक्क आहेत. मात्र पडळकर यांचे विधान संविधानाची पायमल्ली करणारे असून, ते सम ाजात तेढ व हिंसाचाराला चिथावणी देणारे आहे. त्यामुळे आमदार पडळकर यांच्यावर तातडीने गुन्हा दाखल करून अटक करावी, तसेच त्यांची आमदारकीही रद्द करावी, अशी मागणी जिल्हाधिकार्यांमार्फत राज्यपाल, मुख्यमंत्री, गृहमंत्री, विधानसभा अध्यक्ष, पोलीस अधीक्षक अकोला खासदार, आमदार आदींना पाठविण्यात आलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

## निधन वार्ता

### रघुनाथ सिद्धभट्टी



**अकोला-**श्रीनाथ दत्त मंदिर, रामदास पेठ अकोलाचे व्यवस्थापक रघुनाथ सिद्धभट्टी यांचे दि १० जुलै रोजी निधन झाले.ते ६५ वर्षाचे होतेत्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी असा आप्त परिवार आहे.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण नवसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण नवसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९६००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८१४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)



# बालांगण

## पावसाळ्यात सफारी बंद का?



यावा पुढील महिन्यामध्ये तुमच्या घरातील मोठी माणसे वन्यजीव सफारीची योजना आखली असतील त्यांना थांबवा बरे कारण यावेळी काही राष्ट्रीय उद्याने बंद असतात. मित्रांनो, आपल्याकडील जिम कॉर्बेट, रणथंभोर, बांधवगड यासारखी मोठी राष्ट्रीय उद्याने पावसाळ्यात बंद असतात. पण यामागील कारण काय असते, माहिती आहे का तुम्हाला? चला तर, आज जाणून घेऊ या.

छोट्या दोस्तांनो, पावसाळा हा जंगलासाठी नवीन जीवनाची सुरुवात करण्याचा काळ असतो. या ऋतूमध्ये वाघ, बिबट्या, हत्ती आणि अनेक पक्ष्यांसह अनेक प्राण्यांचा प्रजनन हंगाम सुरू होतो. पावसामुळे जंगलात गवत आणि वनस्पती चांगल्या प्रकारे वाढतात. त्यामुळे नवजात पिल्लांसाठी सुरक्षित आणि पौष्टिक वातावरण तयार होते. अशा वेळी, मनुष्यप्राण्यांच्या हालचाली वन्य प्राण्यांच्या दिनक्रमांमध्ये व्यत्यय आणू शकतात. म्हणूनच उद्यान प्रशासन पावसाळ्यात उद्यान बंद ठेवते. यायोगे प्राणी कोणत्याही त्रासाशिवाय त्यांचे नैसर्गिक चक्र पूर्ण करू शकतील.

पावसाळ्यात जंगल सफारी बंद ठेवण्याचा आणखी एक फायदा प्रशासनाला होतो. म्हणजेच ते या वेळेचा वापर उद्यानाच्या पायाभूत सुविधांची दुरुस्ती आणि सुधारणा करण्यासाठी करतात. बऱ्याचदा रस्ते, साइनबोर्ड, वॉच टॉवर किंवा कॅम्प एरिया खराब झालेला असतो. तेव्हा पावसाळ्यातील या सुट्टीच्या काळात त्याची दुरुस्ती केली जाते. म्हणूनच येणाऱ्या पर्यटन हंगामात उद्यान पर्यटकांसमोर चांगल्या स्थितीत येते.

माहिती असावे...

आणखी एक बाब म्हणजे पावसाळ्यात जंगलातील रस्ते निसरडे होतात, मार्ग अस्पष्ट असतात आणि मुसळधार पावसामुळे भूस्खलन किंवा अचानक पूर येण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत, जंगल सफारी केवळ कठीणच नाही तर आपल्यासारख्या पर्यटकांसाठी धोकादायक देखील ठरू शकते. म्हणून या हंगामात उद्यान बंद करणे गरजेचे असते.

ऑक्टोबरनंतर पाऊस थांबताच वनक्षेत्र पर्यटकांसाठी पुन्हा खुली होतात. देशातील जवळजवळ सर्व राष्ट्रीय उद्याने आणि व्याघ्र प्रकल्प पुन्हा एकदा पर्यटकांचे स्वागत होतात. पावसाळ्यानंतर वाढलेली हिरवळ आणि वन्यजीवांचे जीवनचक्र आपल्या जंगल सफारीचा अनुभव आणखी खास बनवतात.

## रबराच्या पट्ट्यांचे काम काय?



छोट्या मित्रांनो, तुम्ही रस्त्यांवर धावणारे मोठे ट्रक पाहात असाल. पण या ट्रकच्या टायरजवळ काळ्या रबराच्या पट्ट्या किंवा ट्यूबचे तुकडे का लटकलेले असतात, हा प्रश्न कधी तुमच्या मनात आला आहे का? आपल्यापैकी बहुतेक जण त्याकडे फक्त 'सजावट' किंवा 'जुन्या वस्तूंचा वापर' समजून दुर्लक्ष करतात, परंतु यामागे एक अतिशय व्यावहारिक आणि मनोरंजक कारण लपलेले आहे. चला, कोणते ते जाणून घेऊ या.

वाचा तर खरं

मुलांनो, रबराचे तुकडे ट्रकला वाईट नजरेपासून वाचवण्यासाठी ठेवलेले नसतात तर रबराच्या पट्ट्यांचे मुख्य काम ट्रकचे टायर स्वच्छ करणे हे असते. एखादा ट्रक रस्त्यावर, विशेषतः धुळीने किंवा चिखलाने भरलेल्या रस्त्यांवर धावतो तेव्हा टायरवर धूळ, चिखल, रेती आणि लहान दगड जमा होतात. ही घाण तशीच राहिली तर टायरची पकड कमी होऊ शकते शिवाय ते लवकर खराब देखील होऊ शकतात.

असे असताना टायर्सजवळ लटकणारे रबर स्ट्रिप्स एका साध्या पण प्रभावी तत्त्वावर काम करतात. ट्रक हलतो तेव्हा हवेच्या दाबामुळे आणि ट्रकच्या हालचालीमुळे रबर स्ट्रिप्सही सतत हलत राहतात. वेगात असताना स्ट्रिप्स वारंवार ट्रकच्या टायर्सवर आदळतात. या टकरीमुळे टायर्सवर साचलेली धूळ, माती आणि घाण सतत खाली पडत राहते. थोडक्यात हा एक प्रकारचा हलणारा टायर क्लीनरच असतो. या छोट्याशा गोष्टीमुळे ड्रायव्हरला टायर्स साफ करण्यासाठी वेळोवेळी थांबण्याची गरज राहत नाही.



## ऑलिंपियाडबद्दल महत्त्वाचे काही...

मुलांनो, तुम्ही ऑलिंपियाडबद्दल ऐकलं असेल. गणितामध्ये कारकिर्द घडवू इच्छिणारे विद्यार्थी गणिताची ऑलिंपियाड देऊ शकतात. ऑलिंपियाड ही अत्यंत आव्हानात्मक आणि कठीण परीक्षा असते. मुलांची क्षमता जाणून घेण्यासाठी विविध संस्था ऑलिंपियाड परीक्षांचं आयोजन करतात. ऑलिंपियाड स्पर्धेत सहभागी होणं ही विद्यार्थ्यांसाठी अभिमानास्पद बाब ठरते. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना राष्ट्रीय तसंच आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ उपलब्ध होतं. गणितातला कल जाणून घेण्याच्या दृष्टीने 'द इंडियन नॅशनल मॅथेमेटिकल ऑलिंपियाड' ही अत्यंत महत्त्वाची स्पर्धा समजली जाते. 'होमी भाभा सेंटर फॉर सायन्स एज्युकेशन' आणि भारत सरकारच्या अणू ऊर्जा विभागाच्या 'नॅशनल बोर्ड फॉर हायर मॅथेमेटिक्स' यांच्या संयुक्त विद्यमाने देशात ऑलिंपियाड कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. या माध्यमातून भारतीय विद्यार्थी आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या ऑलिंपियाड स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकतात.

नॉलेज

या परीक्षेचं आयोजन जानेवारीच्या तिसऱ्या किंवा फेब्रुवारीच्या पहिल्या रविवारी केलं जातं. या परीक्षेचा कालावधी चार तासांचा असतो. या परीक्षेसाठी गणिताशी संबंधित वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास करावा लागतो. ऑलिंपियाडच्या पुढच्या टप्प्यांमध्ये कठीण प्रश्न विचारले जातात. त्यामुळे गणितात हुशार असणारी मुलं ही परीक्षा देऊ शकतात.

## या शाखा महत्त्वाच्या

छोट्यांनो, तुम्ही सीआयडी आणि सीबीआयबद्दल ऐकलं असेल. मुलांनो, या दोन्ही तपास यंत्रणा आहेत. एखाद्या गुन्ह्याची उकल करण्याची जबाबदारी तपास यंत्रणांवर सोपवली जाते. या दोन्ही तपास यंत्रणांचं काम सारखंच असतं. मग या दोहोंमधला नेमका फरक तरी काय? जाणून घेऊ.

सीआयडी म्हणजे 'क्राईम इन्व्हेस्टिगेशकन डिपार्टमेंट'. ही तपास यंत्रणा राज्य सरकारच्या अखत्यारित असते. म्हणजे सीआयडी राज्य सरकारच्या आदेशाचं पालन करते. या तपास यंत्रणेला हत्या, दंगल, अपहरण चोरी यांसारख्या गुन्ह्यांच्या तपासाची जबाबदारी सोपवली जाते. ब्रिटिशांनी १९०२ मध्ये सीआयडीची स्थापना केली. ही संस्था राज्यपातळीवर काम करते. सीबीआय म्हणजे 'सेंट्रल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन'. सीबीआय ही भारत सरकारची प्रमुख तपास यंत्रणा आहे. सीबीआय विविध गुन्हे तसंच देशाच्या सुरक्षेशी संबंधित विविध घटनांच्या तपासाचं काम करते.




कोण होणार?


## काम झालं सोपं

मित्रमैत्रिणींनो, आता लॅपटॉपवर काम करत असताना फोन करण्यासाठी स्मार्टफोन हातात घ्यावा लागणार नाही. कारण तुम्ही लॅपटॉपवरूनच फोन करू शकाल. मायक्रोसॉफ्टचे 'विंडोज १०' युजर्ससाठी हे शक्य आहे. या फीचरमुळे कॉम्प्युटर किंवा लॅपटॉपवरून फोन करणं अगदीच शक्य आहे. चला तर मग, या फीचरची माहिती घेऊ या.

* मायक्रोसॉफ्टने 'विंडोज १० इनसायडर प्रिव्ह्यू बिल्ड १८९९९' चं अपडेट केल्यामुळे विंडोज १० वापरणाऱ्यांना लॅपटॉप आणि कॉम्प्युटरवरूनही फोन करता येत आहे.

* या फीचरचा वापर करण्यासाठी तुम्हाला फोनमध्ये 'युवर फोन ॲप' डाउनलोड करावं लागेल. हे ॲप मायक्रोसॉफ्टनेच तयार केलं असून अँड्रॉइड ७.० आणि त्यापुढच्या व्हर्जन्सवर ते डाउनलोड करता येईल.

* या अपडेटनंतर डेस्कटॉपमध्ये डायलर आणि कॉन्टॅक्ट्सचे ऑप्शन्स दिसतील. कॉलिंग करण्यासोबतच कॉलिंग हिस्ट्रीही कॉम्प्युटरवर बघता येईल. कॉल नाकारला म्हणजे रिजेक्ट केला तर संदेश पाठवण्याचा पर्यायही डेस्कटॉपवर दिसेल.



टेक्नो टिप्स

* या अपडेटमुळे स्मार्टफोन सतत तपासावा लागणार नाही. डेस्कटॉपवरच्या स्पीकर आणि मायक्रोफोनच्या मदतीने तुम्ही आरामात बोलू शकाल.

## रेनकोट करा स्वच्छ

पावसाळ्यात रेनकोट वारंवार वापरावा लागतो. पण त्याची योग्य स्वच्छता करावी लागते. अन्यथा आजारी पडण्याचा धोका असतो. तेव्हा आज रेनकोट योग्यरित्या कसे स्वच्छ करावा हे पाहू या.

घातल्यानंतर प्रत्येक वेळी रेनकोट स्वच्छ करण्याची आवश्यकता नाही. तो साधारणपणे महिन्यातून एकदा किंवा १०-१५ वेळा घातल्यानंतर व्यवस्थित धुवावा. एरवी ओल्या कापडाने आणि साबणाच्या पाण्याने किरकोळ डाग काढून टाकता येतात.

रेनकोट स्वच्छ करण्यासाठी कधीही ब्लीच, फॅब्रिक सॉफनर, किंवा इतर कपडे धुण्याचे पदार्थ असणारा डिटर्जंट वापरू नका कारण हे घटक रेनकोटच्या वॉटरप्रूफ घटकांना नुकसान पोहोचवू शकतात.



रेनकोटवरील बहुतेक डाग सामान्यतः चिखलाचे असतात. तुम्ही संपूर्ण रेनकोट न धुताही ते काढू शकता. त्यासाठी एका मोठ्या भांड्यात पाणी घ्या आणि त्यात एक ते दोन थेंब डिटर्जंट किंवा डिशवॉश (विम, प्रिल, इ.) घाला. साबण तयार होईपर्यंत पाणी ढवळा. आता या पाण्यात स्पंज किंवा मायक्रोफायबर टॉवेल बुडवा आणि टॉवेलने मातीचा डाग पुसून टाका. आता दुसरे स्वच्छ कापड किंवा स्पंज स्वच्छ पाण्यात भिजवा. साबणाचे अवशेष काढून टाकण्यासाठी या ओल्या कापडाने डाग पडलेला भाग पुसून टाका. आता रेनकोट स्वच्छ, धूळमुक्त ठिकाणी हॅन्गरवर लटकवा आणि तो सुकू द्या. काही वेळातच रेनकोटवरील सगळे डाग गेलेले दिसतील. तेव्हा हा उपाय नक्की करुन बघा.

करुन पाहा




ठिपके जुळवा



## मिनेस्ट्रोन सूपचा प्रवास



छोट्या दोस्तांनो, जेवायला बाहेर गेल्यानंतर सूप ऑर्डर करताना तुम्ही मिनेस्ट्रोन सूप मागवत असाल. अनेकांना ते आवडते. चला तर, आज याचा इतिहासही जाणून घेऊ या.


मुलांनो, दुसऱ्या शतकात रोमने इटली जिंकली तेव्हा आर्थिक प्रगती झाली आणि व्यापाराचे नवे मार्ग खुले झाले. यामुळे रोमच्या राजधानीत अनेक प्रकारची कृषी उत्पादने येऊ लागली आणि रोमन पदार्थांमध्ये विविध प्रकारच्या भाज्यांचा वापर होऊ लागला. रोमन स्वयंपाकघराशी संबंधित 'दे रे कोसिनारिया' या पुस्तकात 'पोलस' नावाच्या सूपचा उल्लेख आहे. हे सूप फारो (एक प्रकारचे धान्य), चणे, बीन्स, कांदा, लसूण, चरबी आणि हिरव्या भाज्यांपासून बनवले जात असे. तेच मिनेस्ट्रोन सूपचे सुरुवातीचे रूप होते. अर्थात सुरुवातीला त्याला फारसे महत्त्व नव्हते. घरांमध्ये उपलब्ध असणाऱ्या भाज्या आणि धान्यांचे मिश्रण करून हे सूप बनवले जात असे. त्यात सहसा उरलेल्या भाज्या, पास्ता, तांदूळ, बीन्स आणि कधीकधी थोडे मांस असायचे. त्याचा मुख्य उद्देश पोट भरणे आणि पोषण देणे हा होता, कारण त्यावेळी अन्न वाया घालवणे हे पाप मानले जात असे.

गप्पांगण

मुलांनो, तेव्हा हे फक्त सूप नव्हते तर इटालियन कुटुंबांसाठी एक महत्त्वाचे अन्न होते. ते मोठ्या भांड्यांमध्ये तासनतास शिजवले जात असे. त्याचा सुगंध सर्वदूर पसरत असे. दिवसभर काम केल्यानंतर हे सूप पिऊन लोकांना आराम मिळत असे.

कालांतराने, मिनेस्ट्रोन सूप बनवण्याची साधी पद्धत मागे पडली. लोक इटलीहून जगाच्या इतर भागात स्थलांतरित होत असताना या सूपची रेसिपी देखील सोबत नेली. स्वाभाविकच वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये ते बनवण्याच्या पद्धतीत बदल झाले. प्रत्येक ठिकाणच्या स्थानिक घटकांनुसार त्यात नवीन चवी जोडल्या गेल्या. त्यात अगदी स्थानिक मसालेदेखील वापरले गेले. या विविधतेमुळे मिनेस्ट्रोन आणखी लोकप्रिय झाले. आज हे सूप जगभरातील रेस्टॉरंट्समध्ये दिले जाते. आता हे फक्त गरिबांचे अन्न राहिलेले नाही, तर तो सर्व वर्गातील लोकांना आवडणारा एक पदार्थ बनला आहे.

## ताण येणार नाही



मुलांनो, तुम्हाला दिवसभरात बरंच काही करायचं असतं. शाळेत जायचं असतं, क्लास, छंदवर्ग, खेळणं, मित्रमैत्रिणींशी गप्पा, गृहपाठ, अवांतर वाचन... ही यादी न संपणारी आहे. आता या सगळ्याचं नियोजन करायचं तरी कसं, एका दिवसात एवढं सगळं कसं करता येणार अशा प्रश्न तुम्हाला पडत असेल. पण सगळ्या कामांची यादी केली तर बरंच काही सोपं होऊन जाईल. वेळेचं नियोजन किंवा व्यवस्थापन वाटतं तितकं कठीण नक्कीच नाही. तीन टप्प्यांमध्ये आपण कामाचं सगळं नियोजन करू शकतो.

लाईफस्टाईल

* सर्वात आधी कामाचे प्राधान्यक्रम ठरवा. अभ्यास, खेळणं, मित्रमैत्रिणींसोबत गप्पा, चित्र काढणं, गाणी म्हणणं असं बरंच काही तुम्हाला करायचं असतं. आता यापैकी काय महत्त्वाचं आणि काय नंतर करता येईल हे ठरवा. महत्त्वाची कामं आधी करा. तुम्ही विद्यार्थी आहात. त्यामुळे अभ्यासाला महत्त्व द्यायला हवं.

* यानंतर कामाचं नीट नियोजन करा. पहिलं काम आधी करा, मग दुसरं काम अशाप्रकारे दिवसभराची कामं करत रहा. अशाप्रकारे आठवड्याचं नियोजन करा. तुमची कामं झटपट होऊ लागतील.

### स्टडी टिप्स

#### चला, अभ्यासाला लागू या



मुलांनो, शाळा सुरु झाल्या आहेत. तेव्हा आता अभ्यासाचा वेगही वाढवावा लागेल. सर्वप्रथम तुम्ही महत्त्वाच्या विषयांच्या तयारीला लागा. प्रत्येक विषयाचे महत्त्व जाणून घ्या. पाढे वाचा. विज्ञानातल्या आधी शिकलेल्या संज्ञा लिहून काढा. शिकलेल्या पाठातील महत्त्वाचे मुद्दे तुमच्या अभ्यासाच्या खोलीतल्या भिंतीवर चिकटवा. येता जाता हा तक्ता वाचत रहा. यामुळे ऐनवेळी तुमच्यावर अभ्यासाचा ताण येणार नाही

### खादाडी

#### मस्त ब्रेड रोल



दोस्तांनो, नेहमीचं सँडविच खाऊन कंटाळा आला असेल तर सँडविच रोलही ट्राय करता येईल. यासाठी तीन ब्रेड, दोन चमचे बटर, एक गाजर, टोमॅटो सॉस एक चमचा, एक चमचा हिरवी चटणी, थोडं पाणी हे साहित्य घ्या. पहिल्यांदा ब्रेडच्या कडा कापून घ्या. आता ब्रेडच्या कडांना पाणी लावून घ्या आणि सगळे ब्रेड एकावर एक ठेऊन घ्या. ब्रेडवर थोडं थोडं पाणी लावून लाटून घ्या. आता ब्रेडच्या कडा जोडून घ्या. एका ब्रेडला टोमॅटो सॉस तर दुसऱ्या ब्रेडला चटणी लावा. आता गाजर किसून घ्या. त्यात लोणी मिसळून घ्या. तिसऱ्या ब्रेडवर गाजराचं हे मिश्रण लावा. आता सर्व ब्रेड रोलप्रमाणे गुंडाळून घ्या.

### दोस्त हे मस्त

#### अनोखं फ्रांसुआ माकड



ऑस्ट्रेलियातल्या प्राणीसंग्रहालयात दुर्मीळ प्रजातीच्या माकडाचा जन्म झाला होता. केशरी रंगाच्या या माकडाला फ्रांसुआ माकड असं म्हणतात. या प्रजातीची माकडं चीन आणि व्हिएतनाममधल्या जंगलांमध्ये आढळतात. या माकडांची पिल्लं केशरी रंगाची असतात पण प्रौढ झाल्यावर ती काळपट दिसू लागतात. ही प्रजाती दुर्मीळ म्हणून गणली जाते. या माकडांची मोठ्या प्रमाणावर शिकार झाल्याने संख्या खूप कमी झाली आहे. त्यामुळे त्यांचं रक्षण करणं गरजेचं आहे.

### योगा टाईम

#### लाभ सिंगासनाचे



सिंगासनामुळे चेहऱ्यावर चमक येते. त्वचेचं आरोग्य सुधारतं. हे आसन करण्यासाठी तुम्हाला वज्रासनात बसावं लागेल. गुडघे थोडे बाहेरच्या बाजूला न्यावे लागतील. आता दोन्ही हातांची बोटं सिंहाच्या पंजाप्रमाणे करून गुडघ्यांवर ठेवा. यानंतर श्वास घेऊन जीभ बाहेर काढा आणि सिंहाप्रमाणे आवाज काढा. गळ्याच्या स्नायूंवर ताण आला पाहिजे. हे आसन नियमित केल्याने तुमच्या त्वचेवर छान चमक येईल.

# प्रशिक्षणाच्या नावाखाली कोट्यवधींची कमाई?



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
राज्यातील गृहनिर्माण संस्थांसाठी सहकार कायद्यात दुरुस्ती करण्याचे घाटत असून गृहनिर्माण संस्थांच्या सभासदांना तीन तासाचे प्रशिक्षण अनिवार्य करण्यात येणार असल्याचे समजते.

या प्रशिक्षणासाठी प्रत्येक सभासदाकडून १२० रुपये व संस्थेकडून १००० रुपये जमा करण्यात येत आहेत. राज्यात जवळपास १ लाख २० हजार गृहनिर्माण संस्था व सुमारे ४ कोटी सभासद आहेत. याचा विचार करता मोठ्या प्रमाणात पैसे जमा होतील, हे पैसे खाजगी प्रशिक्षण संस्थांना दिले जाणार आहेत. ही एक लुटच असून ती तात्काळ थांबवावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

यासंदर्भात सहकार आयुक्तांच्या पाठवलेल्या पत्रात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे असे म्हणतात की, राज्यातील गृहनिर्माण संस्था व त्यांच्या सभासदाकडून प्रशिक्षणाच्या नावाखाली सुरु असलेली ही लूट गंभीर बाब असून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

प्रशिक्षणाच्या नावाखाली सर्वसामान्य सभासदांवर आर्थिक बोजा कशाला टाकता. प्रशिक्षण द्यायचेच असेल तर ते मोफत द्यावे, लोकांना नाहक भूर्दंड कशासाठी असा प्रश्न विचारून लोककल्याणकारी महाराष्ट्र राज्यात अशा प्रकारे सामान्य लोकांची लुट करणे योग्य नाही, असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

प्रदेशाध्यक्षांनी लिहिलेले हे पत्र काँग्रेस पक्षाचे नेते अजिंक्य देसाई, डॉ. गजानन देसाई, प्रदीप राव यांनी सहकार आयुक्तालयात जाऊन सुपूर्द केले.



■ **नागपूर :** *मागील आठवड्यातील रविवारपासून गेल्या बुधवारपर्यंत कोसळलेल्या मुसळधार पावसाने पूर्व विदर्भात मोठी हानी झाली असली तरी, शेतकऱ्यांसाठी हा पाऊस फायद्याचा ठरला आहे. संततधार पावसाने शेतात पाणी साचले असून, भंडारा व गोंदिया जिल्ह्याच्या काही भागात भात पिकाच्या रोवणीला सुरूवात झाली आहे.*

# सीबीआयचा वापर क्लीनचिटसाठीच?

## माजी मंत्री अनिल देशमुखांचा गौप्यस्फोट



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांना सीबीआयने दोन गुन्ह्यात क्लीन चिट दिली आहे. तथापि, क्लिनचिटसाठीच सीबीआयचा वापर सत्ताधाऱ्यांकडून केला जात असल्याचा आरोप शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री अनिल देशमुख यांनी केला ते नागपुरात माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

ते म्हणाले, महाविकास आघाडी सरकारमध्ये परमबीर सिंह आणि इतर पोलीस अधिकारी यांच्यावर पाच गुन्हे दाखल करण्यात आले होते. कोपरी आणि बाजारपेठ पोलीस ठाण्यात परमबीर यांच्यावर दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले होते. केंद्रातील भाजप सरकारने माझ्याविरुद्ध खोटे आरोप करण्यासाठी परमवीर सिंह यांचा वापर केला. त्यानंतर याप्रकरणाचा तपास ईडी देऊन मला खोट्या प्रकरणात तुरुंगात डांबण्यात आले. परमवीर सिंह यांनी केलेल्या आरोपाचा कधीही पुरावा दिला नाही. उलट ते फरार झाले.

तत्कालिन महाविकास विकास आघाडी सरकारला अस्थिर करण्याचे कारस्थानात सिंह यांनी मदत केली. त्यामुळेच आघाडी सरकारने त्यांच्या विरुद्ध दाखल गुन्ह्याचा तपास राज्य पोलिसांकडून काढून सीबीआयकडे दिला. तेव्हाच त्यांना क्लीनचिट मिळणार हे निश्चित झाले होते, असा दावा माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केला.

बांधकाम व्यावसायिक श्यामसुंदर अग्रवाल आणि संजय पुनामिया यांनी भागीदारीत मे. बालाजी इंटरप्रायजेस आणि मे. राजा रामदेव इंटरप्रायजेस नावाची कंपनी २००८ मध्ये सुरू केली होती. या दोन कंपन्यांद्वारे दोघांनी २००६ ते २०११ पर्यंत भागीदारीत व्यवसाय केला. मात्र, गुंतवणुकीतील नफा आणि हिशेबासह इतर कारणांवरून दोघांमध्ये टोकाचे वाद झाल्याने ही भागीदारी संपुष्टात आली.

संजय पुनामिया यांनी अग्रवाल यांच्यावर मुंबईसह इतर जिल्ह्यात अग्रवाल यांच्यावर १८ गुन्हे नोंदवले. तत्कालिन पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांच्यावर मधल्या काळात काही व्यापाऱ्यांनी खंडणीचे तर त्याच्या खात्यातील काही लोकांनी भ्रष्टाचारात आरोप केले. याची चौकशी महाराष्ट्र पोलीस चांगल्या पद्धतीने करत असताना त्याचा तपास सीबीआयकडे तपास दिला, तेव्हाच भाजप सरकार त्यांना वाचवत आहे हे कळले.

भाजप परमवीर सिंह यांना अनेकदा वाचवण्यासाठी प्रयत्न करत होते. महाराष्ट्र पोलीस चांगली चौकशी करत असताना सीबीआय कडे हे प्रकरण का दिले, असा सवाल करत ईडीसारखा जनसुरक्षा कायद्याचा वापर होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही देशमुख यावेळी म्हणाले.

## वाचाळवीरांना अटकाव करण्याची गरज

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**
भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी धर्मांतरावरून पादरींबाबत वादग्रस्त विधान केले होते. हा मुद्दा आज विधानसभेत जयंत पाटील यांनी उपस्थित केला. हजारो खिस्ती बांधव राज्यभरातून आझाद मैदानात गोळा झालेले आहेत. खिस्ती बांधवांच्या धर्मगुरूंमध्ये दहशतीचे वातावरण आहे. अल्पसंख्याक समाजाला भितीयुक्त वातावरण निर्माण होणे हे महाराष्ट्राच्या हिताचे नाही. सरकाने त्याची खात्री घ्यावी. वाचाळवीर आमदारांना मुख्यमंत्र्यांनी अटकाव करावा, अशी मागणी जयंत पाटील यांनी केली.

## संस्थाचालकाच्या मारहाणीत पालकाचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, परभणी, दि. ११ :**
मुलीचे शालेय शुल्क व टीसी मागण्यासाठी गेलेल्या एका व्यक्तीचा संस्थाचालकाच्या मारहाणीत मृत्यू झाल्याची संतापजनक घटना परभणी जिल्ह्यातील एका शाळेत घडली आहे.

परभणीच्या झिरो फाटा येथील हायटेक रेसिडेन्शिअल स्कूलमध्ये ही घटना घडली आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, परभणीतील उखळद येथील ४२ वर्षीय जगन्नाथ हेंडगे यांची मुलगी पल्लवी हायटेक रेसिडेन्शिअल स्कूलमध्ये इयत्ता तिसरीत शिकत आहे. प्रभाकर चव्हाण यांचीही शाळा आहे. पल्लवी या शाळेच्या निवासी वसतिगृहात राहत होती. पण ती लाहन असल्यामुळे तिला तिथे करमत नव्हते. त्यामुळे तिचे वडील जगन्नाथ हेंडगे तिला घरी घेऊन गेले होते.

जगन्नाथ यांनी शाळेत येऊन शालेय व्यवस्थापनाकडे आपल्या मुलीची टीसी व तिच्या प्रवेशासाठी भरलेले शैक्षणिक शुल्क मागितले. त्यावेळी शाळेचे संस्थाचालक प्रभाकर चव्हाण व त्यांच्या पत्नी रत्नमाला चव्हाण यांनी त्यांना बेदम मारहाण केली. त्यात हेंडगे यांचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर मुंजाजी हेंडगे यांच्या तक्रारीनुसार पूर्णा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे रत्नमाला चव्हाण या हिंगोली जिल्हा परिषदेच्या माजी शिक्षण सभापती आहेत. परभणी जिल्ह्यात निवासी गुरूकुल शिक्षण पद्धतीचे स्तोम माजले आहे.

## दारूबंदी सुधारणा विधेयक घेतले मागे

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ११ :**
शाळा, महाविद्यालय, अशा ठिकाणी कोणी दारू प्यायलेले आढळून आले तर कठोर कारवाई करण्यात यावी, सार्वजनिक जागेवर दारू पिऊन कोणालाही धिंगाणा करता येणार नाही, असा कायदा करावा, यासाठी भाजपचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभा विधेयक क्रमांक ४ महाराष्ट्र दारूबंदी सुधारणा विधेयक २०२५ हे अशासकीय विधेयक मांडले होते.

यावर सभागृहात चर्चा विस्तृत चर्चा झाल्यानंतर हे विधेयक मुनगंटीवारांकडून मागे घेण्यात आले.

# जनसुरक्षा विधेयकाला वंचितचे ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा विरोध

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा तथा ज्येष्ठ विधिज्ञ प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक किंवा महाराष्ट्र जन सुरक्षा विधेयकाला कडाडून विरोध केला आहे. हे विधेयक महाराष्ट्राची फुले - शाहू - आंबेडकर भावना व विचारसरणी नष्ट करेल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र विधानसभेने गुरूवारी महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयकावर आपली मोहोर उमटवली. या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी या विधेयकाला कडाडून विरोध केला आहे.



ते म्हणाले की, महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक किंवा महाराष्ट्र जन सुरक्षा विधेयक हे कठोर, दडपशाही, असंवैधानिक, अस्पष्टपणे परिभाषित, मनमानी आणि दुरुपयोगाची शक्यता वाढवणारे आहे. पण दुर्दैवाने हे विधेयक विधानसभेत विरोधकांच्या कोणत्याही हरकतींशिवाय मंजूर झाले.

वंचित बहुजन आघाडी व आमच्या सदस्यांनी निवड समितीला ९ पानांचे पत्र लिहून हे विधेयक तत्काळ मागे घेण्याची मागणी केली होती.

नक्षलवादाचा निपटारा करण्याच्या नावाने प्रस्तावित कायद्याचा वापर सरकारच्या धोरणांना विरोध करणाऱ्या किंवा संभाव्य चुकांबद्दल वैध चिंता व्यक्त करणाऱ्यांना शांत करण्यासाठी केला जाईल. महाराष्ट्र जन सुरक्षा विधेयक महाराष्ट्राची फुले - शाहू - आंबेडकर भावना आणि विचारसरणी नष्ट करेल, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

## मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवणाऱ्यांविरुद्ध

# पोलिसांचे ऑपरेशन यू-टर्न

## वाहन जप्तीसह खूनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल होणार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
शहरात होणाऱ्या अपघातांमध्ये घट व्हावी यासाठी नागपूर शहर पोलिसांकडून ऑपरेशन यू-टर्न या विशेष मोहिमेची सुरुवात करण्यात येत आहे.




या मोहिमेमार्फत मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार आहे. यामध्ये नाकाबंदी, वाहन जप्तीसह वारंवार दारू पिऊन वाहन चालवणाऱ्या वाहन चालकाविरुद्ध खूनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे डीसीपी लोहित मतानी यांनी सांगितले.

मद्यपान करून वाहन चालविणे हे अपघातांचे एक प्रमुख कारण असल्यामुळे यावर थेट कारवाई केली जाईल. ३३ महत्त्वाच्या ठिकाणी नाकाबंदी करण्यात येणार आहे. संशयित वाहनचालकांची ब्रेद ॲनालायझर मशीनद्वारे तपासणी केली जाईल. मद्यधुंद आढळल्यास संबंधित व्यक्तीवर गुन्हा नोंदविण्यात येईल. मद्यधुंद वाहनचालकांचे प्रमाण जास्त आहे अशा रस्त्यांवर रात्री उशिरा विशेष नाकाबंदी केली जाईल. रात्री ११ ते २ या वेळेत ५ महत्त्वाच्या ठिकाणी नाकाबंदी होईल.

मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवणाऱ्यांची वाहने प्रादेशिक वाहतूक कार्यालयात जप्त करण्यात येतील. मद्यधुंद अवस्थेत वाहने चालवणाऱ्या गुन्हेगारांची माहिती डेटाबेसमध्ये नोंदवली जाईल. पुन्हा गुन्हा करणाऱ्यांवर बीएनएसच्या कलम ११० नुसार (खुनासारख्या अपराधाचा प्रयत्न) अंतर्गत गुन्हा दाखल केला जाईल. बॅनर आणि घोषणांद्वारे मद्यपान करून वाहन चालवूनये, याबाबत लोकांना सतर्क करण्यात येईल. संबंधित वाहनचालकांचे परवाने तत्काळ निलंबित करण्यात येतील.

नागपूर पोलिसांनी अपघात कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण यश मिळवले आहे. गेल्यावर्षी जानेवारी ते जून या सहा महिन्यात १७८ अपघात झाले होते. यावर्षी ही संख्या कमी झाली असून, जानेवारी ते जून २०२५ मध्ये १४२ अपघात घडले. अपघातांमध्ये २०.२२ टक्के घट झाली आहे. जानेवारी ते जून २०२४ मध्ये १७१ अपघाती मृत्यूची नोंद असून, यावर्षी हा आकडा १२६ वर आल्याची माहिती आहे. मृत्युंमध्ये २१.१३ टक्के घट झाली असल्याचे दिसून येते.

: सिनेरंग :

## पुन्हा शिवाजीराजे भोसले' येत्या दिवाळीत प्रेक्षकांच्या भेटीला

महाराष्ट्राचं आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज तब्बल ३४५ वर्षांनंतर पुन्हा एकदा परतणार आहेत, तेही एका नव्या आणि समकालीन रूपात!

ज्या चित्रपटाची इतके दिवसांपासून चर्चा होती तो पुन्हा शिवाजीराजे भोसले हा चित्रपट येत्या दिवाळीत प्रदर्शित होणार असल्याची घोषणा आषाढी एकादशीच्या निमित्ताने करण्यात आली आहे. महेश मांजरेकर यांनी विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेत, चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला आणली आहे.



या भव्य चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन महेश वामन मांजरेकर यांनी केलं असून, निर्मितीची धुरा राहुल पुराणिक आणि राहुल सुगंध यांनी सांभाळली आहे.

लोकरंजन

या चित्रपटात शिवाजी महाराजांची भूमिका अभिनेता सिद्धार्थ बोडके साकारत असून, नुकत्याच प्रदर्शित झालेल्या प्रभावी टीझरमध्ये त्यांच्यासोबत बालकलाकार त्रिशा ठोसर देखील झळकली आहे.

टीझरमध्ये ऐकू येणारे 'राजं राजं' हे बोल ज्या ऊर्जेने, ज्या भावनांनी भरलेले आहेत, ते थेट काळजाला भिडतात. सिद्धार्थ बोडकेच्या संवादांमधून केवळ इतिहासाची आठवण होत नाही, तर मनात नवी उमेद, ऊर्जा आणि प्रेरणा संचारते.

शिवरायांच्या झंझावाती व्यक्तिमत्त्वाचं आणि त्यागमय नेतृत्वाचं दर्शन घडवणाऱ्या या टीझरमधील दृश्यं आणि संवाद हे अंगावर शहारे आणणारे आहेत.या चित्रपटाच्या माध्यमातून केवळ ऐतिहासिक पुनरावलोकन न होता, आधुनिक काळातील समाजाला भिडणारा विचारप्रवाह पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ■ ■

## मंगळसूत्र चोरांचा..

### आव्हाडांची नारेबाजी

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ११ :**
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार तथा मुख्य प्रवक्ते जितेंद्र आव्हाड यांनी आज विधिमंडळ परिसरात भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्याकडे पाहून 'मंगळसूत्र चोरांचा' अशी घोषणाबाजी केली.

आव्हाड यांनी रस्त्यात चालताना अचानक ही घोषणाबाजी सुरू केल्यामुळे सर्वांच्या नजरा त्यांच्याकडे रोखल्या गेल्या होत्या.

भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी काही दिवसांपूर्वी शरद पवार व सुप्रिया सुळे यांच्यावर अश्लाघ्य शब्दांत टीका केली होती. सासू खिश्चन, नवरा ब्राह्मण, बाप मराठा व आई दुसरीच असे एक कॉकटेल घर पुण्यात आहे, असे ते म्हणाले होते.

आमदार जितेंद्र आव्हाड यांनी आज त्यांना पाहून टोमणे मारत जशासतसे प्रत्युत्तर दिले.



: टेली रंग :

## चला हवा येऊ द्या कॉमेडीचं गँगवॉर

महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय विनोदी कार्यक्रम ह्यचला हवा येऊ द्या पुन्हा एकदा प्रेक्षकांसमोर येत आहे नव्या आणि दमदार रुपात. कॉमेडीचं गँगवॉर!

आता प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहे हास्याचा एक भन्नाट महोत्सव जिथे महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट विनोदवीर आपले विनोदी कौशल्य सादर करतील. यंदाच्या कार्यक्रमात असणार आहेत धमाकेदार स्किट्स, गँगलॉर्ड्समध्ये रंगलेली बोलीची स्पर्धा, खास सेलिब्रिटींची हजेरी, आणि उत्साही प्रेक्षकांच्या सहभागासह एक हटके मनोरंजन!

या पर्वात पुन्हा एकदा सज्ज आहेत प्रेक्षकांचे लाडके कलाकार श्रेया बुगडे, कुशल बद्रिके आणि भरत गणेशपुरे आणि ह्यांच्यासोबत यंदा मंचावर उतरतील दमदार हास्यकलाकार गौरव मोरे आणि अभिनेता दिग्दर्शक प्रियदर्शन जाधव हे सगळे आता गँगलॉर्ड्सच्या भूमिकेतून नव्या कलाकारांना मार्गदर्शन करतील त्यांना प्रशिक्षित करतील आणि एक धमाकेदार विनोदी टीम तयार करतील.

ह्या पर्वाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी सांभाळत आहेत अभिजीत खांडकेकर.त्याच्या उत्साही शैलीमुळे प्रत्येक भाग अधिक रंगतदार आणि मनोरंजक ठरणार आहे. प्रत्येक भागात गँगलॉर्ड्स म्हणजेच पाच मेंटॉर्सचे एक विशेष विनोदी सादरीकरण करतील ज्याने प्रेक्षकांना मनोरंजनाचा डबल डोस मिळणार आहे. त्यासोबतच महाष्ट्रभरातून आलेले २५ विनोदी कलाकार महाराष्ट्राच्या मनोरंजनाचा विडा हाती घेणार आहेत. चला हवा येऊ द्या महाराष्ट्रातील प्रत्येक घरात विनोदाची नवी लाट घेऊन येणार आहे, तेव्हा सज्ज व्हा कारण कॉमेडीचे गँगलॉर्ड्स येत आहेत २६ जुलै पासून शनी - रवि रात्री ९ वा. सदैव तुमच्या झी मराठीवर. ■ ■

## तुझ्यासाठी तुझ्यासंगं मालिकेत स्नेहलता वसईकर माईसाहेबांच्या भूमिकेत



'सन मराठी' वाहिनीवर १४ जुलैपासून 'तुझ्यासाठी तुझ्यासंगं' या नव्या मालिकेतून पहिल्या नजरेतल्या प्रेमाची गोष्ट सुरू होत आहे.

मालिकेच्या प्रत्येक प्रोमोला प्रेक्षकांनी भरभरून, उत्स्फूर्त व सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. मालिकेत तेजा-वैदही यांच्यासह आणखी एक दमदार भूमिका पाहायला मिळणार आहे. अभिनेत्री स्नेहलता वसईकर माईसाहेब या नव्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या समोर येणार आहे.

या नव्या भूमिकेबद्दल स्नेहलता म्हणाल्या की, 'तुझ्यासाठी तुझ्यासंगं या नव्या मालिकेत मी माईसाहेब ही खलनायिकेची भूमिका साकारतेय. माईसाहेब ही मुलावर नितांत प्रेम करणारी, राजकारणातील डावपेच खेळणारी, कर्तबगार, गावाची तारणहार आहे. या भूमिकेमध्ये अश्या बऱ्याच छटा आहेत. माझ्या वयापेक्षा जास्त वय असलेली ही भूमिका आहे. यापूर्वी मी स्वतःशी ठरवलं होतं की, आपल्या वयापेक्षा मोठी व्यक्तिरेखा आपण साकारायची नाही.

वयापेक्षा मोठं पात्र साकारताना तारेवरची कसरत असते. कायम अलर्ट राहावं लागत. पण मी माईसाहेब या पात्राच्या प्रेमात पडले आणि मला नेहमीच चॅलेंजिंग भूमिका साकारायला आवडतात. मालिकेचे दिग्दर्शक विनोद लवेकर यांनी जेव्हा मला या भूमिकेबद्दल सांगितलं त्या क्षणी मी भूमिकेसाठी तयार झाले. ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

# जागतिक मानव संसाधन विकास परिषदेत सहा पुरस्कार

## महावितरणचा डंका : सीएमडी लोकेश चंद्र यांना दोन पुरस्कार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
जागतिक मानव संसाधन विकास परिषदेमध्ये उत्कृष्टतेसाठी राष्ट्रीय पुरस्कार २०२५ अंतर्गत उत्कृष्ट कामगिरीसाठी महावितरण सहा पुरस्कारांचे मानकरी ठरले. यामध्ये महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचा वैयक्तिक गटात दोन पुरस्कारांनी गौरव करण्यात आला.




मानव संसाधन विकासाला चालना, कर्मचारी क्षमता, कौशल्य व ज्ञानाचा विकास, नवीन संकल्पना, एआय तंत्रज्ञान तसेच हरित ऊर्जेचा वापर व योजना आदींवर मुंबई एक दिवसीय जागतिक मानव संसाधन विकास परिषद झाली. देशभरातील खासगी व सरकारी कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महावितरणकडून कर्मचारी प्रशिक्षण, विद्युत सुरक्षा मोहीम, एआय तंत्रज्ञानाचा वापर, हरित ऊर्जेवरील विविध योजनांची माहिती देण्यात आली.

या परिषदेच्या दुसऱ्या सत्रात उत्कृष्टतेसाठी राष्ट्रीय पुरस्कार २०२५ अंतर्गत विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले. यात महावितरणला सहा पुरस्कारांनी गौरवण्यात आले. सांघिक गटामध्ये, शेतकऱ्यांचे दिवसा वीजपुरवठ्याचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बेस्ट इनोव्हेशन इन पॉवर/ एनर्जी, मानव संसाधन विभाग अंतर्गत कर्मचारी कौशल्य विकास, क्षमतावाढ प्रशिक्षण व विद्युत सुरक्षेचे उपक्रम यासाठी अवार्ड फॉर एक्सलेन्स इन ट्रेनिंग, पुणे येथील हरित ऊर्जेवरील राज्यात पहिल्या विद्युत वाहन चार्जिंग स्टेशनसाठी बेस्ट एनवायरनमेंट फ्रेंडली प्रोजेक्ट पुरस्कार प्रदान करण्यात आले.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना वैयक्तिक गटात सीएमडी ऑफ द इयर व लिडरशिप एक्सलेन्स इन टेक्नोलॉजी इनोव्हेशन हे दोन पुरस्कार तर संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांना प्राईड ऑफ द प्रोफेशन पुरस्कार जाहीर झाला. या परिषदेत मानव संसाधन विकासाचे विशेषज्ञ डॉ. आर. एल. भाटिया, आयआयएमएच्या माजी अधिष्ठाता डॉ. इंदिरा पारेख यांच्याहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट, कार्यकारी अभियंता (प्रशिक्षण) नरेंद्र सोनवणे, उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी, सहायक अभियंता रूपेश खरपकर यांनी हे पुरस्कार स्वीकारले.